आठवणींच्या हिंदोळ्यावर



उदय द. फाटक

आठवणींच्या हिंदोळ्यावर

: लेखन :
उदय द. फाटक

: संकलन व मुद्रितशोधन :
शिरिष काणे

आठवणींच्या हिंदोळ्यावर

लेखन : उदय द. फाटक

संकलन व मुद्रितशोधन : शिरिष काणे

अक्षरजुळणी : राजेंद्र सुढाळ

मुखपृष्ठ : अभिषेक जोशी

प्रथमावृत्ती : 'गुढीपाडवा'
दि. १९ मार्च, २०२६

अर्पण पत्रिका

ती. दत्तात्रय गोविंद फाटक

ती. यशोदाबाई द. फाटक

'ज्यांच्या सहवासात आम्ही भावंडांनी सुखाचे क्षण घालवले, त्या आठवणींना उजाळा देणारे ''आठवणींच्या हिंदोळ्यावर'' हे पुस्तक आदरपूर्वक समर्पण !'

आठवणीतल्या आठवणी ...!

आठवणीतल्या आठवर्णींना
आठवत आठवत आठवलेल्या
आठवणीतल्या आठवर्णींना आठवताना
आठवलेल्या आठवर्णींना आठवत आठवत
आठवलेल्या आठवणी आठवताना
आठवलेल्या आठवणीना आठवताना
आठवणीतल्या आठवणी आठवत आठवत
आठवलेल्या आठवणीतल्या आठवणी
आठवताना आठवून आठवलेल्या आठवणी
आठवताना आठवलेल्या आठवणीतल्या
आठवणी आठवताना आठवलेल्या
आठवणीना आठवताना आठविलेल्या
आठवणीतल्या आठवर्णींच्या आठवणी
आठवत आठवत आठवताना आठविलेल्या
आठवणीतल्या आठवणी ...!

- राजेंद्र सुढाळ

प्रस्तावना

'आठवणींच्या हिंदोळ्यावर' या पुस्तकाची प्रस्तावना लिहिण्याचा आग्रह मात्र मला श्री. उदय फाटक यांनी केला. खरंतर मी प्रस्तावना लिहिण्याइतका काही मोठा लेखक नाही. मी रंगभूमीवरील एक छोटासा कलाकार.. अर्थात रंगकर्मी. पण म्हणतात ना, कलेतूनच एक कला जोडली जाते आणि आपल्याला रुची असणाऱ्या कलेतूनच नवनिर्मितीचा आनंद सापडायला लागतो. हे पुस्तक म्हणजे आमच्या पिढीसाठी आठवणींचा उजाळा व पुढच्या पिढीसाठी माहितीचे भांडार म्हणावयास हरकत नाही. आजच्या आधुनिकतेच्या यंत्रवत जगतात अगोदरच्या पिढीतील संस्कारक्षम व संवेदनशील मनातून उमटलेल्या भाव-भावनांचे, नातेसंबंधांचे, व्यक्तिरेखांचे यथार्थ दर्शन घडते. त्यातूनच मिळणारी अनुभवाची शिदोरी वाचकाला निश्चितच सुखावह ठरेल, असे लेखकाला मनोमन वाटते.

'आठवणींच्या हिंदोळ्यावर' या पुस्तकाच्या माध्यमातून लेखकाने त्याच्या संवेदनशील मनातून बालपणीच्या आठवणी जाग्या केल्या आहेत. त्या आठवणी मात्र अजूनही मनात घर करून राहतात, हे बाकी खरे ! या सर्व आठवणी संकलित करून, मुद्रितशोधन करून पुस्तकरूपात आपल्यासमोर आणण्याचा मोह मला काही आवरला नाही. परंतु यासाठीचा येणारा अवास्तव खर्च पाहता लेखकाने ई-साहित्यच्या माध्यमातून विनामूल्य प्रसिद्ध करण्याचा मनोदय माझेकडे व्यक्त केला आणि तो मला पसंत पडला. हे पुस्तक पूर्णत्वास नेणेसाठी माझे मित्र राजेंद्र सुढाळ सर यांनी केलेली अक्षरजुळणी व त्यांचे 'आठवणीतल्या आठवणी' हे स्वरचित काव्य मनाला भुरळ पाडते. तसेच अभिषेक जोशी याने कल्पकतेने साकारलेले सर्वांगसुंदर मुखपृष्ठ पाहून गतकाळातील आठवणींचे दर्शन होते. याबद्दल दोघांचेही मनःपूर्वक आभार ! 'आठवणींच्या हिंदोळ्यावर' हे पुस्तक वाचकांना सुलभतेनं उपलब्ध होण्याचा आमचा मानस सुफल संपूर्ण झाला. खरंतर हा आठवणींचा लेखाजोगा आपणा सर्वांच्या पसंतीस उतरेल आणि आपण आपल्या प्रतिक्रिया जरुर नोंदवाव्यात या अपेक्षेसह !

- शिरिष काणे (रंगकर्मी), कोल्हापूर

लेखकाचे मनोगत

'आठवणींच्या हिंदोळ्यावर' हे लघु लेख, जसा विषय समोर येईल तसे लिहायचे ठरवले तेव्हा थोडी पार्श्वभूमी माहीत असणारा वाचक व त्यासाठी काही माध्यम हवे होते. ते सुदैवाने व्हॉटस् ॲप व आमच्या ग्रुपमुळे मिळत गेले. आधी थोडी चाचपणी केली व हळूहळू प्रतिसाद मिळत गेला.

मी काही मोठा लेखक नाही. पूर्वी उमेदीच्या वयात थोडे फार वृत्तपत्रात लिहिले होते. ही जमेची बाजू. आता थोडा नवा प्रकार हाताळला आहे. तो आपण गोड मानून घ्याल असा विश्वास आहे. काही अधिक-उणे झाले असल्यास मोठ्या मनाने माफ करावे.

वेगवेगळे विषय हाताळताना भूतकाळात डोकावताना लहानपणीच्या आठवणीत रमलो आहे. असो.

- उदय द. फाटक
सी-२०, पूर्वा सोसायटी,
पाचपाखाडी, ठाणे (प.),
पिन - ४०० ६०२.
मो. ९८१९८७९९४२

अनुक्रमणिका

१. घरबदल ११

२. आईचे वर्कशॉप २५

३. शालेय शिक्षण ३१

४. आमचे खेळ ३७

५. बालपणीचा काळ सुखाचा ४१

६. सण व उत्सव ४८

७. माझे महाविद्यालयीन शिक्षण ५७

८. दिलिपच्या नोकरीच्या शोधात ६३

९. सहज सुचलं म्हणून ६७

१०. इतर लेखमाला ७२

११. बलुतेदार ९३

१२. चिंतनमाला १००

१३. समारोप १०९

आठवणींच्या हिंदोळ्यावर

घरबदल

घर..घर !

माझ्या बालपणीची पाच-सहा वर्षे तेरदाळ (तालुका - जमखिंडी, जि. विजापूर) येथे गेली. माझे वडील पोस्टमास्तर असल्याने पोस्टाच्या क्वार्टर्समध्ये आम्ही रहात होतो. माझ्या धाकट्या बहिणीचा जन्म येथेच झाला. माझा जन्म शहापूर बेळगाव येथे श्री. विठ्ठलराव वझे यांचे घरी झाला. त्यांनी ते घर १९४४/४५च्या सुमारास विकत घेतले होते. त्या घरात मुलगा जन्माला आला म्हणून त्या घराचा पायगुण चांगला आहे असे कौतुक झाले.

तेथून मग आम्ही वर उल्लेख केलेल्या तेरदाळच्या घरात आलो. घराला लागूनच पोस्ट ऑफिस होते. घर प्रशस्त होते. सोफ्यावर लाकडी पट्ट्या तिरकस मारून पुढील भिंत बनवली होती. तिथे आरामखुर्चीत बसून धाकटे काका फ्लूट वाजवत. मागे मोठं माजघर होतं. तेथे आडव्या तुळईला झोपाळा व पाळणाही होता. पुढे स्वयंपाकघर होते. चुली होत्या. बाजूला प्रशस्त न्हाणीघर व मोठा प्यासेज होता तेथे सर्पण ठेवले होते. परसात डाळिंबाच्या झाडाखाली नळ होता. परसात खूप फुलझाडे, विशेषकरून अबोली, तुळस, इ. होत्या. परसाला मेंदीचे कुंपण होते. टोकाला मोठे पिंपळाचे झाड होते.

आई नळावर कपडे धुवायला गेली की मी पायरीवर बसून वाट पाहत असे. बहुतेक माझ्या हातात लाह्याच्या पिठाचा लाडू असायचा. कधी कधी मी दारातच पिंपळाची सळसळ ऐकत चटईवर झोपी जात असे. कधी कधी पोस्टमन मला सायकलवरून फेरी मारायला नेत असे. आठवडी बाजार आमच्या दारासमोरील रस्त्यावर भरत असे.तंबू लावल्याने जत्रेसारखे वातावरण तयार होई. जवळच असलेल्या मारुती मंदिरात मला माझा मोठा भाऊ नेत असे. काही अंतरावर एक कानडी शाळा व समोर सरकारी दवाखाना होता.

पोस्टात तारायंत्र अहोरात्र कडकट्ट असा आवाज करत असे. त्या आवाजाची भाषा फक्त माझ्या वडिलांनाच कळायची. ते रात्री मला टेबलावर बसवून पैसे मोजून हिशोब करत. इथून आमची बदली गडहिंग्लज पोस्टात झाली.

==========

Destination Gadhinglaj ..
अर्थात् गडहिंग्लज मधील वास्तव्य !

My father was transferred to Gadhilglaj post office and therefore we shifted from Terdal to Gadhinglaj. Quarteters were provided. But Anna's health problems started there. We all travelled by train to Hukkeri and then by road to Gadhinglaj. All household items were transported by road by our postman Sondur. My grandfather used to stay with us. Some how Gadhinglaj 's stay was not suited to us though Quarters were specious well ventilated.

My elder brother was admitted in nearby school. My father did not join the routine office work. Very soon we shifted to Shahapur Belgaum. Initially my father was transferred to the post office near Belgaum railway station and then to Belgaum cantonment. My mother used to say that the quarters at Gadhinglaj was a haunted place. My father's behaviour became erratic. He was not taking interest in the work. Mother was worried.

My grandfather consoled her, supported and finally by the god's grace. My father was transferred to Belgaum as mentioned above. We got an accomodation though costly, in Vengurlekar's house in Kacheri Galli, next to my aunt's house. Monthly rent was 35 Rs. which was not affordable to us. My elder brother was admitted to

Chintamanrao highschool, and I was admitted in Girls's school no. 3 where my mother had studied.

==========

तेरदाळ येथील घर..

दि. ३० जाने १९४९, गांधी हत्या झाली व ते रागाचे लोण देशभर पसरले. जागोजागी दगडफेक व जाळपोळी झाल्या. जास्तकरून ब्राह्मणावर राग होता. जाळपोळीत त्यांचे खूप नुकसान झाले. आम्ही सरकारी इमारतींत रहात होतो त्यामुळे त्रास झाला नाही. असं आई सांगायची.

तेरदाळच्या घरात ढेकूण व विंचू यांचं साम्राज्य होते. ढेकूण शोधून मारायचा रोज कार्यक्रम असायचा. आईच्या पायाला एकदा विंचू चावला होता. तिने प्रचंड वेदना सहन केल्या.

काही दिवस गेले व एक दिवशी अण्णांची बदली गडहिंग्लजला झाली व गडहिंग्लजला आम्ही आलो. येथेही क्वार्टर्स होत्या. पुढे पोस्ट ऑफिस व मागे घर अशी रचना होती. घर खूप मोठे होते. कपाटं तर इतकी होती की सगळं सामान कपाटात मावले होते. काही खोल्या आम्ही बंदच ठेवल्या. पावसाळ्यात हे घर गळायचे. हे घर आम्हाला लाभले नाही.अण्णा आजारी पडले. वागण्यातही फरक पडला.

गाव लहान. पण सुदैवाने अण्णांची बदली बेळगावला झाली. आम्ही बेळगावला आलो. मी आता शाळेत जायच्या वयाचा झालो होतो. नेहमीप्रमाणे येथे क्वार्टर्स नव्हत्या, त्यामुळे घराचा प्रश्न उभा राहिला. पण सुदैवाने कचेरी गल्लीत तात्यांच्या घराशेजारी वेंगुर्लेकर वकिलांच्या घरी तळमजल्यावर घर मिळाले व तेथे आम्ही रहायला आलो.

==========

वेंगुर्लेकर वकिलांचे घर

वेंगुर्लेकर वकिलांचे घरही मोठे होते. अंगण होते. एक चिकूचे झाड होते. वरच्या मजल्यावर जाण्यासाठी बाहेरून लाकडी जिना होता. आमचे स्वयंपाकघर मोठे होते.

झुरळांचा सुळसुळाट होता. परसात एक विहीर होती. लाकडी रहाट होता. विहिरीवर एक हातपंप होता.पाणी हापसलेकी नळाद्वारे घरात येत असे. माझं कोरे गल्लीतील मुलींच्या शाळेत नाव घातले. मुलांची संख्या फारच कमी होती. कब्बे नावाच्या कारवारी आम्हाला सर्व विषय शिकवायच्या. त्या लंगडत चालायच्या. दुसरी व तिसरीला मला तिथंच शिकावे लागले. या दोन्ही वर्गावर लिंगुबाई आचरेकर या शिक्षिका होत्या. त्या प्रचंड तापट व कडक होत्या. त्याही सर्व विषय शिकवायच्या. त्यांचा नातू बबन माझ्या वर्गात होता. चौथीला मी मराठी मुलांच्या शाळेत आलो. कोरे गल्लीतील शाळेत मी पुष्पा बरोबरही जात असे.

दिलिपचा जन्म वेंगुर्लेकर यांच्या घरात झाला. अमावास्या होती. मालकीण बाईंनीच बाळंतपण केलं. येथे आम्ही फार दिवस राहिलो नाही. घरभाडे फार असल्याने जवळच मिरापूर गल्लीत, मग्गावी यांच्या घरी रहायला आलो.

==========

मिरापूर गल्ली

आम्ही मिरापूर गल्लीत रहायला आलो व शाळेत जायला लागलो. तात्यांच्या घराच्या एकदम मागे आमचं घर होतं. परसातून एकमेकांच्या घरी जाऊ शकत होतो. आमच्या घराच्या एका बाजूला मठद, पाटील, बसापूर व बुर्लबुड्डी असे वेगवेगळे व दुसऱ्या बाजूला रायकर (सोनार) असे शेजारी होते.

जवळजवळ आठ वर्षे येथे रहात होतो. तेवढ्या कालावधीत अण्णांची बेळगाव कॅंप, विजापूर, संकेश्वर येथे बदली झाली. ते जेव्हा टाऊन इन्स्पेक्टर होते

तेव्हा ऑफिस घरीच होते. आताच्या भाषेत वर्क फ्रॉम होम. याच कालावधीत अण्णांचे आजारपण,दिलिपचे दुखणे सुरू होते. आजोबा येऊन जात. त्यांचेही वय झाले होते. बापूकाकांचं लग्नही या कालावधीत झाले.

==========

Some worth noting events..

1. After few months we shifted to Mirapur Galli, my father was getting treatment from Dr. Hukkeri for quite a long time. He was on medical leave.

2. Slowly his health improved and he resumed his duties as usual.

3. When he was promoted as Postal Inspector, he worked from home. I had visited some places like Patshahapur, Bijapur, Sankeshwar with my father.

4. When in Sankeshwar he had a good friendship with Mr. Ghaisas.

5. We used to visit Shankaracharya's math (मठ) and attended discourses there.

6. Finally he was Guru of my father and performed padyapooja at our residence.

7. Afterwards he was transferred to Bhusaval. First he came to Pune and stayed in my elder brother's hostel for a day. My younger brother was not keeping well still. We were worried. My elder brother had taken him to homeopathic doctor Dr. Bakhare for treatment.

8. My grandfather came to stay with us due to old age.

9. As I reflect back this was very crucial and trying period for our part especially mother to bring up five children (two were handicapped) with limited resources. I really wonder how my mother could manage of crucial situation. Hats off to my parents.

==========

शहापूर येथील वास्तव्य

आमच्या घरी माझ्या मोठ्या भावाचा मित्र त्याच्या बरोबर अभ्यास करायला यायचा. तो हुशार होता. त्याचे वडील आम्हाला इंग्रजी शिकवायला होते. माझा मोठा भाऊ अभ्यास करायला दामूमामा (आईचे मामा) यांचे घरी जात असे. त्या सुमारास आम्ही सायकल विकत घेतली होती. शहापूर पोस्ट ऑफिस ते प्रकाश टॉकीज दरम्यान उसाची गुऱ्हाळं लागायची. लाकडी घाणे कर्र कर्र आवाज करत फिरत. एक तांब्याभर रस चार आण्याला मिळायचा शिवाय खमंग आलेपाक व चिरमुरे खात रस पिताना स्वर्गसुख लाभायचे. दसऱ्याला 'व्यंकट रमणा गोविंदा' असा जयघोष करत रथ निघायचा. आई म्हणायची, निदान चार पावलं तरी रथ ओढण्यासाठी जावा. ठिकठिकाणी आरती होत असे.

याच कालावधीत नलू व शालूची लग्नं झाली. माझी मुंजही झाली. मीनाक्षी मला संध्या शिकवायची. ती आमच्याच गल्लीत रहायची. त्यावेळी मोठ्या भावाला शिक्षणासाठी पुण्याला जावे लागले.

वडिलांची बदली भुसावळ येथे झाली. महाराष्ट्र राज्य स्थापन झाले व १९६१ मे रोजी मध्ये आम्ही बेळगाव सोडून कोल्हापूरला आलो. अशा रितीने बेळगावचा सहवास संपत चालला व आम्ही महाराष्ट्रात यायच्या निर्णयाप्रत आलो.

==========

मुक्काम पोस्ट कोल्हापूर

माझ्या वडिलांची बदली भुसावळवरून कोल्हापूरला झाली. ते शनिवार पेठ पोस्ट ऑफिसमध्ये पोस्टल सुपरवायझर म्हणून ते रुजू झाले. घर घेण्यापूर्वी ते शुक्रवार पेठेत गद्रे यांचेकडे राहिले. मावशीच्या ओळखीने शुक्रवार पेठेतच पण मेन रोडवर गुरव यांच्या घरी जागा भाड्याने घेतली. श्री. गुरव याचे गंगावेशीत मेडिकल स्टोअर्स होते.

माझे मोठे बंधू कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला होते. माझा भक्ती सेवा विद्यापीठ हायस्कूल येथे प्रवेश झाला. धाकट्या बहिणीचा राजमाता जिजामाता हायस्कूल मध्ये प्रवेश झाला. अशा रीतीने आम्ही कोल्हापूरकर झालो.

कोल्हापूरला आल्यावर येथील शाळेत रुळायला थोडे जडच गेले. येथे इंग्रजी पाचवीपासून शिकवलं जातं. आम्ही मात्र बेळगावला आठवीत एबीसीडी शिकलो. मराठी थोडे हायर तर गणित डोक्यावरून जायचे. क्लास लावावा असे वाटले नाही. बेळगावला असताना प्रगती पुस्तकावर आईची सही असायची पण आता वडिलांचीही सही घ्यावी लागायची. पहिल्याच परीक्षेत प्रगती पुस्तकावर लाल रेघ ओढली गेली.

तसे आमचे शिक्षक उत्तम होते. आमची वर्गशिक्षिका मराठी शिकवायच्या. त्या कोल्हापूरच्या आमदारांची पत्नी होत्या. सायन्स विषय भालजी पेंढारकर यांचे सुपुत्र शिकवायचे. संस्कृत शिकवायला अभ्यंकर गुरुजी होते व ते जमखंडीचे होते. मित्रांच्या मदतीने मी हळूहळू प्रगती केली व दहावीपर्यंत हुशार मुलांच्या पंक्तीत बसलो. हिंदी शिकलो. संस्कृत शिकलो. परीक्षा दिल्या. चित्रकला शिकलो. त्याचीही परीक्षा दिली.

धाकट्या भावाला मूकबधिर शाळेत घातलं. तो एकेक उच्चार करू लागला. शेती विकून थोडे पैसे वाटणीला आले. एक पलंग व लहान गोदरेज कपाट, बरशेन गॅस घेतला. मोठ्या बहिणीला शिलाई यंत्र घेतलं. मोठ्या भावाचे शिक्षण संपलं व त्याला जळगावला नोकरी मिळाली.

माझ्या मोठ्या बहिणीला घेऊन दिलेल्या शिलाईयंत्रावर ती हळूहळू शिवणकाम शिकली. एक-दोन वर्षातच तिचा चांगला जम बसला. आईचं पुराण-

प्रवचन सुरू झाले. गुरू महाराजांच्या वाड्यात जेरे शास्त्री यांचे प्रवचन असे.

आमचे गुरवांचे घर मोठे नव्हते पण हमरस्त्यावर होते. पायरीवर बसून वेळ जायचा. पंचगंगा नदीकडे जाणारी वाट असल्याने गणपती विसर्जन, ताबूत विसर्जन किंवा इतर मिरवणुकी पहायला मिळत. पंचगंगेला पूर आला की आम्ही पुराचे पाणी पहायला जात असू. माझी मावशी व आई नदीवर गंगास्नानाला जात. घरात विहीर नव्हती, पण हौद होता.

==========

तुंगामावशीचे घर... ऋणानुबंध नात्यांचे !

आमचं आणि तुंगामावशीचे घर जवळजवळ असल्याने एकही समारंभ असा होत नव्हता की, आम्ही त्यांच्याकडे गेलो नाही किंवा त्यांच्याकडील आमच्याकडे आले नाहीत. त्यामुळे एकमेकांना मदत व्हायची. गप्पा व्हायच्या. काही नवीन पदार्थ असतील तर देवाणघेवाण व्हायची. अडीअडचणीला धाऊन जायचो. नेहमी एखादे निमित्त काढून संमेलनासारखा व सहलीसारखा कार्यक्रम व्हायचा.

एकदा आम्ही बैलगाडी करून जवळच असलेल्या प्रयाग तीर्थावर गेलो होतो. कोल्हापूर पासून पाच मैलांवर त्रिवेणी संगम आहे. तेथे कुंभी व कासारी नद्या पंचगंगेला मिळतात. प्रयागात स्नान व तेथेच वाळवंटात स्वयंपाक केला होता. खूप मजा आली होती. एकदा तुंगामावशीचे घरी परसदारी अंगणात धुंधुरमास केला होता. संध्याकाळी अंगणात अंगत पंगत छान जमली होती. शेतावरून आणलेली ताजी भाजी व भाकरी आणि पिठलं-भात याला अमृताची गोडी यायची.

शाळेची सहल असल्यासारखे कधी कधी आम्ही शेतावर जायचो. काकांनी शेतात झोपडी बांधली होती. बाजूला गोठा होता. ऊस, शेंगा, हरभरा, कणसं ...काय नव्हते ते सांगा. काकांचे पावणे आले म्हणत कोरेगावचे लोक काही ना काही आणून देत. विहिरीवर पंप सुरू झाला की गावात बातमी जायची व लोक घागरी घेऊन शेताच्या बांधावर पाणी भरून नेत. गुऱ्हाळ असले की अधिक मजा यायची.

ऊस तोडणी, उसाचे गाळप, रात्रभर काहिलीत तो उकळायचा व पहाटे पहाटे त्याच्या ढेपी पाडायच्या. गुळाचा गोड वास आसमंतात भरून जायचा. हवा तेवढा रस प्या, गूळ व शेंगा खा. कुणी हटकणार नाही. गूळ घालून केलेला ताज्या दुधाचा दाट चहा मी येथे प्रथमच प्यालो. अमृताचेही पैजा जिंकणारी चव आजही रेंगाळत आहे.

शेतात जाऊन भाजी आणायची व ती करून भाकरीबरोबर खाण्यात जी मजा आहे ती पंचपक्वान्नात नाही. सोबत कांदा व शेंगदाण्याची चटणी पाहिजेच. स्वच्छ व कोरडी हवा असल्याने कडकडून भूक लागायची. पचायचेही सर्व काही. आता ते दिवस फक्त आठवायचे. ते प्रेम, जो जिव्हाळा, ती आपुलकी, भेदभावरहित सहवास व हसते खेळते घर आता कुठे पहायला मिळते ? मोबाईल असते तर नक्की फोटो काढले असते व शेअर केले असते .

काही आठवणी

तुंगामावशीचे घर हाकेच्या अंतरावर असल्याने आमचे जाणे येणे असे. तुंगामावशीचे घरी एक म्हैस होती. तिला रोज ताजा चारा किंवा गवत आणण्यासाठी मी व कुमार जात असे. गवताच्या पेंढ्या बाबा गाडीत घालून ती गाडी ढकलत आम्ही आणत असू. कडबा किंवा मका आणला की त्याची कोवळी कणसं भाजून खायला मजा यायची. ही गवताची मंडई जिजामाता हायस्कूल जवळ उत्तरेश्वरावर होती.

एकदा सर्व गद्रे मंडळी आमच्याकडे जेवायला आली असताना म्हशीला पाणी देण्यासाठी मी व कुमार घरी गेलो असता म्हैस काही उठेना. आम्हाला हे नवीन होते. म्हैस हालचाल करत नव्हती, तिचे कान उलटे झाले होते. डोळे उघडे होते. 'म्हशीचे प्राण गेले होते'. आम्ही धावत घरी आलो व काकांना सांगितले. पुढे काही दिवस रिकामा गोठा बघवत नव्हता. गोठ्याजवळ एक पेरूचे झाड होते. लालबुंद व अत्यंत गोड पेरू लागत.

तुंगामावशीच्या घरासमोर काकांच्या चुलत भावाचा वाडा होता. मोठे दुमजली घर होते. सुशीला(अक्का) व वसंता ही त्यांची मुलं. अक्का हिंदी घेऊन एम. ए.

झालेली. मी तिच्याकडे हिंदीच्या क्लासला जात असे. वसंताचे फोटोग्राफीच्या सामानाचे दुकान लक्ष्मीपुरीत होते. अक्का फोटो प्रिंटिंगचे काम करायची. आम्ही मुलं कुतुहलाने ते पहात बसायचो. अंधारात फिल्म उघडून हायपोत धुवायची व वाळत टाकायची. वाळल्यावर मशिनद्वारे फोटोग्राफिक कागदावर चित्र पाडून केमिकल वापरून फिक्सिंग करायचे व सुकल्यावर कापून डिलिव्हरी करायची असं ते काम असायचं.

जवळच शाम इंगवले नावाचे गृहस्थ रहात होते. ते शालिनी सिनेटोनमध्ये मॅनेजर होते. त्यांच्या ओळखीने मी, कुमार, भारती व सुधा ने 'भाग्यलक्ष्मी' या चित्रपटात एका गाण्याच्या शूटिंगमध्ये भाग घेतला होता. विवेक, रमेश देव व जयश्री गडकर ह्यांच्या प्रमुख भूमिका होत्या.

==========

वाडा संस्कृती

कोल्हापूरला वाडा संस्कृती होती. आमच्या घरासमोर दिवाणांचा वाडा होता. वाड्यात अनेक बिऱ्हाडं होती. माझा वर्गमित्र विश्वास कुलकर्णी तिथं रहायचा. त्याचे वडील पां. ना. कुलकर्णी आम्हाला मराठीचे प्राध्यापक होते. त्याची आई M.A. with Marathi होती. ती निबंध लिहायला मदत करायची.

दुसरं बिऱ्हाड मामलेदार कुलकर्णी यांचं होतं. त्यांची बायको निर्मला कुलकर्णी लेखिका होत्या. त्यांच्याकडून स्फूर्ती घेऊन लिहायला लागलो. त्यांचा मुलगा मतिमंद होता व मुलगी स्मार्ट व हुशार होती. माझे Domicile Certificate त्यांनी आणून दिले.

तिसरं एक बिऱ्हाड प्रा. धुळे यांचं होतं. ते आम्हाला शिकवायला नव्हते. दिवाण यांचा दत्तक मुलगा (कालकुंद्री) कुमारचा वर्गमित्र होता. त्यांच्याकडे मोठा Cabinet type Gramophone होता. तो आम्ही ऐकायला जात असू.

दुसऱ्या बाजूला दिवाण वकिलांचा वाडा होता. कमालीची शिस्त व टापटीप

वाखाणण्याजोगी होती. ते फारसे संपर्कात नव्हते. कामापुरत जाणं-येणं व्हायचं.

तिथं जवळच गजानन संगीत विद्यालय होते. त्या विद्यालयाचे चालक श्री. बाखरे गुरुजी पौरोहित्य करीत असल्यामुळे धार्मिक कार्याला आमच्याकडे यायचे. दर शनिवारी त्यांच्याकडे भजनाचाही कार्यक्रम होत असे.

नदीकडे जाणाऱ्या रस्त्यावर करवीर पीठाच्या शंकराचार्यांचा मठ व समोर जैन मंदिर आहे. तेथे सुमारे ३०फूट उंचीची संगमरवरी महावीराची मूर्ती आहे. तिची स्थापना आम्ही पाहिली आहे.

==========

शनिवार पोस्टातील घर

शनिवार पोस्टातलं घर मोठं होतं. तेथे कुंदाचे व अशोकचे लग्न झाले. कितीही पाहुणे आले तरी त्रास झाला नाही. स्वयंपाकघर तर इतकं मोठं होतं की, वीसएक माणसं सहज जेवायला बसू शकत असत.शिवाय लाईट-पाण्याची काही कमतरता नव्हती. अंगणात आंब्याचे व डाळिंबाचे झाड होते. बाकी इतर फुलझाडे होतीच.

इथून पुढे परत अण्णांची बदली न्यू पॅलेस येथे झाली. तेथे रहायला जागा होती पण ती सोईची नव्हती व गावाबाहेरही होती.

==========

वाळवेकर वाडा

मग शनिवार पोस्टासमोरील वाळवेकर (कुलकर्णी) यांच्या घरात आम्ही रहायला आलो. घरात काळोख होता. सुदैवाने,नळाला पाणी खूप वेळ यायचे. परसात पडिक विहीर होती. सोपा कॉमन होता. याच घरात असताना सुधाचे लग्न झाले. माझेही लग्न झाले. या घरात आम्ही महालक्ष्मी पूजन केले होते. मुखवटा

करण्यासाठी बेळगावहून तात्या आले होते. साचा काका गद्रे यांनी आणला होता. आमच्या कुलधर्मात महालक्ष्मीची पूजा व घागरी फुंकतात. त्यानंतर शिल्पाचे लग्न झाल्यावर पूजा झाली. प्रत्येकाच्या श्रध्देचा विषय आहे.

घर भरवस्तीत असल्याने रात्री पण जाग असायची. समोर निरंजन तालीम होती. पैलवान व्यायाम करताना ते घुमलेला आवाज यायचा. एकदा जुन्या राजवाड्यातील हत्ती पिसाळला होता. आम्ही दार लावून बसत होतो. माहुतालाही तो दाद देईना. शेवटी भवानी मंडपात रोड रोलर लाऊन अडकवण्यात यश आले.

काणेकाकांची रोज एक फेरी असायचीच. ते येताना आठवणीने फुले आणायचे. वाळवेकरांची नातवंडे शाळेत पोचवायची व आणायची कामे कुमार करायचा. दिलिपचा ड्रॉईंग क्लास व परीक्षा याच घरात झाल्या. दिवस चांगले चालले होते. अचानकपणे वडिलांची बदली मुंबईला झाली व ते निवृत्त होऊन परत आले. शेवटी हेही घर आम्हाला सोडावं लागलं व महालक्ष्मी मंदिरापासून जवळच असलेल्या यज्ञोपवीत यांच्या घरी आम्ही रहायला आलो.

==========

यज्ञोपवीत वाडा

आता मात्र छोटे का होईना पण महालक्ष्मी मंदिराजवळ यज्ञोपवीत वाड्यात घर घेतले. दारात विहीर व नळ त्यामुळे पाण्याची कटकट नव्हती. यज्ञोपवीत हे महालक्ष्मी मंदिरात पुजारी असल्याने महालक्ष्मीला अभिषेक करून पूजा करता आली. माझ्या मुलाला देवीच्या पायावर घालता आले. याच सुमारास शुक्रवार पेठेतील घर सोडून माझी मावशी शिवाजी पेठेत आली. तिथलं घर रहाण्यायोग्य होईपर्यंत त्यांचे सामान भारतीकडे व झोपायला आमच्याकडे अशी त्रिस्थळी यात्रा चालली होती. पाचही बहिणीत एकी होती. त्यामुळे एकमेकींना सांभाळून घेत. अशी नाती लाखात एक. काही दिवस सुखाचे गेले.

==========

पागे वाडा

शनिवार पोस्ट ऑफिसच्या क्वार्टर्समधून बाहेर पडल्यावर आम्हाला तीन घरं बदलावी लागली. रिटायरमेंट नंतर उर्वरित आयुष्य सुखात घालवावं असं वाटत होतं पण देवाच्या मनात काही वेगळेच होते. माझे व धाकट्या बहिणीचे लग्न झाले होते. फक्त एका धाकट्या भावाचा प्रश्न होता. त्याला स्वतःच्या पायावर उभे करायचे होते. नाही म्हटले तरी थोडे अपंगत्व आड येत होते. नाही म्हटले तरी थोडे अवघड होते. कोल्हापूर सारख्या ठिकाणी त्याला योग्य काम मिळणं अवघड होतं. मोठ्या भावाचा हातभार लागेल असे वाटले होते पण ... सरतेशेवटी मी त्याला मग माझ्याकडे घेऊन आलो. माझं घर तरी कुठं मोठं होतं. एक रूम व किचन, दुसऱ्या मजल्यावर. माझी मुलगी तीन-चार वर्षाची व आम्ही दोघे रहात होतो. घरात स्वयंपाक करायला स्टो व शेगडी होती. कपडे ठेवायला कपाटही नव्हते. मुलीचे कपडे, खेळणी आम्ही टीपॉयवर ठेवत असू. या घरात असताना धाकट्या बहिणीचे लग्न झाले. कल्पना करा इतके जण आम्ही कसे रहात असू ते.

नवीन घर बुक केले होते. त्या आधी कंपनीच्या क्वार्टर्स अवघ्या रू.२५०/- भाड्याने मिळाल्या होत्या. तीन रूम किचन व दोन बाल्कन्या, सुमारे १२००/- स्क्वेअर फीट जागा होती. पण पुढील आयुष्याच्या दृष्टीने आईला ते पसंत नव्हते. त्यामुळेच थोडे धाडस व अडचण सहन करून घर बुक केले. त्यासाठी धाकट्या बहिणीचे उपकार मानावे तेवढे थोडेच. असो.

इकडे माझ्या आई-वडिलांनी मावशीच्या ओळखीने तिच्याच घरासमोर पागे वाड्यात घर मिळवून दिले. Master plan मुळे रस्त्याकडची बाजू कापली गेल्याने वाडा नावालाच उरला होता. वेडावाकडा लोखंडी जिना, संडास तळमजल्यावर, तिसऱ्या मजल्यावर मालकाची एक रुम. अरुंद गॅलरी. हमरस्त्यामुळे वाहनांचा अहोरात्र आवाज. जेमतेम दोन माणसे जेवायला बसतील एवढे स्वयंपाकघर व एक कॉट मावेल एवढा सोपा. मोठ्या घरात रहायची सवय पण परिस्थितीला सामोरं जावं लागलं.

फक्त एकच फायदा म्हणजे महालक्ष्मी मंदिरापासून सर्व गोष्टी अगदी जवळ

होत्या. अडल्या-नडल्या वेळी मावशीचा भक्कम आधार होता. नातवंडं व जावई येऊन-जाऊन मदत करत. हमरस्त्यावर घर असल्याने वेळ जाण्याचा प्रश्नच नव्हता. असेच दिवस चालले होते. मे महिन्यात मी जात असे. कधी कधी आईवडील माझ्याकडे येत. घरं लहान असली तरी सर्वांनी समजून घेतले. आता प्रश्न होता धाकट्या भावाच्या नोकरीचा.

धाकट्या बहिणीचे लग्न ठरवताना व धाकट्या भावाला नोकरी मिळवून देताना किती धडपड व खस्ता खाव्या लागल्या ते कुणाला सांगून पटणार नाही.

==========

आईचे वर्कशॉप

आमचं स्वयंपाकघर

ज्याला आपण 'स्वयंपाक खोली' म्हणतो ती हल्ली इतिहासजमा होत चालली आहे. जरा विचार करा, तुमच्या ब्लॉकमध्ये स्वयंपाक खोली आहे का?

Toilet Room ला जेवढी प्रतीष्ठा तुम्ही देता तेवढी kitchen ला देता का ? Toilet Room ला तुम्ही उशाशी म्हणजे अगदी 'बेडरूम'मध्ये नव्हे तर अगदी किचनजवळ आणले आहे. जिथं अन्नपूर्णा वास करते, तिच्याकडे इतकं दुर्लक्ष करायचं ? याला काय म्हणायचे ? घराची निवड करताना स्वयंपाक खोली ऐवजी attached bathroom / toilet ला प्राधान्य देता, किती निषेधार्य आहे हे.

पुरुषांच्या बरोबरीने स्त्री खांद्याला खांदा लावून उभी राहू लागली, संसाराला हातभार लावू लागली पण तिच्यातली गृहिणी लोप पावली. ती आईची मम्मी झाली.

माझी आई चार इयत्ता शिकली पण तिची सारी मुले पदवीधर झाली. याचा तिला अभिमान वाटायचा. तिनं घर उत्कृष्टपणे सांभाळलं. त्यामुळे आम्हाला कधी हॉटेलमध्ये जावे लागले नाही वा मागवावं लागलं नाही.

या माझ्या आईचं स्वयंपाकघर कसं होतं ते मी सांगणार आहे.

महाराष्ट्र राज्य निर्मितीपर्यंत आम्ही बेळगावला रहात होतो. आमचं घर भाड्याचं जरी असलं तरी सात खोल्यांचं होतं. सोपा, माजघर, कोठीची खोली, स्वयंपाक खोली, न्हाणीघर व दोन passage सारख्या खोल्या. परसात विहीर, अंगण, बाग, संडास व कपडे व भांडी धुवायला कट्टे. ते पाणी बागेला जायचं. हात-पाय धुवूनच स्वयंपाकघरात जायला परवानगी होती.

ईशान्य दिशेला खिडकीखाली एक चूल व आजूबाजूला दोन शेगड्या होत्या. माझी आई दरवर्षी सणवार संपले की नवीन चूल व शेगड्या बनवायची. शेगडीसाठी जाळी वा तारा आठवडी बाजारात मिळायच्या. शेगडीच्या शेजारी उजव्या हाताला, दोन चार लाकडे, शेणी व एका रोवळीत लोणारी कोळसा असायचा. रोवळी म्हणजे

बांबूच्या चोयट्यापासून बनवलेली उभट आकाराची टोपली व लागूनच एक फुंकणी व कोळसे उचलायचा चिमटा. हल्लीच्या मुलींना 'चूल पोतेरे' माहिती नाही.

रोज सकाळी उठल्यावर चूल व शेगड्या ओल्या माती मिश्रीत पाण्याने पुसणे व रांगोळी काढून हळद-कुंकू लावणे.

लहानपणी हे काम पाहिल्याने आजही आमची सौभाग्यवती ग्यासची शेगडी पुसून हळद-कुंकू लावते. किती पवित्र वाटते? चुलीतली राख भांडी घासायला उपयोगी पडते. या गरम राखेत आम्ही मुलं रताळी, जून भेंडी, फणसातल्या आठळ्या, भोपळ्याच्या बिया भाजत असू.

जवळच भिंतीतले कपाट होते त्यात विविध मसाले, मीठ, लोणची, फोडणीचे साहित्य व गोडे तेलाची बरणी इ. असे. दुभत्याचे कपाट बाजूला होते. त्यात दूध, दही, ताक, लोणी व तूप असायचं.

दुभत्याच्या कपाटात खरकट्या भांड्यांना no entry. त्या कपाटात दूध, दही, लोणी, तूप वा तत्सम पदार्थच ठेवले जात. या कपाटाला जाळी असल्याने हवा खेळती रहायची. वरच्या बाजूला ताटाळे असायचे. त्यात ताटे, ताटल्या, चिमटे, सांडशा, पळ्या, उलथनी, तवे, इ. असायचे. सर्व वस्तू लोखंडी असल्याने आपसूकच लोह पोटात जायचे. ताटे पितळी व कल्हई केलेली होती. फळीवर पत्र्याचे व पितळी डबे असत.त्यात वेगवेगळे पदार्थ उदा.पापड, सांडगे, कुरडया, पिठं, भाजाण्या, मसाले व काही फराळाच्या व खाण्याच्या वस्तू असत. बरण्यांना दादरे बांधलेले पोक्त माणसावाणी भासत. स्वयंपाकघरात एक उखळ होते व बाजूला निरनिराळ्या पहारी व लाकडी मुसळ होते. पाटा-वरवंटा व जाते ही होते. बसण्यासाठी चौफुला पाट व गार पाण्याने भरलेला माठ असायचा.

स्वयंपाकघरातच देवघर होते. रोज नैमित्तिक पूजा-आरती-नैवेद्य असायचा. घर कौलारू असल्याने छपरातील सहाणेतून उन्हाचा कवडसा यायचा. लाकडी फडताळ्यावर वाट्या, भांडी, लहान-मोठी पातेली व तळ कप्प्यात कांदे-बटाटे व भाज्या असायच्या. फळे असायची. चुली जवळच कपबशांचा स्टँड होता. तेथेच चहा-साखरेचे डबे, गाळणी, चमचे असत. आईनं 'कायझन'चे प्रशिक्षण घेतले होते का, माहिती नाही. स्वच्छता, टापटीप व वस्तू जिथल्या तिथे, त्यामुळे मांडणी

छान दिसायची व वातावरण प्रसन्न रहायचे.

चुलीजवळच एका कोनाड्यात देव ठेवले होते. हात पुसायला एक छोटा पंचा ताटळ्याला लटकून असायचा. त्याला शोधनं का म्हणत कुणास ठाऊक ? अशा स्वयंपाकघरात माझी आई अन्नपूर्णा होती. तिच्याकडे द्रौपदीची थाळी होती. अत्यंत कठीण परिस्थितीतही संसाराचा गाडा तिनं कसा ओढला असेल, सांगता येत नाही. सगळं काही ती घरी करायची. आमच्याकडे खूप पाहुणे येत, तरी आम्ही कधी हॉटेलमध्ये गेलो नाही वा बाहेरून मागवलं नाही. शिळं अन्नही गोड लागायचे. तांब्या-पितळेच्या भांड्यात व चुलीवर शिजवलेले अन्न व तेही घरगुती मसाले वापरून केलेले अमृताहुनी गोड लागायचे. आपल्या माणसांसाठी आपलेपणाने शिजवलेले अन्न, प्रेमाने ओतप्रोत भरलेले आमच्या वाट्याला आले हे आमचे अहो भाग्यच. जेवणानंतर आपसूकच ढेकर व 'अन्नदाता सुखी भव' ही कृतज्ञता तुम्ही अनुभवली काय ?

==========

घरातील बरीचशी कामे आईलाच करावी लागत. त्यासाठी लागणाऱ्या वस्तू व साधनं घरी असायची. त्यांच्या जागाही ठरलेल्या असायच्या. त्यांचं रखरखावही (maintenance) तिलाच करावे लागे.

अगदी ज्या गोष्टी घरी करताच येत नाहीत त्या मात्र बाहेरून करून घ्याव्या लागत. त्याही कारागिरांचा season ठरलेला असायचा. आता मूळ विषयाकडे वळू. आमच्या घरातलं main workshop म्हणजे स्वयंपाकघर.

एकाच वेळी दहा माणसे जेवायला बसतील एवढे मोठे. अगदी पाटावर बसून जेवता येण्याजोगे. स्वयंपाकघराचा एक कोपरा उखळाने व्यापला होता. काळे कुळकुळीत गोल किंवा चौरसाकृती आकाराचे. त्या उखळात कांडणे कुटणे, सडणे, रुबणे व दळणे या साऱ्या क्रिया करता येत. त्यासाठी लागणारे साहित्यही जवळच ठेवलेले असायचे. लहान-मोठ्या पहारी, मुसळ, वरवंटे व वेगवेगळ्या चाळण्या व केरसुण्या असायच्या. काम झालं की उखळ धुण्याचा विधी व नंतर ते उखळ

झाकण्याचा कार्यक्रम असायचा. नाही झाकलं तर घरात घुसखोरी करून चौर्यकर्म करणारे बोकोबा कधी विधी करतील ते सांगणे कठीण. बाजूला लहान व मोठे जाते खुंट्यासहित असायचे. भाजाणी, मेतकूट, ज्वारीच्या लाह्या किंवा उपासाचे वा सोवळ्यातले पदार्थ जात्यावर दळले जात. दरवर्षी त्या जात्याला, पाटा-वरवंट्याला किंवा सहाणेला टाकी लावण्याचं काम असे. शिळी भाजी-भाकरी व अधेली दिली की काम झालं. कधी कधी जुना सदरा वा फ्रॉक पण द्यावा लागायचा.

मिरची व शिकेकाई कांडण्याचे काम घरीच चालायचे. एकदा डाव्या हाताने व दुसऱ्या वेळेला उजव्या हाताने कांडताना वा कुटताना तोंडातून हुंकार यायचा त्याची मला मजा वाटायची. शेवटचे चार घाव घालताना गती वाढायची.. काम झालं की खोचलेला पदर सोडून ओठावरचा घाम पुसला की वर्षभराची बेगमी झाल्याचा आनंद वाटे.

ज्यांचे वाडे असत त्यांच्याकडे लाकडी उभ्या आकाराचे उखळ असायचे. यशोदेने कृष्णाला अशाच उखळाला, दोरीने बांधून ठेवले होते. म्हणून त्यांचे एक नाव दामोदर आहे.

आता उखळ वा जात्याची जागा mixer ने घेतली आहे. बाजारात मिळणाऱ्या आयत्या पदार्थांनी घेतली आहे. पण घरगुती पदार्थाची चव न्यारीच.

==========

उखळाशेजारीच एक चौरसाकृती, छान टाकी लावलेला दगडी पाटा असायचा. पाट्यावर चटणी वाटणे, शेवया वा करंजीचं किंवा पापडाचं पीठ कुटणे व तेही वरवंट्याने, यासाठी उपयोगी पडायचा.

पाट्याचा दुसरा उपयोग, वडील किंवा आजोबा करीत. तो म्हणजे सणावारी केळीची पाने आणली की ती ताठ रहावीत म्हणून त्यावर पाटा ठेवला जाई. श्राद्ध पक्षाला पत्रावळीवर ठेवायलाही उपयोगात येई.

पूर्वी लग्नकार्य मांडव घालून घरीच होत असे. तेव्हा महिनाभर आधी दळण कांडणाला सुरुवात व्हायची. लग्नाच्या आधी हळद लागण्यापूर्वी घाणा भरला

जायचा तेव्हा मुसळे बांधून रोवळीत ठेवली जात व त्यांचा मान राखून जाते, पाटा इ.ना विश्रांती दिली जायची. आता कार्यालयात लग्ने होत असल्याने रेडीमेड सोपस्कार, केवळ अल्बमसाठी केले जातात.

आम्हाला वडिलांच्या बदलीमुळे घरं बदलावी लागत. काही घरात उखळ नसल्याने त्यांची जागा खलबत्ते घेत. काही खल दगडी होडीप्रमाणे, काही पितळी गोल वाटीप्रमाणे असत. लोखंडी खल व पहार बहुतेक असायचीच. त्यात कुटलेले दाणे, लसणीची कोरडी व ओली चटणी यांची चव निराळीच. उपासाचे पदार्थ कुटताना खलबत्ता पुन्हा पुन्हा धुतला जायचा. वेलदोड्याची पूड करण्यासाठी, औषधांच्या गोळींची पूड करण्यासाठी वा सूंठीची पूड करण्यासाठी छोटेखानी खलबत्ते असत. बुजुर्ग लोकांना कुटलेलं पान लागत म्हणून तो खलबत्ता सोफ्यावर असायचा. खलबत्यात कुटताना येणारा खण खण आवाज कानावर आला की समाधान वाटायचे. या सर्व वस्तूंच्या जागा व उपयोग ठरलेले असायचे.

त्यावेळच्या गृहिणींना बहुतेक Kaizan माहीत असावे. त्यामुळे a place for everything and everything in its place त्यांना ठाऊक असावे.

आमच्या लहानपणी बहुतेक सर्व भांडी-कुंडी तांब्या, पितळेची व लोखंडी होती. गरम भांडी उचलायचे चिमटे व तेही पितळेचे दोन प्रकारचे होते. एक गोल चोचीचे व दुसरे एक बाजू सपाट असलेले. लोखंडी चिमट्याना एका बाजूला गोल आकार दिलेला असायचा. ती बाजू पातेल्याच्या गळ्यात घालून ते चुलीवरून उतरवता येते. चिमट्याचे टोक दुधात वा आमटीत बुडायचे नाही. कोळसे वा निखारे उचलायचा किंवा पापड उचलायचे चिमटे सारखे जरी असले तरी अदलाबदल होत नसे.

दूध, तूप, दही, लोणी, ताक यांची भांडी खरकट्या भांड्यापासून दूर असत. आमची आई सर्वांना वाढून शेवटी जेवत असल्याने हात लागायचा प्रश्न यायचा नाही.

==========

पाटा-वरवंटा या शेजारी एक घुसळखांब असायचा. त्याला दोरीने रवी बांधून, ती दही असलेल्या डेऱ्यात घुसळले जाई.

आमच्या घरात घुसळखांब नव्हता. कारण तेवढे दूधदुभते नव्हते. ज्यांच्या घरी दुभती जनावरे असत त्यांच्या घरी घुसळखांब असायचा. डेरा भरून दही, तीन फूट लांब रवी घेऊन दही घुसळणे येऱ्या-गबाळ्याचे काम नाही. माझी आई कोळग्यात लावलेलं दही त्यातच घुसळायची. नंतर सर्व लोणी काढून, कढवून कणीदार तूप करायची. खाली जी बेरी उरायची त्यात गूळ घालून आम्ही खात असू.

आई लवकर उठायची. फरफऱ्या स्टोव्ह पेटवण्यासाठी काकडा रॉकेल तेलात बुडवून पेटवला व बर्नरच्या गळ्यात अडकवला की घरभर वास पसरायचा व आम्हा मुलांना जाग यायची. कारण चहाची तलफ. दूध पिण्याची सक्ती नव्हती पण तिची अपेक्षा होती.

चहा-पाणी झाले की अंथरूण-पांघरूणाची आवरा आवर. केर वारे.इ. लगेच चूल पोतेरे. शेगडीत कोळसे घालणे व चुलीच्या खुरावर रांगोळीची रेघ व हळद-कुंकवाची बोटे. वातावरण प्रसन्न होऊन जायचे.

मग बंब पेटवणे. ढलप्या टाकून जाळ झाला की कडकडीत गरम पाणी अंघोळीसाठी तयार व्हायचे. कधी कधी घरभर धूर व्हायचा. खाट पसरायचा.

घरातच विहीर होती. तेथून पाणी ओढून हंडे, घागरी भरायच्या. कपडे धुण्यासाठी डोण भरायची. अंघोळी झाल्या की कडकडून भूक लागायची. न्याहारीला भाकरी उरली असेल तर तेलमसाला-भाकरी. कधी दही-पोहे तर कधी लाह्याचं पीठ. कधी भाजक्या पोह्याचा चिवडा तर कधी फोडणीचा भात.

आमच्याकडे बिस्किटे करायचे पात्र होते त्यामुळे डबाभर बिस्किटे असत. पाव आणला तर पावाचं उप्पीट. सणवार असताना केलेले फराळाचे पदार्थ पुढे न्याहारीला पुरत. विकतचे वा हॉटेलचे पदार्थ कधीच बाहेरून आणले नाहीत.

==========

शालेय शिक्षण

घर शहापूर

My elder brother late Ashokdada says, ...

'This is regarding your memoirs in Sis'Brother's group.

Your admission to school in Shahapur. Perhaps I was in 10th at that time. School admission was not a big problem at that time. You were first admitted to predominantly girls school in Kore Galli. Possible reason, the teacher (Lingubai) was known and also staying in our Mirapur galli. She wanted male students in her class.

Later we thought it wil not be good to continue in girls school.One day I took you to another school in Hosur. We met Head Master there and explained the situation. He told that you will be admitted to Hosur School and can join immediately. He also told not to worry about papers. They will obtain from the previous school.

This happened without inviting displeasure of Lingubai.

After a few years, Sudha was possibly admitted to Girls school in Shahapur Kore Galli. Soon all of you shifted to Kolhapur and got admissions there.'

हो.

दुसरं एक कारण म्हणजे त्यांचा नातू माझ्या सोबतीने शाळेत यावा व शिकावे हा हेतू होता. चौथ्या इयत्तेपर्यंत मुलांची सोय होती. लिंगुबाईंचे शिंकवणे चांगले होते. त्यांनी शिकवलेलं गणित - उतरती व चढती भाजणी यांचा गुणाकार व भागाकार आजही आठवतो. मोडी लिपीची तोंडओळख पण झाली होती.त्यांचा दरारा होता.

'It was a very crucial and trying period for our parents to bring up five children with limited resources.

Following factors also got added.

1. Anna's illness for long period
2. Dilip's serious illness as a child.
3. Aajoba came to stay with us.
4. Anna's transfer to Bagalkot.

I really wonder how they could pull out of situation.

Especially I appreciate and adore Aai's mental and physical capacity. Herself reliance and other qualities also reflected post Anna's retirement.

Ok. Now from my memory lane:

Anna's health problems started when he was transferred from Terdal.At that time Dada (Ajoba) had visited us and suggested certain medicines.

The transfer from Terdal was to Gadhinglaj. We all traveled by train to Hukkeri and by road to Gadhinglaj.All household items were transported perhaps by road accompanied by a postman (Sondur). Dada was also staying with us.

Gadhinglaj postal premises (Office-cum-residence) were quite good and spacious.I got admitted to 9th class in high-school which was also a new building with open ground etc.

Anna did not really join in that office and soon we shifted to Shahapur.Anna perhaps joined in Head Clerk's Office near Belgaon Station. Later (after getting well from his illness) he worked in Belgaon Camp office.

Initially we were staying in Vengurlekar's house next to Kaku in Kacheri galli. Dilip was born there. I joined Chintamanrao High-school.

After a few months we shifted to Mirapur galli.This was a new house with three tenants. House rent was Rs. 25 per month.

Dr. Hukkeri treated Anna for quite a long time.Anna was perhaps on medical leave. I have learnt from mother, the quarters at Gadhinglaj was a haunted place. Problem started from there. Anna's

behaviour was some what erratic. He was not taking intrest in his work . Mother was worried. But by God's grace he was transferred to Belgaum HO. There Anna used to play tennis and then after he was transferred to Belgaum cantonment. When he was promoted as Postal Inspector, he worked from home. I have visited Patshapur, Bijapur,etc.along with him. Some time he was PM Sankeshwar, I have stayed with him many times. He had a good friendship with Mr.Ghaisas. We used to visit Shankaracharya, attended discourses in Math. We have done padyapooja of swami Shankaracharya at our residence. Then he was transferred to Bhusaval as he opted for Maharashtra. U may be knowing more in detail. I was quite young at that time.

I know about his transfer to Bhusaval.He came to Pune and was in our hostel for a day,before traveling further to Bhusaval.

Dilip got seriously ill when all of you had gone to Thane for Bapukaka's wedding. I was staying with Kaku and got very much worried when you did not return in time. Nobody told me anything.

As I remember Dilip generally kept well thereafter.I had taken him to Homeopathic Dr. Bakhare in Belgaon couple of times.'

Some old memories:

Before moving to Terdal (approx year 1946), we were staying in Belgaon. Initially in uncle's (Vaidya Ramumama) house. I remember some Aurvedic medicine were prepared there. Stock of various herbs etc. was there also. Person named Maruti used to work.

Mama was perhaps practicing from his house in Kore Galli, Shahapur (This is likely to be house of our grand-father Vaidya Mahadevshastri Joshi).

When Mama expired, we shifted to nearby house on Samadevi Galli. Bapukaka came to stay with us as he joined Lingraj College after his matriculation. He used to teach me Ramraksha.

Aai had taught me Padhe, Kostas, tithi, vaar and many other things. I was admitted to school in Ganpat Galli.

Mama's house was rented out. Later on the tenant Tirdikar became a big headache to Mami. She used to consult Appa Gadgil to get the house vacated.

==========

माझी शाळा.. माझा क्लास

मी कोल्हापूरला आल्यावर येथील शिक्षण पध्दतीत पडलेला फरक मला खूप जड गेला. विशेषतः इंग्रजी व गणित विषय अवघड जायचे, पण जिद्दीने त्यावर मात केली.सुदैवाने मित्र परिवार चांगला मिळाला. शिवाय अशोक पुण्याहून तिथल्या शाळेतले पेपर मिळवून पाठवायचा. हळूहळू दोन वर्षे गेली. SSC चं वर्ष उजाडलं आता निदान गणिताचा तरी क्लास लावायचा ठरलं.

माझ्या घराजवळच पेठे यांचे गणिताचे वर्ग होते. पेठे वकील असले तरी फक्त गणिताचे क्लास घेत. क्लास सकाळी सहा ते सात असायचा. त्यांनी गणिताची छान तयारी करून घेतली. त्यांचा पाठांतरावर भर होता.

क्लासमध्ये विशेष श्रेणीत उत्तीर्ण झालेल्यांचे फोटो लावले होते. तसेच शाळेतही एका बोर्डावर मेरीटमध्ये आलेल्यांची नावे होती.

मलाही वाटायचं, माझा फोटो क्लासमध्ये लागावा व शाळेच्या बोर्डावर नाव

लागावे. त्याप्रमाणे Higher maths मध्ये मी विशेष श्रेणीत उत्तीर्ण झालो व माझे स्वप्न साकार झाले. पुढारी पेपरमध्ये पेठ्यानी नाव छापले. संस्कृतसाठी शाळेतर्फेच विशेष क्लास होता.

==========

आमची NCC

चीन बरोबर झालेल्या युध्दातील दारुण पराभवानंतर सरकारला व जनतेला जाग आली व काश्मीर व लडाखचा बराचसा भूभाग गमावल्यावर आपण आपल्या सीमा राखण्यात अयशस्वी ठरलो यांची लाज वाटायला लागली. आपले लष्करी सामर्थ्य वाढवायला हवे याची जाणीव झाली. प्रत्येक वेळी मित्र राष्ट्रावर अवलंबून राहून त्यांचं मिंध्यत्व पत्करणे चूक आहे हे कळून चुकले. त्यामुळे काहीतरी लष्करी शिक्षण तरुणांना देण्याचा निर्णय झाला व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षण अनिवार्य झाले.

याच काळात आम्ही महाविद्यालयात प्रवेश घेतल्याने आम्हाला थोडेफार लष्करी शिक्षण मिळाले. खासबाग मैदानावर warm up साठी पळावे लागे. पायात जाडजूड बूट, कमरेला पट्टा व जाडेभरडे अंगाला न बसणारे कपडे घालून पळताना दमछाक व्हायची. लष्करी शिस्त पाळावी लागत असल्याने दया-माया नाही. तरीही काही विद्यार्थी काहीतरी क्लृप्ती काढून वेळकाढूपणा करत. जुन्या राजवाड्याच्या पोलिस स्टेशन मधून बंदुका (रायफली) आणायच्या व साफ करून कसा नेम धरून ३०३च्या गोळ्या झाडायच्या ते आम्ही शिकलो. रायफल खांद्यावर नीट व घट्ट धरून ती चालवली नाही तर खांद्याचे हाड मोडले जाणारच अशी भीती घातली जायची.

टेंबलाईच्या मैदानावर फायरिंग करताना नेहमी टार्गेटच पडे. झोपून फायरिंग करताना हाताची कोपर (ढोपरं) खरचटत. वेगवेगळ्या प्रकारचे वेष घेऊन लपलेल्या सैनिकांना दुरून शोधून काढताना मजा यायची. नाष्टा मात्र उत्तम असायचा. दूध,

कॅडबरी, फळं किंवा एखादा चटपटीत खमंग पदार्थ. कॅडबरी मी घरी आणायचो. घरी सर्वांना वाटायचो. कॉलेजचं एक्स्ट्रा लेक्चर असेल तर तसंच आम्ही कॉलेजला जात असू.

वारणा येथे आमचा कॅम्प होता. सात दिवस तंबूत राहिलो. उघड्या माळावर थंडीत कुडकुडत दिवस काढले. नाष्टा व जेवण फार चांगले असायचे. कोरडी शुध्द हवा, दमणूक यामुळे भूक लागायची व अन्न छान गोड लागायचे. रात्रीची गस्त घालत असताना डोळ्यांत झोप असायची पण सांगणार कुणाला ? पण त्या आठवणी ताज्या आहेत. कॅम्पला जाताना गोरा असलेला मी काळा-सावळा झालेला होतो.

==========

आमचे खेळ

काळ अर्थात ६१ पूर्वीचा.. अन् तोही शहापूर -बेळगावचा. लहानपणी विविध खेळ हे समीकरण असायचं.

अगदी बसायला यायला लागल्यापासून, रांगण्यापर्यंत, चालायला यायला लागल्यापासून धावायला यायला लागल्यापर्यंत जे खेळ खेळलो त्याची आठवण रोमांचकारी आहे. बसायला यायला लागल्यावर आईने हात धरून बोटांच्या साहाय्याने शिकवलेला खेळ म्हणजे, 'इथं इथं बैस रे मोरा, चारा खा पाणी पी व भुर्रकन उडून जा.' तर कधी आरामखुर्चीत बसून पायांवर धरून, आळंचो मळंचो..करत.. पाण्यात पडला पडला करत पायावरून उडी मारताना मजा यायची.

दुसरा खेळ म्हणजे डोक्यावरून पांघरूण घेऊन बागुलबुवा करत स्वतःच घाबरणे, किंवा एका खोलीतून दुसऱ्या खोलीत लपून लपंडाव खेळणे यात मजा यायची. नाहीतर भातुकलीच्या खेळात हमखास असणाऱ्या बाहुला-बाहुलीच्या लग्नात भटजीचा रोल आहेच. कधी तीन चाकी सायकल फिरवणे किंवा काठीचा घोडा करत मोठ्यांच्या पायात अडखळून काठी जप्त झाली की फुगारा निश्चित.

सरपटीत चेंडू टाकणे, बस, कोंबडा, बदकाला दोरी लाऊन गाडी गाडी करत ओढणे आलंच. पूर्वी लाकडी वा पत्र्याची खेळणी असत.

प्लास्टिकची खेळणी म्हणजे केसवाली हात-पाय व डोळे फिरवणारी बाहुली. ती श्रीमंतांची ऐट होती. लाकडी बाहुली त्रिकोणी आकाराची, तिला गोंबी म्हणत. कंटाळा येईपर्यंत तीच घ्यावी लागे. कधी कधी रंगीबेरंगी भिरभिरे मन रमवून जायचे.

आता धरून सुटे उभे रहायला आले की एक पाय नाचवत 'एक पाय नाचव रे गोविंदा, घागऱ्याच्या छंदा...' असं म्हणत चालायला लागलो की पांगुळगाडा ढकलत धडपडायचे असं बालपणी खेळत. आता आम्ही घोडे झाल्याने शाळा व खेळाचे प्रकार बदलत.

घरी आम्ही पत्ते, कॅरम, काचा-कवड्या घेऊन खेळत असू. घरातला पाट घेऊन तो उलटा करायचा व त्यावर खडूने चौकटी आखून सारीपाटासारखे खेळायचे. एक प्रकारे Ludo म्हणायला हरकत नाही. सोंगट्या म्हणून काचा. प्रत्येक भिडूचा

रंग वेगळा.आमच्याकडे कवड्या नसायच्या तेव्हा आम्ही चिंचोके वापरत असू. चिंचोक्याची एक बाजू घासून पांढरी करत असू. चिंचोके खुळखुळून टाकल्यावर पांढरी बाजू ज्यांची वर येईल ते दान. दुसऱ्याची सोंगटी मारताना देवाचा धावा करायचो. खूप वेळ खेळ चालायचा. कुणालाही तो खेळता यायचा.

दुसरा खेळ म्हणजे पत्ते. भिकार-सावकार, नऊ/दहा किंवा पाच, तीन, दोन. हात ओढायला मजा यायची. बदाम सात खेळ म्हणजे डोक्याला कटकट.

==========

आमचा दुसरा खेळ - गोट्या

अंगण मोठे होते. मित्रपरिवार मोठा. अंगणात एक खड्डा करून खेळत असू. दिवाळी वा उन्हाळी सुट्टी लागली की हा खेळ खेळायला भिडूंची कमतरता नसायची. मी जे वर्णन करणार आहे ते बेळगावी म्हणजे कर्नाटकी पध्दतीने खेळल्या जाणाऱ्या पध्दतीचे आहे. जो बोटांचा उपयोग करून गोटी मारू शकतो तो 'गंड' व हाताची मूठ उलटी करून गोटी खड्ड्याकडे ढकलतो 'ह्यंणती'. ठरावीक अंतरावर उभे राहून गोटी खड्ड्याकडे टाकायची. ज्याची गोटी खड्ड्याच्या जास्त जवळ त्यानं खेळाला सुरुवात करायची. तो 'गंड'. (हे अंतर टिचकीने मोजायचे.)

तो गोटीने इतर गोट्या दूर पळवायचा. तो चुकला की इतरांनी उलट्या मुठीने गोटी खड्ड्याकडे ढकलायची. गोटी खड्ड्यात पडली की तो गंड व्हायचा. मग एक दुसऱ्याला ह्यंणती करत खेळ लांबवायचा. सुट्टी संपली की सर्व मित्र त्या खड्ड्यात गोट्या टाकून खड्डा बुजवून टाकायचे. पुढील वर्षी खड्डा उकरून खेळ सुरू. तो बुजलेला खड्डा शोधण्यातही मजा यायची.

कधी कधी क्रिकेट खेळत असू. लाकूड कापून केलेली ब्याट, कापडी चिंध्या भरून केलेला चेंडू व शेजारी पीठाची गिरणी होती, तिच्या भिंतीवर खडूने रेघा मारून केलेले स्टंप हे साहित्य. चेंडू कापडी असल्याने मार लागायची भीती नाही. कधी कधी Ring Tennis खेळत असू. तो बायकी खेळ असला तरी कौशल्य

लागे. लपाछपी, चेंडू मारून बाद करणे, असेही खेळ असत.

श्रावण आला की सोमवारी व शनिवारी शाळेला अर्धी सुट्टी. मग घरोघरी झोपाळे बांधले जात. ज्वारीच्या लाह्या किंवा चिरमुऱ्याचा लाडू खात झोपाळ्यावर उंच झोके घेत दिवस कसा जाई ते कळत नसे. झोळीत बसून छान झोपही लागायची. दोरीवरच्या झोपाळ्यात जी मजा आहे ती लाकडी झोपाळ्यात नाही.

==========

खेळ - कॅरमबोर्ड

आमच्या घरी एक कॅरमबोर्ड होता. त्याला मजबूत अशी सागवानी चौकट होती. चार कोपऱ्यात चार भोके होती. सर्वसाधारणपणे त्यांचा आकार बऱ्यापैकी मोठा होता. खूरही उंच होते. त्यामुळे टेकण लावावे लागत नव्हते. काळ्या-पांढऱ्या छान सोंगट्या होत्या. लालभडक क्विन व हस्तिदंती स्ट्रायकर होता. किती जुना असेल माहिती नाही. आम्ही 'पैसे लाऊन' खेळत असू.

पैसे लाऊन म्हणजे पांढरी सोंगटी म्हणजे २० रू. व काळी सोंगटी म्हणजे १० रू. व अर्थात क्विनची किंमत २५ रू. थोडक्यात भिकार-सावकारचा खेळ. कधी कधी कोडे रचून खेळायचो. म्हणजे क्विनला पहाऱ्यातून सोडवायचे.

आमच्या शेजारी बुर्लबुड्डी नावाचे एक लिंगायत कुटुंब होते. त्यांनाही हा खेळ आवडायचा. चारही भावंडे होती. थोरल्या भावाला अण्णा म्हणत. त्याला पोलिस खात्यात नोकरी होती. तो अविवाहित होता म्हणजे अजून लग्न व्हायचे होते. त्याची धाकटी बहीण शांता घर सांभाळायची. तिचं लग्न ठरलं होतं पण झालं नव्हतं. तिसरा गुरू सिद्धप्पा कमी शिकलेला पण आर्टिस्ट होता. द्राक्षायणी अर्धवट शाळा सोडलेली, ती आमच्या बरोबर कॅरम खेळायची. जिंकलेल्या सोंगट्या कुणी पळवू नयेत म्हणून हातात ठेवायची. घामाने त्या ओल्या होत. सर्वांत धाकटा मल्लिकार्जुन हायस्कूलला शिकायला होता. दिवसभर खेळत असू.

हा कॅरमबोर्ड नंतर शुक्रवार पेठ कोल्हापूर, शनिवार पोस्ट करत शनिवार पेठेत

मान टाकता झाला. आमच्या वडिलांनी नंतर त्याचे टी-पॉयमध्ये रूपांतर करून घेतले. तो टी-पॉय अजूनही शिरीषच्या घरी असावा, पण काळाच्या ओघात कदाचित तो लोपही पावला असेल.

==========

बालपणीचा काळ सुखाचा

'जिगळी'

सुमारे ६५ वर्षांपूर्वीचा काळ असावा. आम्ही बेळगावला रहात होतो. घर भाड्याचे पण मोठे होते. लहानमोठ्या सात खोल्या होत्या. पुढं अंगण व मागे परसू. एक विहीर व थोडी बाग. घरात नुकतीच वीज आली होती. त्याचं अप्रूप होते.

उन्हाळी सुट्टी लागली की आम्ही कुणाकडं तरी गावी जात असू किंवा एखादे वर्षी आमच्याकडे पाहुणे येत. मुलं-बाळं,आत्या, मावश्या, काका, मामा व आज्या असा गोतावळा असे. घर भरून जायचे. आम्हा मुलांना ताकीद असे,घरात दंगा करायचा नाही. बाहेर खेळायला जायचं. आम्हाला खायला चिरमुरे, दाणे, चणे, लाह्या, चिकी, गूळ, इ. दिलं जायचं.

आमच्यातल्या ज्या मोठ्या बहिणी होत्या त्या स्वयंपाक करायचा घोळ घालायच्या. मग सारी भातुकली बाहेर यायची व खिडकीत संसार मांडला जायचा. साहजिकच आम्हा मुलांना बाजारहाट करायला हाकलले जायचे. तोवर इकडं स्वयंपाक व्हायचा. मेन मेनू म्हणजे दाणे फोडून त्यात गूळ भरून केलेले लाडू. पंगत बसली की जेवायला मजा यायची. कधी कधी सकाळी लवकर उठून फिरायला जायची टूम काढायचे. लवकर लवकर म्हटलं तरी आठ-साडेआठ वाजायचेच. जरा मेन रोडला गेले की ओळीने चिंचेची झाडे लागायची. चिंचा पिकून तयार होऊ लागलेल्या असायच्या. आम्ही दगड मारून चिंचा पाडायचो व मुली त्या गोळा करायच्या.

आता या चिंचांचे काय करायचे. आमच्यातल्या मोठ्या बहिणी तो प्रॉब्लेम पटकन सोडवायच्या. दुपारची जेवणे झाली की आम्ही परसदारी सावलीत खेळत असू. तिथं चिंचा सोलायचं काम मुलांचं. आतले चिंचोके काढलेली गाभूळलेली चिंच पाट्यावर वाटली जायची. त्यात थोडे मीठ व गूळ आणि भगवती टाकली जायची. (बेळगांवला मिरचीच्या पुडीला 'भगवती' म्हणतात.)

पुन्हा लाटून त्याचे लॉलिपॉपसारखे गोळे करून नवीन खराट्याच्या काड्या

टोचायच्या. की झाली जिगळी तयार. दोन-तीन तास ती चोखण्यात जायचे. ('जिगळी' हा शब्द कानडी असावा.) कधी कधी आम्ही उसाच्या घाण्यावर जात असू. लाकडी घाण्यावरच्या रसाला जी चव आहे ती मुंबईच्या रसवंतीला नाही. आलेपाक चिरमुरे व तांब्याभर रस पाच जणांना पुरे. चार आणे दिले की मोठा तांब्या भरून रस मिळे.

जवळच वडाचं झाड होते तेथे सूर पारंब्या, लपंडाव, पकडा पकडी असे खेळ खेळताना दिवेलागण कधी झाली ते कळायचं नाही.

==========

शिनुमा .....

चित्रपटाचा अन् तोही बोलपटाचा शोध, लागल्यानंतर मोठ्या लोकांपेक्षा लहान मुलांना जास्त वेड लागले. पण आई-वडिलांचा धाक असल्यानं त्यांची कुचंबणा होत असे. पूर्वी फक्त मंगळवारी व रविवारी संध्याकाळचा खेळ असायचा. कधी कधी शुक्रवारी पण तो लागायचा. दुपारच्या शो ला म्याटीनी म्हणत.

गावोगावी जाहिरात करण्यासाठी कापडी बोर्ड रंगवून घोषणा करत. गल्लोगल्ली ते गाडीवरून फिरवत. छापील जाहिराती रस्त्यावर फेकत जात. त्या पकडायला व गोळा करायला मुलं धावत जात. मोगले आझम, नया दौर, संत तुकाराम, आवारा वगैरे चित्रपटाच्या जाहिराती मी पाहिल्या आहेत. पाच आणे तिकीट असायचं. तिकिटाला लांबच लांब रांगा लागायच्या. रांगेत काळा बाजार वा ब्लॅक मार्केटिंग व्हायचे.

सुरुवातीला पहिली घंटा व्हायची व डोअरकीपर अर्धवट पडदा ओढून तिकीट चेक करत प्रेक्षकांना आत सोडायचा . बहुतेक खुर्च्या लाकडी असायच्या. चणे-फुटाणे घेऊन प्रेक्षक स्थानापन्न होत असताना दुसरी घंटा व्हायची व स्थानिक जाहिरातीच्या स्लाईड्स पडद्यावर डावीकडून उजवीकडे ओढून दाखवल्या जात व सोबत गाण्याच्या रेकॉर्डस् लावत. तिसऱ्या घंटेला पडद्यावर थरथरणारे 'भारतीय

समाचार चित्र' सुरू व्हायचे. नेहरूंचा दौरा, क्रिकेटच्या मॅचचा शॉट किंवा पावसाने केलेला हाहाकार हमखास असायचाच.

मध्यंतरात लोक बाहेर जाऊन चहा पिऊन व सिगरेट ओढून येत. कुणी भजी वा कुरमुरे खाण्यासाठी आणत. वडा-पाव तेव्हा नावारूपाला आला नव्हता. सिनेमा सुटल्यावर थिएटरची कंडिशन पाहवत नसे. सर्वत्र सिगारेटच्या पाकिटांचा सडा पडलेला असायचा. लहान मुलांनी सिनेमा पाहू नये असे आमच्यावर बिंबवले असल्याने आम्ही दुसऱ्या मार्गाने हौस भागवून घ्यायचो.

==========

आठवडी बाजार

सणावारी किंवा आठवडी बाजाराच्या दिवशी काठीला विविध फुगे, खेळणी वगैरे लावून फेरीवाला येई. त्यांच्याकडे सिनेमा बघायचं यंत्र मिळायचे. यंत्र म्हणजे पत्र्याची डबी, त्याला एका बाजूला नव्या पैशाच्या आकाराचं भिंग व दुसऱ्या भागाला फिल्म चार तुकडा लावायला खाच.

उजेडाकडे डबी धरून आम्ही चित्र बघत असू. चित्र कधी उलटं लागायचं, म्हणजे खाली डोकं वर पाय, तर कधी साडी नेसलेली मराठी बाई गुजराती बेन दिसायची. ती गंमत बघायला उत्सुकतेपोटी ओढाओढी, चिडाचिडी, रडारडी व्हायची. अशा अनेक फिल्मा आम्ही गोळा करायचो. जरा महागडं यंत्र प्लास्टिकचे असायचे व एकदम दोन फिल्म बघता यायच्या त्याही दोन डोळ्यांनी.

खरी मजा यायची ती चित्र पडद्यावर पाडताना. पडदा म्हणजे भिंत, पांढरा टॉवेल किंवा वाळत टाकलेलं पांढरं पातळ (साडी). तयारीला वेळ लागायचा, पण अल्पकाळ आनंद टिकायचा. प्रमुख कारण म्हणजे सूर्याचे किरण.

आमच्या घरासमोर एक वाडा होता. तो कौलारू होता. त्यातून कवडसा आत यायचा. माळ्यावर घाईघाईने मी अंधार करायचो. एकजण तो कवडसा फिल्मवर आरसा घेऊन पाडायचा. फिल्मवर फोकस करता करता नाकीनऊ यायचे.

क्षणाक्षणाला कवडसा पुढे सरकायचा. पुढे भिंग धरून चित्र पडद्यावर पडलेले पाहून आनंद व्हायचा. दहा-पंधरा मिनिटांत खेळ आटोपायचा.

कधी कधी बाजारच्या दिवशी डोक्यावर भलं मोठं काहीतरी घेऊन एखादा फेरीवाला यायचा. स्टॅन्डवर ते 'मशिन' ठेवायचा. त्या मशिनवर एक बाहुली असायची व एका हाताने तो फेरीवाला झांज वाजवायचा व बाहुलीला नाचवायचा. तोंडाने कानडीतून गाणं 'गर्दी गंमत नोडो' म्हणत मुलांना बोलवायचा. त्याच्या मशिनला चार गोल खिडक्या असायच्या. त्यातून आत पाहिले की ताजमहाल, नटनट्यांचे फोटो, देवाचे फोटो, वेगवेगळे सिन दिसत. फक्त एक आणा तिकीट असायचं. हिंदीत त्याला बाईस्कोप म्हणतात.

एका चित्रपटात (दुश्मन) याचा छान उपयोग केला आहे. पैसा फेको, तमाशा देखो अशा गाण्यावर मुमताजने नृत्य केले आहे.

आता बाजारात जायला कुणाला वेळ आहे ? परवा गप्पा मारत असताना हा विषय निघाला. खिशात चार पैसे खुळखुळायला लागल्याने माणूस आळशी व्हायला लागला. आमच्या लहानपणी प्रत्यक्ष बाजारात जाऊन बाजारहाट करावा लागे. प्रत्येक आठवड्याला एका ठरावीक दिवशी लोक बाजारात माल विकायला येत. प्रत्येक सिझनप्रमाणे माल बाजारात आणला जाई. आम्ही तेरदाळला असताना बहुतेक दर सोमवार बाजाराचा वार असायचा. अगदी भाजीपासून साडीपर्यंत सगळे स्टॉल लागत. आमच्या पोस्टाच्या क्वार्टर्स समोरील रस्त्यावर तंबूसारखी शेड बांधून विक्री सुरू होई. तो बाजारातला कलकलाट एक अद्‌भुत घटना असायची. आमची आई केरसुणी पासून होण्यापर्यंत खरेदी करायची. वेगवेगळ्या मिठाई बरोबरच धान्याची पोतीही विकायला यायची. दुपारी जेवण करताना पाणी मागायला काही जण यायचे व माझ्या हातावर लिमलेट ठेऊन जायचे. संध्याकाळ झाली की कलकलाट शांत होत जायचा व सर्व आपापला बाडबिस्तरा घेऊन परत जाताना किती गल्ला जमवला ते मोजून हिशोब करत. बंडीच्या आतील खिशात पुरुष लोक व बायका नऊवारी साडीच्या केळ्यात पैसे ठेवताना त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव पाहण्यासारखे असत. रात्र झाली की खेड्यातील शांतता बागुलबुव्याप्रमाणे वाकुल्या दाखवी.

शहरातला आठवडी बाजार शनिवारी वा बुधवारी असतो. एक भाजीवाले व

फळवाले सोडले तर बाकी सर्व दुकानदार दुकाने थाटून बसतात. कदाचित 'एकावर एक फ्री' च आमीष दाखवत असतात.

अगदी मोठ्या शहरात आठवड्यातील सातही दिवस आठवडी बाजार असतो. हव्या त्या वस्तू कधीही मिळतात, त्यामुळे आठवडी बाजाराचा फील येत नाही. 'गेला बाजार..लोण्यापर्यंत.' अशी मराठी भाषेतली म्हण फिकी पडत चालली आहे.

As I remember Thursday was market day at Terdal.

We had half day school mostly with weekly exam.

Also fresh ghee by melting butter (by the seller) was brought by us.

सर्व गोष्टींची उपलब्धता एकाच ठिकाणी, free home delivery, फक्त एक call आणि माल घरपोच, no cash payment वगैरे सारख्या सोयींनी माल संस्कृती फोफावत असताना आठवडी बाजार कुठल्या कुठे लुप्त झाला कळला नाही.

==========

टांगा

टांग्यावरून मला बेळगावची आठवण झाली. आमचा पाच नंबरचा टांगा होता. पहाटे वा अपरात्री टांगा हवा असेल तर आम्ही हा टांगा 'बुक'करत होतो. त्या वेळी ऑटोरिक्षा नव्हत्या.

जास्ती पॅसेंजर असतील तर 'धमनी' आणत असू. धमनी म्हणजे छप्पर असलेली बैलगाडी. त्या वेळी बेळगाव ते कोल्हापूर अशी जोडबस असायची. ड्रायव्हर नसलेल्या गाडीत बसताना मजा यायची. टांग्याच्या घोड्याला जो रंगीबेरंगी तुरा लावलेला असतो त्याची मला गंमत वाटायची. मला माझ्या मावसभावाने सांगितले होते की, तो तुरा खिळे ठोकून बसवतात. आम्ही अजाण असल्याने ऐकून

घेतले. बऱ्याचवेळी घोडा घसरून पडल्याने टांगा 'पलटी' व्हायचा. टांगेवाला पायाने टिंग टिंग अशी घंटी वाजवायचा. तो नेहमी लगाम घेऊन दांडीवरच बसून एक जादा प्यासेंजर घ्यायचा. रिक्षा येण्यापूर्वी ठाण्यात, कोर्ट नाका व टेंभिनाका ते स्टेशन असे टांगे प्रवासी वाहतूक करत. या टांग्याना दोन घोडे असत. माणसी भाडे चार आणे होते.

मुंजा मुलगा व नवीन नवरा-नवरीच्या लग्नाच्या मिरवणुकीला, पांढरे घोडे जोडलेल्या व सजवलेल्या बग्या आजही ठाण्यात आहेत. तसेच फेरी मारायला, सजवलेल्या बग्या, आजही मासुंदा तलावाच्या काठी उभ्या असतात.

==========

झोपाळा

कदाचित चित्रपटात वा बागेत झोपाळा तुम्ही पाहिला असेल. बागेत दिसणारा झोपाळा, लोखंडी साखळीने, बसण्यासाठी असलेल्या फळीला बांधलेला असतो.

पण मी आता वेगळ्या झोपाळ्याविषयी लिहिणार आहे.

श्रावण महिना सुरू झाला की घरोघरी सोप्यावर किंवा माजघरात झोपाळे बांधले जात. त्यासाठी दोरखंडाचा वापर केला जाई. पूर्वी घरोघरी विहिरी असत. पाणी काढण्यासाठी जो दोर वापरला जातो तो जुना झाला की झोपाळा बांधायला कामास येई. झोपाळा जमिनीपासून थोडा उंच बांधला की झोका घेताना पायाला ताण पडून व्यायाम होई. झोपाळ्यावर एकट्याने किंवा जोडीने बसून उंच झोका घ्यायला फार मजा यायची. उंच गेलेला झोका खाली येताना पोटात मात्र गोळा यायचा.

==========

छत्री

लहानपणी जबरदस्तीने रेनकोट अंगावर चढवला जाई जो नको असताना सुद्धा !

'छत्री चोरीला जाईल', 'वाऱ्याने उडून जाईल', 'मोठेपणी आणू '.. अशा अनेक प्रकारे समजावून पुन्हा रेनकोट अंगावर उतरवला जायचा. गबाळ्यासारखी दिसणारी, कुंचीप्रमाणे टोपी करकचून गळ्यात बांधली जायची.

दुसऱ्याची छत्री पाहून हेवा वाटायचा व अंगावरील रेनकोट पाहून हिरमुसलेपण यायचं. काळे वस्त्र अंगावर लेऊन हरण छाप छत्र्या बाजारात आल्या की आम्ही आशाळभूतपणे पहात असू

अजून किती दिवस थांबायचे ? किती पावसाळे पहायचे..?

शाळेत असताना 'छत्री'चे आत्मवृत्त लिहायला सांगितले की तळपायाची आग मस्तकात जायची. वाटायचे, रेनकोटाचे आत्मवृत्त का नाही विचारत ?

अशी ही छत्री, तिने काळ्या रंगाबरोबर पांढऱ्या रंगाशी मैत्री केली असून ती लग्न कार्यात, स्टुडिओत व शुटिंग करताना दिमाखात मिरवत आहे. प्रत्येकाचे दिवस पालटतात. आता छत्री रंगीबेरंगी फुलाफुलांची चित्रे असलेली, रंगीत दांड्याची झाली आहे.

या छत्रीने नम्र तरी किती व्हायचे ? ती आता कमरेत इतकी वाकली की पर्समध्ये लपून बसली. पूर्वी लाकडी दांड्या असलेल्या छत्र्या होत्या. वृध्द मंडळींची काठी उन्हात सावली व घेताना शस्त्र, म्हणून कामी यायच्या. पावसाळ्यात लाकूड फुगले की छत्री उघडताना नाकीनऊ यायचे. शर्टाच्या कॉलरला मागे छत्री अडकवायची फॅशन होती.

काळ्या छत्र्यांमुळे त्यावर नाव लिहिणाऱ्यांना काम मिळाले, छत्री दुरुस्त करणाऱ्यांना काम मिळाले. डोईवर छत्रचामर असणं हे राजेपणाचं लक्षण आहे.

आता जग कितीही जरी पुढे गेलं तरी छत्री आपलं अस्तित्व घालवून बसणार नाही. रंग, रूप पालटले तरी तुमची साथ सोडणार नाही.

==========

सण-उत्सव

नववर्ष

नवीन वर्ष सुरू झाले की, Happy New year वगैरे करण्याची पध्दत होती की नाही मला आठवत नाही. पण संक्रांतीची वाट मात्र आम्ही उत्सुकतेने पहात असू.

बाजारात तेव्हा छोटे छोटे काचेचे त्रिकोणी वा चौकोनी डबे मिळत. त्यात हलवा भरायचा व शेजारी-पाजारी आणि मित्राना वाटायचा. संध्याकाळपर्यंत तो डबा किती भरला आहे याची स्पर्धाच असायची म्हणाना. रंगीबेरंगी हलवे डब्याच्या काचेतून पहायला गंमत वाटायची. दुकानातून आणण्यापेक्षा घरी हलवा करणे सर्वांना आवडायचे. काटेरी, एकसारखा व पांढराशुभ्र हलवा करणे कौशल्याचे होते. तसा हलवा आता करणं शक्य नाही. कारण घरोघरी ग्यास वा मायक्रोओव्हन आले असल्याने त्यावर हलवा कसा होणार ?

==========

संक्रांत

'तिळगूळ घ्या गोड बोला' अशा शुभेच्छा देत आम्ही 'साखरेचा हलवा'च देत असू.

तिळगुळाचे लाडू किंवा ते न जमल्यास वड्या करण्याची पध्दत मुंबईची असावी. आमच्या आईने कधी तिळगुळाचे लाडू केलेले आठवत नाही. शेंगाचं पोतं व गुळाची ढेप घेतली की गुडदाणी मात्र नक्की व्हायची.

दरवर्षी संक्रांत हटकून १४ जानेवारीला यायची. त्याप्रमाणे त्या सणाचे नियोजन व्हायचे. एक म्हणजे हलव्याची तयारी व संक्रांतीच्या दिवशीच गुळाची पोळी. तेव्हा खूप थंडी पडायची. आई मग लवकर उठून शेगडी पेटवून हलवा करायची.

दोन-तीन दिवस हा कार्यक्रम चालायचा. जितका बारीक व लांब काटा येईल व पांढराशुभ्र हलवा होईल याला महत्त्व असायचे.

तो करत असताना थोडे चिरमुरे, काजू, डाळं, शेंगदाणे, बदाम टाकले की त्यांनाही छान काटा यायचा.ह्याचा उपयोग हलव्याचे दागिने करण्यासाठी व्हायचा. खायचा रंग शक्यतो केशरी, टाकून हलव्याला छान रंग आणला जाई. बोरन्हाणं किंवा लग्नानंतर हलव्याचे दागिने घालून सण साजरा केला जात असे.

आता ही प्रथा लोप पावत चालली की काय असे वाटते. काही हौशी लोक अजूनही, भाड्याने दागिने आणून, फोटोसाठी सण साजरा करतात. पूर्वी छोट्या छोट्या पाऊचमध्ये हलवा भरून, त्याला पिवळ्या रंगाचे लेबल व त्यावर पत्ता लिहून पोस्टाने पाठवण्याची पद्धत होती. आता राहिले गुळाच्या पोळीविषयी. पूर्वी गहू छान मिळायचा. मला वाटते खपली गहू असावा. त्याची कणिक मळून घेणे व त्यात पुरण भरण्यासाठी गूळ तयार करणे महत्त्वाचे असते. गुळ खिसून त्यात जायफळ व वेलदोड्याची पूड टाकली की खमंग वास सुटायचा.

एकंदरीत, गुळाचा पाक करताना हळी खमंग वास येत नाही. योग्य प्रमाणात गूळ व कणिक घेऊन पोळी लाटताना ती फाटली तर, गूळ बाहेर आला तर किंवा पोस्टाच्या तिकिटाप्रमाणे काठ राहिले तर तुम्ही नापास..! भरपूर तूप व दूध बरोबर असले की अमृतालाही लाज वाटेल असे जेवण व्हायचे. आता सुध्दा संक्रांत येते जाते, पण आठवणीत रहात नाही. आपले सण पुन्हा पुनर्जीवित करायला काय हरकत आहे?

==========

होलिकोत्सव

संक्रांतीनंतर येणारा सण जो आम्ही साजरा करायचो तो म्हणजे होळी. आमच्या गल्लीत एक रामाचे देऊळ होते. आजही आहे. त्या देवळासमोर होळी पेटवली जाई. त्यादिवशी सकाळी काही जण घरोघरी जात व पाच लाकडं व पाच शेणकुटे गोळा

करीत. त्या वेळी घरोघरी चुली असायच्या. त्यामुळे होळीसाठी लाकूड व शेणी खूप मिळायच्या. रात्री होळी पेटवली जायची.

मुंबई-पुण्यात होळीच्या दुसरे दिवशी धुळवड असते. लोक रंग टाकतात व डीजेवर कर्णकर्कश संगीत लाऊन नाच करतात. तसा आमचा प्रकार नसायचा. होळीनंतर पाच दिवसांनी रंगपंचमी यायची. तेव्हा रंग उडवला जायचा. शहापुरात बरेच हातमाग होते. हौद भरून विविध रंग तयार केले जात. त्याचा उपयोग सूत रंगवण्यासाठी करतात. त्यातला उरलेला रंग आम्ही आणत असू. होळी म्हटलं की पुरणपोळी आलीच. होळी झाल्यावर, एखादी पावसाची सर येऊन होळी शांत करत असे. राजकीय हस्तक्षेप नसल्याने सर्व कार्यक्रम कुरघोडी शिवाय उत्साहात पार पडे.

==========

चैत्रांगण व चैत्रागौरी...

आमच्या घरी काकूंकडे (भागूमावशी) चैत्र महिन्यात गौर बसवून पूजा करण्याची प्रथा होती. आमच्याकडे झोपाळ्यावर बसलेली एक गौरीची पितळी मूर्ती होती. ती पेटीतून काढायची. चिंच लाऊन लखलखीत करायची. नवीन कापडाचा हिरव्या रंगाचा परकर-पोलका शिवायचा व गळ्यात काळ्या मण्यांची माळ व हिरव्या बांगड्या घालून तिच्या प्रतिष्ठापनेची तयारी करायची.

गुढीपाडव्याला गुढी उभारायची. चाफ्याच्या फुलांची व साखरेची माळ घालायची. कुणी हात लावू नये व शिवू नये म्हणून लक्ष ठेवण्याचे काम आमचं असायचं. पाडवा म्हटलं की, श्रीखंड किंवा बासुंदी हा नेहमीचा बेत. सारा सोवळ्यातला स्वयंपाक. नैवेद्य झाल्याशिवाय जेवणं नाहीत.

==========

चैत्रांगण काढायचं काम असायचं कुंदाचं. अंगण सारवून बारीक रेखानी पारंपरिक चित्र रेखाटणे सोपे नव्हते. सर्व चित्रे लक्षात ठेऊन मध्ये गौरीची मूर्ती रेखाटली

की रांगोळी उठावदार व्हायची. आता यू ट्यूब वा रांगोळीच्या पुस्तकाचा आधार घ्यावा लागतो.

चैत्र महिना म्हणजे आंब्याची डाळ, कैरीचे पन्हे यांची चंगळ असायची. आई हळदी-कुंकवाला गेली की आंब्याची डाळ व ओटीचे हरभरे भरपूर यायचे. हरभऱ्याची उसळ व चटपट चणे ठरलेलेच. मधूनच कधी सोलाणा व उसाचे कर्वे असायचे. (सोलाणा म्हणजे ओला हरभरा)

==========

चैत्रागौरीचं हळदी-कुंकू

हळदी-कुंकू करण्याचं ठरलं की दोन दिवस आधीपासून सुरुवात व्हायची. कारण हरभरे व हरभरा डाळ भिजत घालावी लागायची. हरभऱ्याला मोड येऊ नये म्हणून लक्ष ठेवायला लागे. आदल्या दिवशी आंब्याची डाळ करून कैऱ्या उकडून ठेवायच्या व ऐनवेळी आंब्याचे वेलदोडायुक्त पन्हं करायचं असा बेत असे.

हळदी-कुंकवाच्या दिवशी आरास करायची. घरात ज्या वस्तू असत त्याचाच उपयोग करायचा. पेटीवर पेटी वा ट्रंक ठेवून बैठक तयार करायची व रंगीत लुगड्यांचा उपयोग करून मांडव करायचा. गौर सजवून बाजूला समया व देवीची ओटी ठेवायची. पुढे छान छान शोभेच्या वस्तूंबरोबर फराळाचे जिन्नस ठेवायचे. त्यादिवशी स्वच्छ प्रकाश पडावा म्हणून आम्ही एक ग्यासबत्ती भाड्याने आणायचो.

घरात अत्तराचा सुगंध दरवळायचा. संध्याकाळ झाली की शेजारी-पाजारी व नातेवाईक येऊ लागत. खूप उशिरापर्यंत हा कार्यक्रम चालायचा. एक मोठे उत्सवाचे वातावरण असायचे. आराशीचे कौतुक व्हायचे. फराळाचे कौतुक व्हायचे. एकमेकांच्या घरी येण्याचं निमंत्रण दिले जायचे. मग गणपती पर्यंत फारसा कार्यक्रम नसायचा.

==========

गणेशोत्सव

घरी, शाळेत व सार्वजनिकरित्या होणारा गणेशोत्सव म्हणजे पर्वणीच असायची. याला कारण म्हणजे शाळेला असणारी दहा दिवसांची सुट्टी. अभ्यासाला अगदी पूर्णविराम. मला आठवते त्याप्रमाणे मी होसूर येथे आठ नंबर म्युनिसिपल स्कूलमधे शिकत होतो. तेथे संपूर्ण प्राथमिक शिक्षण झाले.

शाळा तीन इमारतीत भरायची. मोठ्या इमारतीतील मधला वर्ग मोठा होता. तेथे पताका वगैरे लावून सजावट केली जायची. पूजा-आरती झाली की प्रत्येक वर्गाचे विविध करमणुकीचे कार्यक्रम होत. माझापण कुठं ना कुठं सहभाग असायचा.

आमच्या घरी दीड दिवसाचा गणपती असायचा. गणपतीच्या मूर्तीची आगाऊ नोंदणी करावी लागत नसे. फक्त आदल्या दिवशी मूर्ती घरी आणली की झाले. घरी आईचे सोवळे-ओवळे असल्याने उगाच सजावट नसायची. घरी टेबलावर पाट ठेवून मूर्तीची स्थापना केली जायची. पूजेला राम भटजी यायचे. एकदा सोवळ्याने पूजा झाली की टेबलाला आम्ही ओवळ्याने शिवत नसू.

दर्शनाला येणाऱ्याला दुरूनच दर्शन घ्यावे लागे. आई मोदक करायची. मोदक करण्यासाठी आमचेकडे तांब्याचे मोदक पात्र होते. मोदकांची उक्कड नेहमी जास्ती व्हायची. मग शेवटच्या घाण्यात उकडीच्या तिखट-मीठ व जिरे घातलेल्या पापड्या व्हायच्या. त्या आम्हाला खूप आवडायच्या. बघता बघता दीड दिवस कधी निघून जायचा कळायचं नाही. गणपती विसर्जन घरातील विहिरीवर होत असल्याने घाई नसायची. गणपती विसर्जन झाल्यानंतर जो नारळ फोडला जातो त्याचे तुकडे, चिरमुरे व बत्तासे यांचा प्रसाद काही न्याराच लागायचा.

आमच्या मिरापूर गल्लीत एक रामाचे देऊळ आहे. तेथे गल्लीतला सार्वजनिक गणेशोत्सव व्हायचा. रात्री विविध करमणुकीचे कार्यक्रम केले जात. मंदिरासमोर माझ्या मामांचे घर होते. त्यामुळे कार्यालयात माझी मामेबहीण (लीला) गाणी म्हणायची. 'झुक झुक आगीन गाडी, दिसेल सासऱ्याची माडी' असे काहीसे ते बोल होते. आता आपण जे गाणे ऐकतो ते त्या गाण्यावर बेतलं असावं.

शहापूर व बेळगावात अनेक ठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा होतो.

सजावट व रांगोळ्या डोळ्याचं पारणे फिटेल इतक्या सुंदर असतात. ढोलताशे वा कर्णकर्कश डिजे नसल्याने त्रास होत नव्हता. आता ते दिवस फक्त आठवायचे व कॅलेंडरवरचा एक दिवस पुढे ढकलायचा.

==========

आठवणीतील दसरा

सुमारे ४२, ४३ वर्षांपूर्वीचा काळ. आम्ही घंटाळी कॉलनी येथील संयोग बिल्डिंगमध्ये रहात होतो. माझी मुलगी लहान होती. तिला फारसे रेडिमेड कपडे घ्यावे लागले नाहीत. कारण माझ्या बहिणीचे यजमानच शिवून देत. त्यांची शिलाई एवन असायची.

माझ्या मुलीला कोणताही ड्रेस शोभून दिसायचा. दसऱ्याला आम्ही पहिली maxi शिवली होती. त्यावेळी मोबाईल नव्हते नाही तर फोटो काढले असते. दसऱ्याला आमचा कार्यक्रम ठरलेला असायचा. सर्व काही आवरून नवे कपडे घालून घंटाळी देवीच्या दर्शनाला जायचे. नंतर थेट मावशीकडे सोनं द्यायला जायचे. ती नेहमीप्रमाणे वाट पाहत असायची. तिचे यजमान आम्हाला लक्ष्मी-नारायणाची उपमा द्यायचे. सोनं देऊन नमस्कार झाल्यावर थोडी बासुंदी व श्रीखंड असायचे. दुपारी आम्ही दादरला वडील बंधूंकडे जात असू. तेथे हमखास बटाटे वडे असतच.

==========

आमची दिवाळी

असं वाटायचं की नवीन कपडे शिवून घ्यायचे व भरपूर फराळाचे पदार्थ तयार करायचे. फटाके आणायचे इ.

आमचा एक टेलर होता. त्याला घरी बोलावले जाई. तो मापं घेऊन जायचा व सर्वांचे ड्रेस शिवून द्यायचा. खूप दिवसांनी नवे कपडे मिळणार याचा आनंद काही

औरच असायचा.

चिवडा, चकली, करंजी, लाडू, शंकरपाळी, अनारसे यांनी जमतील तसे डबे भरले जायचे. त्याचं मोठं अप्रूप वाटायचं. राजाला दिवाळी ठाऊकच नाही असं का म्हणतात ते कळायचं. वर्षातून एकदाच म्हैसूर स्यांडल सोप, सुगंधी तेल व उटणे.

घरकाम करण्यास मोठ्या बहिणीची मदत व्हायची. स्वच्छता व टापटीप यात तिचा कुणी हात धरू शकणार नाही. वडील जरी फिरतीवर असले तरी दिवाळीला नक्की येत. घर भरून जायचं.

माझा मोठा भाऊ दोन आकाशकंदील करायचा. एक आपल्यासाठी व दुसरा आमच्या मावशीसाठी. बजेटमध्ये बसतील असे फटाके विकत आणले जात. आमच्याकडे एक अल्युमिनियमची बंदुक होती, पण ती कशी चोरीला गेली कळली नाही. नरक चतुर्दशीच्या दिवशी सकाळी बायकांची न्हाणी होताना छोट्या फटाक्यांची माळ लावताना मजा यायची. फुलबाजाना कर्नाटकात चंद्र-ज्योती म्हणतात. तडतडणाऱ्या फुलबाज्यांची भीती वाटायची. सुतळी बाँबचे तर नावच नको.

दिवाळीच्या आधी घागरी, हंडा व बंब यांना चिंच लावून चकचकीत करून वर चुन्याची बोटे ओढून कार्याचा वेल घालून पूजा करायची व ती कारटी पायानं चिरडायची. सर्वप्रथम औक्षण व अंगाला तेल आणि सुगंधी उटणे लावून कडकडीत ऊन पाण्याने अंघोळ.

नवीन कपडे घालून देवदर्शन व घरी आल्यावर फराळ. आईच्या फराळात एक वैशिष्ट्य म्हणजे सांडगी मिरची घातलेले दही पोहे व तारफेणी. तुळशीच्या लग्नापर्यंत रोज फराळ व अभ्यासाला सुट्टी. शेजारी-पाजारी ताटभरून फराळ पाठवत. आमच्याकडूनही रिकामं ताट जायचं नाही. 'दसरा दिवाळी हा सण मोठा, नाही आनंदा तोटा.'

कधी आम्ही किल्ला करत असू. उत्साह दांडगा पण तो सांभाळण्याचा कंटाळा. बघता बघता दिवाळी संपून जायची व शाळा व अभ्यास यांचे वेध लागायचे. आहे त्यात आम्ही समाधानी होतो. सर्व गोष्टी सांभाळून आई कशी करायची देव जाणे. कधी चिडचिड नाही, राग नाही, कष्टाला तर सीमा नाही.

==========

देव दिवाळी

चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण कुटुंबात 'देव दिवाळी' साजरी करतात. खरं पाहिले तर दिवाळी किंवा दीपोत्सव द्वापार युगातला. नरकासुराचा वध करून १००८ स्त्रियांची सुटका केल्यानंतर जो आनंद व्यक्त केला गेला त्या वेळची अंघोळ म्हणजे शुद्धीकरण. त्रेतायुगात, रावणाचा वध करून श्री राम अयोध्येला परतल्यावर गुढ्या उभारून त्याचे स्वागत अयोध्यावासियांनी केले तो दिवस म्हणजे चैत्र प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडवा.

तसेच मार्गशीर्ष अमावास्या म्हणजे खरी दिवाळी ती देव दिवाळी. कोंकणात अजूनही ती साजरी करतात. त्या दिवशीचं पक्कान्न म्हणजे तांदळाच्या पिठाचे वडे (पुऱ्या) व ओल्या नारळापासून (खोबऱ्यापासून) काढलेले दूध वा तांदूळाच्या पिठापासून तयार केलेला खसखस-वेलची घालून केलेला गोड रस. नेहमीप्रमाणे देवाना सुगंधी अत्तर व तेल लावून गरम पाण्याने स्नान व पूजा. वडे रसाचा नैवेद्य इ.

==========

देवशयनी एकादशी

वैशाखातला जीवघेणा उकाडा. गाभाऱ्यात हवा खेळत नाही. नीट उजेड नाही. विविध फुलांचा, फळांचा व भारंभार तुळशीचा वास यांनी विठुरायाचे मस्तक भणभणले होते. दूध, तूप, दही, लोणी, मध यांनी अंगाची चिक चिक झाली होती, त्यातच हे बडवे घागरीच्या घागरी गरम पाणी ओतत होते. सांगणार कुणाला?

त्यात उशिरा झोपणं व भल्या पहाटेचं उठणं, नित्याचं झालेलं. त्यातच आमचे भक्त टाळांच्या ठणठणाटात आळवून झोपेचं खोबरं करत. म्हणे,' ऊठ पंढरीच्या राजा, वाढ (फार) वेळ झाला.' आता फार वेळ कुठे झाला, जरा डोळा लागला नी उठायची वेळ झाली.

रखमाबाईना सांगावं म्हटलं तर त्या आहेत कुठे जाग्यावर? मेकअप चालला असेल पडदा टाकून. तेव्हा भक्तांचा मोर्चा आमच्या फ्लॅटवर. शेवटी उभं रहायचं

आहेच विटेवर, कमरेवर हात ठेवून. हे भक्त असे आहेत ना, की पायावर डोके ठेऊन, ठेऊन पायाला खड्डे पडले आहेत. वीट तरी मोठी आहे का ? सारखी कसरत करायला लागते.

एकदा आषाढी एकादशीच्या पालख्या येऊन गेल्या की सुटेन. काय, गर्दी की काय? मुंबईची लोकल बरी. भीमेचा पूर, पावसाची संततधार, सगळीकडे रबरबाट.. जीव वैतागून जातो. मंत्री महाशयांच्या हातून अभिषेक, आरत्या व फोटोसाठी धक्काबुक्की, नको ते टी. व्ही. वर दिसणं. कुणाकडे दाद मागणार ? तोंड दाबून ... कधी एकदा द्वादशी उजाडते व चार महिने विश्रांती घेतो असं वाटतं पण त्याचाही इव्हेंटच.

==========

माझी महाविद्यालयीन शिक्षण

S. S. C. नंतर पुढे काय हा इतरांसारखा आम्हालाही प्रश्न पडला. कोणतीही जरी शाखा ठरविली तरी आर्थिकदृष्ट्या ती परवडते की नाही हे पाहणं महत्त्वाचं होतं.

मोठ्या भावाला नुकतीच नोकरी लागली होती तरी वडिलांची निवृत्ती जवळ येत चालली होती. सेवेत बढती होणार होती, पण मुंबई गाठावी लागली असती. शिवाय दोन अपंग मुले व धाकट्या मुलीच्या शिक्षणाची आई-वडिलांवर जबाबदारी होती.

शेवटी मी माझ्या मेरिटवर राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. सरकारी कॉलेज असल्याने फी कमी होती. Donation ची भानगड नव्हती. माझ्या National Scholarship व Open Merit Scholarship थोडक्यात हुकल्या.

राजाराम कॉलेज हे आर्ट्स व सायन्स कॉलेज होते. सायन्स कॉलेज लक्ष्मीपुरीत व आर्ट्स कॉलेज जुन्या राजवाड्यात होते. मला विषयानुसार दोन्हीकडे जावे लागे. सुदैवाने दोन्ही ठिकाणं आमच्या घराजवळ होती. आम्हाला लाभलेले सर्व शिक्षक उत्तम होते. क्लास वगैरे लावावा लागला नाही. मराठी शिकवणारे प्रा. कुलकर्णी आमच्या घरासमोर रहात व त्यांचा मुलगा माझा वर्गमित्र होता. मराठी विषयाच्या पुस्तकाचे संपादन (नाव-साहित्य परिमल) प्रा. कुलकर्णी यांनी केलं असल्याने छान शिकवत.

दुसऱ्या वर्षी pre professional engg. विषय घेऊन मी Distinction मध्ये उत्तीर्ण झालो. पण... पुन्हा पुढील शिक्षणाचा व खर्चाचा प्रश्न आ वासून पुढे उभा राहिला.

==========

महाविद्यालयीन शिक्षण घेताना 'राष्ट्रीय संरक्षण निधी'ची कल्पना पुढे आली व समाजातील सर्व थरातील लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला. लोकवर्गणीतून वैजयंता हा भारतीय बनावटीचा रणगाडा भारतीय लष्कराला अर्पण करण्यात आला. मला

वाटतं त्याच सुमारास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना दिल्लीचं बोलावणं आलं व ते संरक्षण मंत्री झाले. हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धाऊन गेला.

आमच्या वर्गातल्या एका विद्यार्थ्याने हातातली सोन्याची अंगठी संरक्षण निधीला दिली. अनिल आठल्ये असे त्याचे नाव. पुढे तो NDAत दाखल होऊन कर्नल पदापर्यंत पोचून निवृत्त झाला.

==========

इंजिनीअरिंग शाखेकडे वळायचे ठरल्यावर चौकशीस सुरुवात झाली. तोपर्यंत मी व मित्राने IIT entrance ची परीक्षा द्यायचे ठरवले. ती परीक्षा पुण्याच्या इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये होती. मी क्लास वगैरे लावला नव्हता. परीक्षा कशी असते ते माहीत नव्हतं.

एक दिवस मी मित्रांकडे व एक दिवस भाऊ काकांकडे राहिलो. जेमतेम पैसे बरोबर होते. परीक्षा दिली पण यश आले नाही. जरी यश आले असते तरी आर्थिकदृष्ट्या परवडणारे नव्हते.

शिवाजी युनिव्हर्सिटीच्या कक्षेत दोन इंजिनीअरिंग कॉलेज होती. कराडचे कॉलेज सरकारी होते. ते मला परवडणारे होते पण प्रवेश मिळाला तो सांगलीच्या वालचंद कॉलेजमध्ये. श्रीपाद वाटवे जवळच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये नोकरीला होता. त्याच्या मदतीने प्रवेशाचे सोपस्कार पूर्ण केले. होस्टेलमध्ये जागा मिळाली व माझा बाडबिस्तरा घेऊन मी वालचंदमध्ये आलो.

हल्लीच्या मुलांप्रमाणे माझ्याबरोबर कधीही आई-वडील आले नाहीत. कधी काळजी केली नाही, आमचे आम्हीच सर्व म्यानेज केलं.

==========

आता बाकीच्या गोष्टींची जुळवाजुळव करायची होती.

दहावी पासून माझ्याबरोबर असणारे माझे मित्र येथेही माझ्या सोबत होते. आताही माझी Open Merit Scholarship हुकली. शेवटी Government loan

scholarship चा पर्याय निवडला. ती परस्पर कॉलेजमध्ये जमा व्हायची. नोकरी लागल्यावर ती फेडायची होती. त्यावर कोणतेही व्याज नव्हते.

माझ्या वडिलांनाही postal employes fund मधून मदत मिळत होती. त्यामुळे पैशाची अडचण दूर झाली. मी चारही वर्ष क्लास लावला नाही. थोडी लागणारी अवजारे (for practical) माझ्या आतेभावाने म्हणजे प्रभाकर जोग याने दिली. लागतील तेवढीच second hand पुस्तके खरेदी केली. मोठ्या भावाची instrument box माझ्याकडे होती. त्यानेच जर्मनीहून slide rule पाठवली. इंजिनीअरिंग ड्राईंगसाठी mini drafter परवडत नव्हता म्हणून मी लाकडी Tee Square विकत घेतला. प्रभाकर जोग मला दोन वर्षानी senior होता. तो स्वतंत्र खोली घेऊन रहायचा. या सर्व नातेवाइकांनी मला आधार दिला. दोन्ही वेळा जेवण mess मध्ये असायचे. महिना ४५ ते ५०रू बिल यायचे. आम्ही रूमवरच इलेक्ट्रिक हीटरवर चहा करून प्यायचो. काही जण पकडले जात. दर शनिवारी-रविवारी मी घरी तरी येई किंवा सांगलीला नलूताई, अनुअक्का, मंदा यांच्याकडे व मिरजेला अक्का मावशीकडे जात असे.

==========

नेमका आमच्याच वेळेला तीन वर्षाचा कोर्स चार वर्षांचा झाला. एकूण आठ परीक्षा व त्याही विद्यापीठाच्या. अभ्यासक्रमात फेरफार झाले व इलेक्ट्रॉनिक्सची नवी शाखा सुरू झाली.

जुन्या कोर्सचे विद्यार्थी एक वर्षाने जाणार असल्याने व नवीन विद्यार्थी प्रवेश घेत असल्याने आम्हाला एक वर्षभर एका खोलीत तीन विद्यार्थी असे रहावे लागले. दरवर्षी २६ जानेवारीला गार्डन पार्टी असायची. त्या वेळी पालक व पाहुणे आवर्जून येत. मी सर्वांना बोलावून पार्टी देत असे. खूप मजा यायची. संगीत, बागेतील डेकोरेशन, बाजूने जाणारी मिरज-सांगली झुक झुक आगीन गाडी.. फार सुंदर दृश्य असायचे.

==========

NCC

येथे ही NCC ने आमची पाठ सोडली नाही. आठवड्यातून एक दिवस परेड व लेक्चर असत.

आमचा कॅम्प खडकीला होता. आधीचा अनुभव होताच. जिथं सर्वसामान्य जनतेला प्रवेश नसतो असा खडकीचा संपूर्ण भाग पाहिला. बंदुकीच्या गोळ्यांचा कारखाना पाहिला. Communication system, transport, security वगैरे पाहिले. पहिल्या वर्षी civil, mechanical व electrical एकत्र होते. सौ. अनुअक्काचे यजमान M. D. Patavardhan आमचे practical घेत.

दुसऱ्या वर्षाला फक्त mechanical व electrical विषय होते. तिसऱ्या व चौथ्या वर्षाला फक्त electrical होते.

Generation and Transmission हे विषय घेऊन मी B. E. झालो. गणित शिकवायला प्रा. केतकर होते. ते लोकमान्य टिळक यांचे नातू होत. Electronics शिकवायला प्रा. जोशी होते. ते आकाशवाणी केंद्रावर आधी होते. त्यांच्यामुळे व मित्राच्या ओळखीने सांगली आकाशवाणी केंद्र पाहता आले. प्रा. R. R. Marathe हे Electrical Engineering विषय शिकवत. (ते सौ. आरतीचे वडील होत.) असे ते दिवस होते.

==========

बघता बघता इंजिनीअरिंगची चार वर्षे कशी गेली ते कळलं नाही. या काळात आम्ही शुक्रवार पेठेतून शनिवार पेठ पोस्ट ऑफिसच्या क्वार्टर्समध्ये रहायला आलो. पुढे पोस्ट ऑफिस व मागे अंगण व घर, असे ते घर होते. दोन मोठ्या खोल्या, मोठे स्वयंपाकघर, कोठीची खोली, सर्पण ठेवायची खोली, प्रशस्त न्हाणी घर व बाहेर संडास व पाण्याची टाकी, अंगणात आंब्याचे व डाळिंबाचे झाड, गुलाबाची झाडे वगैरे. पोस्टात येणाऱ्या जाणाऱ्यांची जाग होती. कडकट्ट कडकट्ट तारायंत्र वाजत असायचे.

या घरात असताना माझ्या मोठ्या भावाचे व बहिणीचे लग्न झाले. त्यामुळे

आई-वडील यांच्या जबाबदारीचे ओझे कमी झाले. मी होस्टेलमध्ये व धाकटी बहीण व भाऊ आता घरी होते.

याच सुमारास कोयनेचा भूकंप झाला. आई-वडील गावी गेले होते. मोठ्या घरात आम्ही तिघेच होतो. सांगलीला जायला मी पहाटे उठलो होतो व भूकंप झाला. लाईट गेले. जमीन थरथरत होती. काय करावे ते कळत नव्हतं. काय होतंय ते कळत नव्हतं. लग्नाच्या वेळी खूप पाहुणे आले होते पण घर मोठे असल्याने काही जाणवले नाही. या घरात आम्हाला फार रहाता आले नाही. वडिलांची न्यू पॅलेस येथे बदली झाली व घर सोडावं लागलं.

==========

कोल्हापूरला शुक्रवार पेठेत रहात असताना धाकट्या भावाला शाळेत घालायचं ठरलं. मला आठवते त्याप्रमाणे रंकाळावेस जवळ एक शाळा होती. लेले नावाचे वयोवृद्ध जोडपे ती शाळा चालवायचे. शब्दोच्चार व लिहायला ते शिकवत. थोडे अवघड व जाचक होते, पण बराच उपयोग झाला. त्याला बरोबरीचे मित्र व मैत्रीणी मिळाल्या. त्या आधी गंगावेशीत एका छोट्या वर्कशॉपमध्ये आम्ही त्याला घातले होते. तेथे लाकडी खेळणी बनवत. मालकाला दोन्ही पाय नव्हते. तो खुरडत चालायचा. त्या वेळी प्लास्टिक खेळणी नव्हती. निरनिराळे पक्षी, मोटारी, बाहुल्या, इ.बनवत. पण इतके पुरेसे नव्हते .

एके दिवशी माझ्या मावसबहिणीने त्याची चित्रकला पाहिली. ती म्हणाली, 'माझे चित्रकला शिक्षक ओळखीचे आहेत. महाद्वार रोडवर त्यांचा क्लास आहे. ते शिकवतात का ते पाहते.' ते शिकवतो म्हणाले व त्याचा क्लास सुरू झाला.

काही दिवस त्याला पोचवायचे व आणायचे काम मी करत असे. त्याला ते जमले व त्याने चित्रकलेच्या दोन परीक्षा दिल्या. भाषेची अडचण आली नाही. पुढे दळवीज् आर्ट इन्स्टिट्यूटमध्ये त्याला प्रवेश मिळाला व तो जिल्ह्यात पहिला व बोर्डात तिसरा आला. पेपरमध्ये नाव आले.

आता प्रश्न होता काम मिळवून देण्याचा. कोल्हापुरात तशी नोकरी मिळाली

नसती म्हणून प्रयत्न सुरू केले. खूप खटपट केली पण यश आले नाही. शेवटी त्याला मुंबईत न्यायचे ठरविले. माझं घर अगदी लहान होते. एक खोली व स्वयंपाकघर. शिवाय मलाही नोकरीतून वेळ काढायला जमत नव्हते.

==========

दिलिपच्या नोकरीच्या शोधात

मुंबईला (ठाण्याला) आल्यावर कामासाठी शोधाशोध सुरू झाली. कुणी काय सुचवलं की जाऊन बघायचं हा उद्योग सुरू झाला. त्या काळात टेलिफोन नव्हते, मोबाईल तर आलेच नव्हते.

माझा भाऊ व माझी चार वर्षाची मुलगी या दोघांची गट्टी जमली. खाणाखुणा करून बोलत. पत्ते खेळत. काचाकवड्यांनी खेळत. दोन खोल्यांत पळापळी, लपंडाव खेळत. विक्रोळीला एका स्क्रीन प्रिंटिंगच्या वर्कशॉपमध्ये काम मिळते का पहायला गेलो होतो. पण चित्रकलेशी संबंधित काम नव्हते. Labour work होते.

माहीमला एक दिवाकर स्टुडिओ आहे. तेथे सिनेमाचे पोस्टर्स रंगवत. तेथे आम्ही गेलो होतो. त्या वेळी फ्लेक्स प्रिंटिंगचा शोध लागला नसल्याने कापडी बोर्डावर एकसारखं पेंटिंग करावं लागे. पण नेहमी काम मिळेल याची खात्री नव्हती. चित्रपटाची प्रसिद्धी पोस्टरवर अवलंबून असते. असेच दिवस गेले. काय करावे सुचत नव्हते.

एके दिवशी माझ्या चुलत भावाने मला ब्रिटानिया बिस्कीट कंपनीतील Personal manager ची ओळख करून दिली. ती कंपनी रे रोड ला होती. मी वेळ काढून तेथे गेलो. खूप मोठी कंपनी. मला वाटले निदान Packing चे व सुपरवायझरचे काम मिळेल. पण canteen मध्ये काम करेल का असे त्यांनी विचारले. पण ते काम व शिक्षण यांचा मेळ न बसल्याने आम्ही तो नाद सोडला.

वय वाढत होते त्याचे व आईवडिलांचे. केव्हा तो मार्गी लागेल असे वाटत होते. एके दिवशी योगायोगाने माझा कंपनीतील मित्र माझ्या घरी आला होता. चहा-पाणी झाल्यावर बोलता बोलता त्यांचे लक्ष जवळ पडलेल्या पेंटिंग वर गेले.

'कुणी काढली पेंटिंग?'

'माझ्या धाकट्या भावाने.'

'फार छान.'

'मी त्याच्यासाठी नोकरी पाहतोय... G. D. Arts JJ मधून झालाय. मेरिट मध्ये आलाय.'

'अरे, माझा मोठा भाऊ Bombay Dyeing मध्ये Manager आहे. तेथे Screen printing करतात. सर्व काही computerised आहे. त्यासाठी ट्रेसिंग करावं लागतं. मी विचारून बघतो. शिवाय अपंगांना काम देण्याची कंपनीची policy आहे.'

मला त्याच्या बोलण्यात आशेचा किरण दिसला.

==========

अखेर नोकरी मिळाली !

... देवाची कृपा. माझ्या मित्राने खरंच आपल्या भावाच्या कानावर ही गोष्ट घातली. त्यांनीही मनावर घेतले व ट्रायलसाठी बोलावून घेतले. मी माझ्या भावाला घेऊन परळ येथील कारखान्यात गेलो. तेथे त्याला बेडशीटच्या डिझाईनचे रंगीत चित्र देण्यात आले. तीन रंगांत ते चित्र होते. ट्रेसिंग पेपरवर रंग पाहून तीन वेगवेगळी ट्रेसिंग काढायची होती. ती त्याने अचूक काढली. एकावर एक ट्रेसिंग ठेवल्यावर. संपूर्ण रंगीत चित्र दिसे. तो टेस्टमध्ये पास झाला व त्याला नोकरी मिळाली. शिफ्टमध्ये काम करायला लागे. मी त्याला ठाणे ते परळ कसे जायचे ते सांगितले. पर्यायी मार्ग पण सांगितला. कधी उशीर झाला तर मला टेन्शन यायचे. कारण communication कसे करायचे ?

माझ्या भावाने इतर स्टाफशी व कामगारांशी मैत्री केली. त्याला लिहायला येत असल्याने तो मित्राकरवी message पाठवायचा. लाल बावटा युनियन मध्ये सामील झाल्यावर ते लोकच त्याची विशेष काळजी घेऊ लागले. रेग्युलर पगार, बोनस, वगैरे मिळाल्यानंतर, थोडे स्थिरस्थावर झाल्यावर काही दिवस बऱ्यापैकी गेले. डोंबिवलीच्या सेल्स टॅक्स इन्स्पेक्टर काळे यांच्या मुलीशी लग्न झाले. त्यांनी डिपॉझीटवर घर घेण्यासाठी मदत केली. आम्ही तशी अट घातली. त्यांनी मदतही केली व थाटात लग्नही करून दिले. संसार सुरू झाला. त्याच्याकडे आमचे येणे-जाणे सुरू झाले.

==========

नोकर कपात

कालांतराने नशिबाने थट्टा करायचीच ठरवली होती. माझ्या मागचा त्रास संपत नव्हता. कारण पण काही कारणांनी कामगार कपात झाल्याने त्याच्या नोकरीवर गदा आली व त्याची नोकरी गेली. देव माझी सत्त्वपरीक्षा पहात होता. कुणी मदत करायला आले नाही. दिलिप मात्र ड्राईंगचे क्लास घेऊन खर्च भागविण्यासाठी आटापिटा करत होता. काय करावे सुचत नव्हते. मी मग त्या कंपनीच्या युनियन लीडरच्या परळ येथील घरी गेलो आणि सर्व वस्तुस्थिती त्याला समजावून सांगितली.

त्या युनियन लीडरला याची कल्पना होती. कामगार कपातीत ज्युनिअर व नव्याने भरती केलेल्या लोकांवर नोकर कपातीची कुऱ्हाड पडली. अनुकंपा व अपंग या criteria वर नोकरीसाठी युनियन प्रयत्न करेल असे त्याने आश्वासन दिले. मीही दुसऱ्या मार्गाने प्रयत्न केले. नव्याने नोकर भरतीत त्याला संधी मिळाली पण पडेल ते काम करावे लागेल या अटीवर. इकडे त्याच्या बायकोचे आजारपण सुरू झाले. पुन्हा पहिले पाढे पंचावन्न. ते इतके विकोपाला गेले की, Tata cancer hospital ला admit करावे लागले. काळे व डॉ. राव यांच्या ओळखीचा फायदा झाला, पण माझी कमालीची धावपळ झाली. रक्त, प्लाझमा वगैरे आणावे लागले. Rh negative (नक्की आठवत नाही) रक्तदाता म्हणून किरण व फडकेकाका यांचे मोलाचे सहकार्य लाभले. महिला असल्याने एकेकजण सोबतीला रहात असे. शस्त्रक्रिया करावी लागली व काही दिवसांनी discharge ही मिळाला. पण हा आनंद भावाला फार दिवस उपभोगता आला नाही. परत तब्येत बिघडली. दृष्टी गेली. सबंध दिवसांसाठी बाई ठेवावी लागली.

पण.. पुन्हा मोठे संकट कोसळले. नियतीच्या मनात काय होते कळत नव्हते. बिचारा तो एकटा पडला. माझ्याकडे परत यायला त्याने नकार दिला. आमचे हाल कुत्रा खाईना. आम्ही कसे दिवस काढले ते कुणाला सांगून पटणार नाही. त्याचीही तब्येत ठीक राहीना. तरी पण काळेंची मदत होत होती. त्यांचे लक्षही होते. आपल्या बहिणीचे दु:ख त्यांना होतेच. आणि एके दिवशी ?

==========

ईश्वरइच्छा बलियसी !

मोठ्या धैर्याने माझा धाकटा भाऊ एकटा रहात होता. कधी कधी एकटेपण जीवावर उठते म्हणतात. एकदा मला काळेंचा रात्री फोन आला. भावाला admit केले असून छोटे ऑपरेशन करावं लागलं. माझ्या पोटात एकदम धस्स झालं.

त्यांचं बरोबर होतं. एकदम धक्का बसू नये म्हणून त्यानी तसं सांगितलं. तोही पेशंट व हळव्या मनाचा. लागोपाठ दोन बहिर्णींच्या एकाच आजारानं देवाघरी जाण्याने व आईचाही आधार सुटल्याने हादरला होता. मुळव्याधीच्या शस्त्रक्रियेनंतर तो सावरला. खाण्यापिण्यावर आलेली बंधने सांभाळत होता. कंपनीत पडेल ते काम करायचे असल्याने ते त्याला झेपत नव्हते. सारखी पाठ दुखते, हात दुखतो अशी तक्रार करायचा. जवळच्या डॉक्टरकडून आयुर्वेदिक औषधे घ्यायचा. पण दुखणे भलतीकडेच वळू लागलेले कळलं नाही. सारखी रजा तरी किती घेणार?

शेवटी काळेंनी त्याला पुन्हा दवाखान्यात admit केले. Oxygen लावावा लागला. लिवर खराब व्हायला लागली. मोठ्या हॉस्पिटलमध्ये उपचार केले. पाठीतून दोन-तीन बाटल्या पाणी काढावे लागले. सारख्या blood tests, sonography, इ. साठी मला धावपळ करावी लागली. रात्रीचा attendant ठेवला. जवळचे नातेवाईक डबा द्यायचे. भेटून जायचे.

थोडे बरे वाटायला लागल्यावर डिस्चार्ज मिळाला. रोजच्या जेवणाच्या डब्याची सोय केली. नोकरीचा राजीनामा न देता नोकरीचा क्लेम ठेवावा असे माझे मत होते. शेवटी voluntary retirement घेतली.

पण तब्येत ढासळतच जात होती. माझ्या एका भाच्याच्या ते लक्षात आले. तेव्हा त्याने बहिणीला फोन करून कल्पना दिली. तिनं ठाण्याला आणून परत admit केले. मी गावी गेलो होतो. कळल्यावर लगेच आलो. परिस्थिती बिकट होती. आमच्या डोळ्यांसमोर दोन दिवसांत त्याची प्राणज्योत मालवली. ईश्वरइच्छा बलियसी ! पत्नी पाठोपाठ दोनच वर्षांनी नियतीने डाव साधला. धक्क्यावर धक्के बसत होते....

==========

सहज सुचलं म्हणून

'दिवे लागण'

आमच्या लहानपणीची गोष्ट. साधारणपणे ६०-६५ वर्षांपूर्वीचा काळ.

आम्ही शहापूर बेळगाव येथे रहात होतो. घरात पाण्याचे नळ किंवा वीज नव्हती. घर तसं मोठं होतं. लहान-मोठ्या सहा खोल्या होत्या. कौलारू छप्पर होते. संध्याकाळ झाल्यावर जसजसा अंधार पडत असे तसतशी दिवेलागण व्हायची. हा रोजचा दिनक्रमच झाला होता. माझी आई सोप्यात सर्व दिवे गोळा करून आणायची. राख किंवा विभूती लाऊन सर्व काचा स्वच्छ करायची. दिव्यातल्या वाती वर-खाली करून कोळीस्टक काढून साफ करून रॉकेल भरायची. ते बघत आम्ही भावंडं आईभोवती कोंडाळ करून बसत होतो. कंदिलाची काच वाकडी करून अडकवणे कौशल्याचे असायचे. काडेपेटीने प्रथम त्रिकोणी शंकूच्या आकाराची चिमणी पेटवायची व नंतर त्या चिमणीने इतर दिवे पेटवायचे त्यामुळे काडेपेटीतील काड्या वाया जात नसत.

आता वेगवेगळे दिवे वेगवेगळ्या ठिकाणी ठेवायचे. उंच काचेचा शो चा दिवा सोप्यात, कंदील माजघर व स्वयंपाकघरात, मैना झोपायच्या खोलीत व कोठीच्या खोलीत व चिमणी (तिला आमचे आजोबा 'टुण टुण चिमणी' म्हणत) बाथरूममध्ये. पणती तुळशीजवळ व समई देवघरात. दिव्या दिव्या दीपत्कार का म्हणायचे ते आता कळायचे.

माजघरात व झोपायच्या खोलीत दिव्याजवळ घड्याळ व पाणी पिण्यासाठी तांब्या-भांडे असायचे. माझा मोठा भाऊ अभ्यासाला बसला की कंदिलाच्या काचेला पोस्टकार्ड लावायचा त्यामुळे डोळ्यावर उजेड यायचा नाही.

==========

'सोवळे ओवळे'

दोन आठवड्यांपूर्वी क्रॉम्प्टन ग्रीव्हज् कंपनीच्या आमच्या डिव्हिजनच्या इंजिनीअर्स व कर्मचारी वर्गाचे एक गेट टुगेदर आमच्या जनरल मॅनेजरनी आपल्या घरीच ठेवले होते. सर्वजण पासष्टीच्या पुढचे होते. गप्पा मारत असताना स्वच्छता व टापटीप हा विषय निघाला होता. 'आपल्याला कायझन शिकवायला जपानी माणसं लागतात ही किती लाजीरवाणी गोष्ट आहे', यावर सर्वांचा भर होता.

दोनच गोष्टी महत्त्वाच्या असतात.

Just in time as per plan and a place for everyting and everyting in its place.

मी विचार करत असताना मला आढळले की, अरे या गोष्टी आमची वडीलधारी व्यक्ती व पर्यायाने आम्ही करत होतोच. दिवस बदलले, काळ बदलला तरी त्यामागे हेतू तोच आहे. पाश्चात्त्यांचे अनुकरण व त्यांच्या प्रभावात आपण वाहवत गेलो. सोवळे-ओवळे, उष्टं-माष्टं, खरकटं व निर्लोप इत्यादी शब्द बुरसटलेल्या विचारांचे वाटू लागले.

आता एक एक गोष्टींचा विचार करू. सोवळे म्हणजे जे वस्त्र आपण धुतलेले, इतरांनी स्पर्श न केलेलं व स्नानानंतर परिधान करतो ते. ते सूती असलं तरी चालतं. रेशमी असेल तर चांगले. एकदा ते परिधान केल्यावर स्वयंपाक, देवपूजा व नैवेद्य होईपर्यंत विटाळायचे नसते. म्हणजे कुणी कुणाला शिवायचे नसते. नाहीतर ते ओवळे होते. रोजच्या वापरात जी सूती वस्त्र असतात ती स्वच्छ असली तरी ओवळ्यात मोडतात.

आता उष्टं म्हणजे काय ते पाहू. आमच्या लहानपणी उष्टं खाणं निषिद्ध होतं. आता काही निर्बंध राहिला नाही. कुणीही, कुणाचेही, कधीही, कुठेही व काहीही उष्टं खातो. त्याला नकळत प्रतिष्ठा मिळत गेली. एखाद्या व्यक्तीला मुखरोग, त्वचा रोग असेल तर.. 'करोनाने' आपली बऱ्यापैकी खोड मोडली पण नंतर पहिले पाढे पंचावन्नच राहिले. शास्त्रात फक्त मुंजीतील मातृभोजनात आईने मुंज्या मुलाला शेवटचा स्वतःच्या पानातील एक घास भरवायचा असतो. आता मुंजीत त्याचा event केला

जातो. लग्नात सुध्दा जो घास भरवला जातो त्याला शास्त्रीय आधार नाही.

आमच्याकडे रोजचंच जेवण-खाणं कसं असायचं व शिस्त कशी पाळली जायची ते पाहू.

मला आठवते त्याप्रमाणे, आम्ही शुक्रवार पेठेतील घर सोडले तोपर्यंत, आमच्या घरी सोवळे ओवळे, उष्टं माष्टं, खरकटे, निर्लोप याचं महात्म्य फार होते. दर सणासुदीला आईचा सोवळ्यातील स्वयंपाक व नैवेद्य असायचा.

खरकट्या भांड्याला हात लागला तर तो हात दही, दूध, ताक, तूप किंवा इतर पदार्थाला लावता यायचा नाही. डाव्या हाताने कोणताही जिन्नस पानात घ्यायला परवानगी नसायची, अगदी चमचा वा डाव असला तरी. वाढताना सुध्दा पदर खोचून, वेण्या असतील तर नीट बांधून वाढायला लागायचे. पानात वाढताना पळी वा चमचा पानाला टेकणार नाही याची काळजी घ्यावी लागे.

केस मोकळे सोडलेले आईला आवडायचे नाही व सारखा केसातून हात फिरवायलाही परवानगी नसे. त्यामुळे सर्वांची जेवणं झाल्यावरच आई जेवायला बसायची व काही लागलं तर कुंदा वाढायची.

आम्ही पाटावर जेवायला बसत असू. पाट मांडायचे काम मी करत असे. जेवायला बसण्याचा क्रम ठरलेला होता. जेवायला अण्णा, मी, कुंदा, सुधा व दिलिप या क्रमाने बसत असू.

सणावारी अण्णा, मला व दिलिपला कुंकवाचा नाम काढायचे. उदबत्ती लावायचे व देवाला नैवेद्य दाखवून वदनी कवळ घेता ... हा श्लोक म्हणून जेवायला सुरुवात करायची. जेवणानंतर विडा आवर्जून खात असू. रात्रीची जेवणं साडेआठच्या आत व्हायची. नंतर रेडिओवरील बातम्या ऐकून आम्ही मुलं थोडा अभ्यास करून झोपी जात असू. कधी कधी रेडिओवर आपली आवड लागायची. ती आम्ही ऐकायचो. रेडिओ घेण्यापूर्वी आमच्या घरमालकांच्याकडे आम्ही 'बिनाका गीतमाला' ऐकायला जात असू. या साऱ्या आठवणी आजही ताज्या आहेत.

==========

गेले ते दिन गेले..

असेच एके दिवशी what's app वर शिरिषने एक पोस्ट शेअर केली. मोडी लिपीतील सर्व अक्षरे होती.

महाराष्ट्रात एके काळी मोडी लिपीतून पत्रव्यवहार वा लिखाण होई. इंग्रजी राजवटीत हळूहळू तिचा वापर थांबला. मला आठवते, मलाही मोडी लिपी शाळेत शिकवली होती. जुनी कागदपत्रे मोडी लिपीतील असल्याने ती वाचण्यासाठी मोडी लिपी समजणे आवश्यक होते. १९५६ पूर्वी मुंबई इलाखा त्रैभाषिक होता. त्यात बेळगाव, विजापूर, कारवार व धारवाड हे जिल्हे येत.

बेळगावमध्ये मराठी भाषिक बहुसंख्य होते. आम्ही शिक्षणाचा श्रीगणेशा मराठीतून केला. आमच्या आईनेच श्रीगणेशाय नमः, व ओम नमः सिध्दम व नंतर अ आ इ .. शिकवले.

तेव्हा play group, jr. kg, sr. kg असले प्रकार नव्हते. शाळेत जाण्यापूर्वी मुळाक्षरे, अंकज्ञान, बडबड गीते घरीच शिकवली जात व नंतर थेट पहिलीत प्रवेश मिळायचा. तीसपर्यंत पाढे, पावकी, निमकी, पाऊणकी, सवायकी, दीडकी, अडीचकी व औटकी यावी लागे. यांना पाढे किंवा परवचा म्हणतात. रोज संध्याकाळी सातच्या आत घरात येऊन शुभंकरोती व परवचा म्हटल्याशिवाय जेवण मिळायचे नाही. काहीना हिशोबासाठी रेघी बेरीज-वजाबाकी येत असे. त्यासाठी पै, पैसा, आणा यांना विशिष्ट रेघा होत्या. जुन्या डायऱ्यांमध्ये या बेरजा पाहता येतील. नंतर शिक्षण पध्दतीत थोडा बदल झाला. त्याला Montessori पध्दत असं म्हणतात.

मुळाक्षरे ग म भ न र स त ळ या स्वरूपात आली. अंक लिपी जाऊन तक्ते आले. पाटी-पेन्सिल जाऊन वह्या-पुस्तके आली. त्याच सुमारास भारत सरकारने दशमान पद्धती स्वीकारली. जुनी कोष्टकं व परिमाणे मोडीत निघाली. पैसा, आणा, चवली, पावली, अधेली व रूपया जाऊन चौसष्ठ पैशाचा रुपया चक्क शंभर पैशाचा झाला. दोन्ही प्रकारची नाणी चलनात असल्याने हिशोब करताना तारांबळ व्हायची. छटाक, रत्तल, शेर, पासरी, मण, खंडी, जाऊन mg, kg, quintal, tonne आले. इंच, फूट, यार्ड, फर्लांग, मैल जाऊन mm, cm, km आले. मिली, सेंटी, डेसी,

डेका, हेक्टो, किलो, दहा-दहा पटीने चढतात हे हो. असं शिकायला लागलं. सोनं गुंजा, मासे, तोळा असे न मोजता थेट gram मध्ये गेले. आंतरराष्ट्रीय बाजारातून औंसही गायब झाला. शेराचा लिटर व अर्धा शेराचा अर्धा लिटर वा पाचशे मिली झाला. पौंडने ग्यालन बरोबर केव्हाच सुंबाल्या केल्या होत्या. शेतमोजणी गुंठा/एकर वरून हेक्टरवर गेली. हे सर्व रुळायला थोडा अवधी गेला पण आमची पिढी मात्र अडकली.

==========

इतर लेखमाला

बेळगावची पर्यटनस्थळे

बेळगावच्या परिसरात काही महत्त्वाची व प्रेक्षणीय अशी स्थळे आहेत. बेळगावच्या एसटी बस स्थानकावर उतरला की समोरच एक भुईकोट किल्ला आहे. सभोवताली खंदक आहे. या किल्ल्यात आता सरकारी कचेऱ्या आहेत. हा किल्ला व त्याचे बुरुज भक्कम आहेत. हा किल्ला शिवकालपूर्वीचा आहे. तसाच एक किल्ला येळ्ळूर येथे आहे. हा किल्ला गडकिल्ल्यात मोडतो. येथील नारायण नामक गवळी आमच्याकडे दूध द्यायला यायचा. बसस्थानकावरूनच हिंडिलगा येथे जाता येते. तेथील तुरुंग व गणपती मंदिर प्रसिद्ध आहे.

पूर्वी त्याला तळ्यातला गणपती म्हणत. आजूबाजूला बरीच तळी होती. आता सुंदर मंदिर बांधले आहे. संकष्ट चतुर्थीला भाविक आवर्जून दर्शनाला येतात. दुसरे एक ठिकाण म्हणजे पंत बाळेकुंद्री दत्त संस्थान. येथे पंत महाराजांची समाधी आहे. शहरापासून दूर व शांत परिसर आहे. वृक्षराजीने नटलेल्या परिसराजवळच सांबरा येथे विमानतळ आहे. गोवा स्वतंत्र होण्यापूर्वी या विमानतळाला लष्करी महत्त्व होते. शाळांच्या सहली अजूनही येथे येतात. आणखी एक पवित्र स्थान म्हणजे रामतीर्थ. येथे राम मंदिर आहे. जवळच स्वच्छ पाण्याचा झरा आहे.आसपास झाडी आहे. शांत असा पिकनिक स्पॉट आहे. निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांनी एक महादेवाचे मंदिर बांधले आहे. रेल्वे स्टेशन जवळच असलेले हे ठिकाण फिरावयास जाण्यास योग्य आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात येथे ठळकवाडीला काँग्रेसचे अधिवेशन म. गांधींच्या अध्यक्षतेखाली झाले होते. तेंव्हा पाण्यासाठी एक विहीर खणली होती. ती 'काँग्रेस विहीर' या नावाने प्रसिद्ध आहे. बेळगावचा परिसर म्हणजे गोवा व कोंकणला लागून असलेला भाग. त्यामुळे रत्नागिरी हापूस, पायरी व गोवा माणकूर आंब्याची भरपूर आवक व्हायची. तेव्हा करंड्यातून आंबे विकायला येत. बेळगावची हवा तशी थंड. कोणत्याच ऋतूचा अतिरेक नाही पाऊणशे वर्षांपासून सीमाप्रश्न सुटावा म्हणून वाट पहात आज आशेने आयुष्य कंठत आहे.

==========

सन २०२० चा कोवीड अन् life style

कोवीड आला. आणि जगाची life style बदलून गेली. 'work from home' सुरू झाले. बाहेर पडता येईना. त्यामुळे झोम्याटो व स्विग्गी यांना झपाटले. On line खरेदी सुरू झाली. फ्री होम डिलिव्हरी मिळायला लागली. रेडीमेड अन्नपदार्थांचे पेव फुटले. माणसं आळशी होऊ लागली. घराघरांचे फ्लॅट झाले. स्वयंपाकघरं आकुंचन पावू लागली. तांब्या-पितळेची भांडी-कुंडी इतिहासजमा झाली. त्याची जागा अल्युमिनियमने व प्लास्टिकने घेतली. दुकानातून घरात व घरातून कचराकुंडीत प्रवाह सुरू झाला. घरातले सणवार हॉलवर साजरे व्हायला लागले.

Online payment किंवा cheque payment मुळे लाखा-लाखांची उलाढाल करताना जी उरात धडकी भरायची ती लोप पावली. Die rich का? ही संकल्पना मनात भरल्याने मोकळ्या हाताने मोकळे 'जाणं' अधिक श्रेयस्कर वाटायला लागलं. 'दोन' वा 'तीन' बस यापासून फारकत घेत 'एकच' बसनं डोकं वर काढलं. पण आता 'नकोच' वाटायला लागलंय. आता DINK संस्कृती उदयास येत आहे, म्हणजे - Double Income No Kids. आपण प्रगती करतोय की अधोगती. काहीच कळेनासे झालंय.'सबका साथ और खुदका विकास' हवाहवासा वाटायला लागलाय. आता विचार करण्याची वेळ आली आहे.

माणसा-माणसातली आपुलकी व प्रेम फक्त पूर्वजात पाहून आनंद उपभोगायला लागेल.

==========

Free home delivery

सध्या म्हणजे कोविड नंतर , अपरिहार्यता म्हणून Free home delivery, Online purchase, Online payment, नुक्कडवरचे खाद्यपदार्थ, इ.चे पेव फुटले. आधीच आळशी बनलेली जनता पुन्हा आळशी झाली.

Packaged food, ready food, spicy food, जिभेचे चोचले पुरवण्यासाठी हौशे-नवशे कंबर कसून स्वतःची तुंबडी भरायला लागले. On line किंवा card payment मुळे सोय जरी झाली तरी गळती किती लागली याचं भान राहिलं नाही.

मागे वळून पाहता स्वातंत्र्योत्तर काळात काय होती परिस्थिती हे पाहणे मौजेचे असेल शिवाय Eye opener असेल. कुणाला सांगून खरं वाटणार नाही, पन्नास वर्षांपूर्वी पदवीधर अभियंता म्हणून मी नोकरीला लागलो तेव्हा माझा Stipend होता फक्त ३७५/- रु. सहा महिन्यांनी झाला ४२५/-रु. खाजगी प्रथितयश कंपनीची ही स्थिती तर सरकारी कंपनीचं विचारायलाच नको. हॉटेलमध्ये चहा प्यायचा म्हणजे जाताना विचार करावा लागे व पाकीट चाचपडावे लागे. कामगारांचे १० पैशाचे कूपन हरवले तर आज चहा नाही म्हणून हळहळायचे. लोकलमध्ये रुपयाला सहा चिकू, चार संत्री व टाईमपाससाठी गरम शेंगदाणे अर्धी वाटी मिळत. आता कागदी शंकूचा आकार इतका आक्रसला आहे की जेमतेम १० दाणे मावतात. त्या काळी डोंबिवलीच्या पूर्वेस दीपक वडा सेंटरमध्ये रुपयाला सहा वडे मिळायचे.

मी येताना नारळाची वाटी आणत असे. किंमत ४५ पैसे. मसाला म्हणजे१५ पैसे त्यात कोथिंबीर, कढीलिंब, आल्याचा तुकडा, ८-१० मिरच्या असायच्या. ब्रेड १ रु. १० पैसे व अर्धा घेतल्यास ५५ पैसे. दूध ३५ पैसे पाव लिटर. आरे दूध तर ९० पैसे अर्धा लिटर मिळायचे. भैय्याने आणलेलं दूध तर अजून स्वस्त. किती म्हणून सांगावे.

माझ्या कल्पनेप्रमाणे आणीबाणी पासून महागाई वाढू लागली व globalization नंतर, म्हणजे ९५ नंतर महागाईने लोक हैराण झाले. पगार वाढले तरी समाधान मिळाले नाही. काही कामगार पुढाऱ्यांनी अव्वाच्या सव्वा पगार, बोनस पदरात पाडून घेतला. कंपन्यांनी कहरच केला. अपेक्षा वाढल्या, कंपन्या दिवाळखोरीत निघाल्या. गलेलठ्ठ पगार घेणाऱ्यांना नारळ मिळायला लागला. आरक्षणाने नोकरी मिळवणं कठीण झाले.

कोवीडमुळे कंपन्यांनी work from home ची टूम काढली व कोट्यवधी रुपये वाचवले. अनेक युनिटस् विकून पैसा उभा केला व तात्पुरती गरज भागवली.

नारळ दिलेल्या कर्मचाऱ्यांना भरपाई दिली. पण तरीदेखील अनेकांचे संसार मोडले, आत्महत्या झाल्या असे घडले असले तरी प्रत्यक्षात तसं चित्र दिसत नाही.

==========

वाचनालय

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मुंबई इलाखा हे त्रैभाषिक राज्य होते. गुजराती, मराठी व कानडी अशा भाषेनुसार ते विभागले होते. बेळगाव, धारवाड कारवार व विजापूर हे कानडी भाषिक गणले जात. पण बेळगावला लोकसंख्येच्या प्रमाणात मराठी भाषिक मोठ्या संख्येने होते. पण भाषावार प्रांतरचना झाल्याने तो भाग कर्नाटकात गेला. मराठी भाषिक लोकांवर अन्याय झाला. १९६०मध्ये गुजरात वेगळा होऊन व मध्य प्रदेश मधील मराठी भाषिक प्रदेश एकत्रित करून 'महाराष्ट्रा'ची निर्मिती झाली पण बेळगाव, कारवारचा विचार झाला नाही व आजवर हा भाग प्रतिक्षेत आहे.

बेळगावला दोन सार्वजनिक वाचनालये आहेत. एक आहे गणपत गल्लीत व दुसरे आहे शहापूर येथील कोरे गल्लीत. कोरे गल्लीतील वाचनालयात मी पेपर वाचायला जात असे. छपरासारख्या उतरत्या टेबलावर पेपर अडकवलेला असे. कधी कधी पाय उंच करून वरचा मजकूर वाचावा लागे. मराठी वाचनालय असल्याने एखादाच कानडी पेपर बहुधा 'संयुक्त कर्नाटक' असे. आतल्या खोलीत मासिके लावलेली असत. दुसऱ्या खोलीत पुस्तकांची देवाणघेवाण चाले. कपाटं इतकी उंच होती की शिडीवर चढून पुस्तके काढावी लागत. पुस्तकाची यादी पाहून पुस्तक मागितले की एक मदतनीस तो काढून द्यायचा.

बाजूला एक फलक होता. त्यावर देणगीदारांची नावं होती. त्यात एक नांव होते, रामचंद्र महादेव जोशी. हे माझे मामा होते. त्यांच्या नावापुढे देणगीचा आकडा होता रू.१०००/-. ही रक्कम आहे सुमारे ८५/९० वर्षांपूर्वीची. (असा माझा अंदाज आहे)

आजही ती वाचनालयाची इमारत आहे. प्रांगणात उभी असलेली सरस्वतीची मूर्ती उदास वाटते. कारंजे लुप्त झाले आहेत. पाण्यात गिरकी मारत फिरणारे लाल मासे कुठे दिसत नाहीत, जिथं उभे राहून मी पेपर वाचायचो तेथे 'स्वेटर'चे विक्री केंद्र आहे. वाचनालय आक्रसले आहे. काही वर्षांपूर्वी लोकसत्ता वाचकवर्गाने भरभरून मदत केली होती. आता काय स्थिती आहे कोण जाणे.?

कालाय तस्मै नमः!

==========

एक आठवण

मित्रांनो, तुमच्या आमच्या लहानपणची ही आठवण आहे. वाचून थोडे आश्चर्य वाटेल पण सत्य आहे.

आमच्या लहानपणी आम्ही कपडे धुण्यासाठी गोदरेजचा साबण वापरत होतो. चांगला दीड फूट लांब बार असायचा. प्रत्येक बारवर इंचा इंचावर खुणा असायच्या. तेथे कापून साबण वडी करून वापरायची. प्रत्येक तुकड्यावर किल्लीचे चित्र यायचे.

नंतर सहा इंची बार आले व त्याचे नाव होते ५०१ बार. हळूहळू नंतर साबणचुरा बाजारात यायला लागला. तो थोडा महाग पडायचा म्हणून आम्ही एक युक्ती केली. धान्य चाळण्याची चाळण उलटी करून गोदरेज बारचा चुरा केला. फक्त आदल्या दिवशी कपडे भिजवून ठेवायचे व दुसरे दिवशी धुवायचे. कारण चुरा विरघळायला वेळ लागायचा. नंतर सनलाईट साबणांनी बाजारात पदार्पण केले. साबण वडी चांगली मोठी होती. त्याला सोड्याचा वास यायचा. उन्हात कपडे वाळवले की कुरकुरीत होत.

पाठोपाठ लाईफबाय साबण बाजारात आला. तो अंगाला लावायचा लाल साबण होता. तो जंतुनाशक होता व त्याला एक प्रकारचा कारबालिक ॲसिडचा वास यायचा.

हळूहळू detergent साबणाचा उदय झाला व लोकप्रिय झाला. प्रथम पत्र्याचे

डबे मिळत.नंतर पुड्ड्याचे खोके आले. आता तर प्लास्टिक पाउचमध्ये मिळतात. 'डाग ढुंढते रह जाओगे' ही पहिलीच जाहिरात तर 'डाग अच्छे है' ही दुसरी.

'चकित झालात..?' व आता कपडे कितीही जरी मळले तरी दस रूपये काफी है....लोळा मातीत.

==========

थोडा विचार करा !

Sailing in the same boat.

.

माझा मित्र बोलत होता व मी ऐकत होतो. दोघांचाही एकच प्रॉब्लेम होता. प्रॉब्लेम म्हटलं की त्याला सोल्यूशन नाही असं होत नाही. निदान पर्याय असतोच. आम्ही दोघेही सेवानिवृत्त. दुपारच्या वेळी आमची वामकुक्षीची वेळ तर नेमकी कामवालीची ती येण्याची वेळ.. आता कामवाल्या तरी कुठे मिळतात?

त्यांच्या अटी इतक्या की ज्याचं नाव - 'चहा पेक्षा किटली गरम' त्याप्रमाणे 'कामापेक्षा पगार जास्त'. कधी कधी वाटायचं उगाच इंजिनीअर झालो..

आता हेच पहा ना, समजा तुमचा one bhk block आहे, म्हणजे झाल्या तीन खोल्या. किचनला खोली म्हणणे म्हणजे शेळीला म्हैस म्हणणे झाले. बेडरूममध्ये बेड इतकी जागा व्यापतो की सभोवती फिरायला पाऊलवाटही नसते.

हॉलचे हाल पाहवत नाहीत. इतकं फर्निचर व ते न हलवता येणारे, की या तीन खोल्यांत केरसुणी फिरवून पोछा फिरवायला तुम्ही हजार बाराशे दर महिन्याला देता. कपडे तर वॉशिंग मशिनला लावतात. पाणी तुमचं, मशिन तुमचं, वीज तुमची, पाणी व महागडं साबण तुमचं .. ....वाळत टाकायला बाराशे रुपये...?

भांड्याचं तर नाव नको. घरात माणसं इन मीन तीन. ग्यासवर स्वयंपाक.. भांडी कशाला होतील काळी? शिवाय सगळी स्टीलची व नॉनस्टिक.. महागडी पावडर, घासणी.. ती विसळायला बाराशे रुपये..? जरा एखादं भांडं जास्त पडलं की सगळा राग भांड्यांवर निघायचा.

एकही भांडे असं नाही की त्याला पोचा आला नाही. नाहीतर आदळ-आपट ठरलेलीच. अधून मधून चहा-नाश्त्याची चिरीमिरी, दिवाळीला बोनस व साडी आहेच. आता तुम्हीच बघा पैसे कसे जातात ते. यासाठीच का दोघांनी कमवायचे व यांच्या डोक्यावर घालायचे?

मी म्हणालो, 'खरंच बाबा तुझं. पुन्हा करोना आला तर निदान स्वावलंबी होऊ.'

==========

श्रध्दा..!

वाटलं की बंकटलालने असेच एका महाराजाला उष्ट्या पानातील खरकटे खाताना पाहून घरी आणले व त्याला जेऊ-खाऊ घातले व ते पुढे गजानन महाराज म्हणून प्रसिद्ध झाले. पण कुठलं काय नी कुठलं काय.

एकदा बातमी आली की, पोलिसांनी या महाराजांना दारू पिऊन धिंगाणा घातला म्हणून अटक केली. हा भोंदू साधू निघाला. लोकांचा भ्रमनिरास झाला व विश्वास उडाला. आमच्या घरातील भजन-पूजन हळूहळू कमी झाले. आमच्या आजोबांची काळभैरवावर श्रध्दा होती. जमखंडी वा विजापूरहून बेळगावला आले की ते बरोबर येताना देव आणत.

पारंपरिक शंकराची पिंडी,चांदीचा नाग, पंचधातूची गणपतीची मूर्ती, शाळीग्राम, बाळकृष्ण,गारेचा नंदी व अन्नपूर्णा असे देव होते. माझ्याकडे पारंपरिक शंकराची पिंडी, चांदीचा नाग, गणपती व आईची अन्नपूर्णा आजही पूजेत आहे. गारेचा नंदी व शाळीग्राम याचे विसर्जन केले असावे. शंकराची पिंडी व बाळकृष्ण मी नाशिकच्या घरात ठेवला होता. आता बाळकृष्ण आहे पण माझ्या आईनं दिलेली शंकराची पिंडी आता दिसत नाही.आमच्या देवघरात गुरूंचे फोटो ठेवण्यात येत नाहीत. माझ्या आईची गुरू- माता व वडिलांचे गुरू संकेश्वर पिठाचे शंकराचार्य यांचे फोटो देवघरात नव्हते. या शंकराचार्यांची पाद्यपूजा आमच्या घरी झालीं होती.

आमचे कुलदैवत म्हणजे संगमेश्वर येथील काळभैरव होय. मी दर्शन घेतले

आहे व दरवर्षी किंवा मंगल प्रसंगानंतर लघुरुद्र करण्याची प्रथा मी अजूनही जपली आहे. आमच्याकडे नवरात्रात अष्टमीला महालक्ष्मी पूजन असते. उकडीपासून मुखवटा बनवलेला असतो. घागरी पण फुंकतात.

आमची (किंवा चित्पावन कोकणस्थांची) खरी दिवाळी म्हणजे देव दिवाळी असते. तांदळाच्या पिठाचे वडे व नारळाचा रस हा नैवेद्य असतो. मी ही परंपरा आवडीने सांभाळली आहे. पुढील पिढीवर भरवसा नाही. ज्यांच्या त्यांच्या श्रध्देचा प्रश्न आहे.

==========

श्रध्दा..!

कुणाची कुणावर कशासाठी व कशी श्रध्दा बसेल हे काही सांगता येत नाही. आमच्या लहानपणी आमची आई औरंगाबादला सिंधुमावशीकडे सहज गेली होती तेव्हा मला वाटतं तिचं शिर्डी दर्शन झालं असावं. दिलिप सतत आजारी असायचा. बोलायलाही लागला नव्हता. त्यामुळे आमच्या घरी साईबाबाची उपासना सुरू झाली. दत्ताच्या फोटोसोबत साईंचा फोटो लागला. दर गुरुवारी आरती प्रसाद सुरू झाला. धूप-अंगारे सुरू झाले. असे काही दिवस गेले.

एकदा अशी बातमी आली की, प्रत्यक्षात साईबाबाच किंवा त्यांचा शिष्य बेळगावला अवतीर्ण झाला आहे. ठळकवाडीच्या रेल्वे गेटजवळ एक छोटे साईमंदिर होते. (आता तेथे एक भव्य मंदिर झाले आहे) ती एक छोटीशी टपरी होती. त्या पायरीवर एक थेट साईबाबांसारखी दिसणारी व्यक्ती बसली होती. साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या एका भक्ताला भुरळ पडली व चमत्कार होऊन त्याला ती व्यक्ती साईबाबा वाटली व तो तिला आदरपूर्वक शहापूरला घेऊन आला. त्याचं नार्वेकर गल्लीत घर होते. साईबाबा प्रगटले अशी बातमी वाऱ्यासारखी पसरली. आरती, भजन पूजन इ. सुरू झाले. मी ही एक-दोनदा वडिलांबरोबर दर्शनाला आरतीला गेलो होतो. असे अनेक दिवस गेले.

==========

व्यंगचित्रे, कविता, लेख व आकाशवाणी

कोल्हापूर नगरपालिकेच्या इमारतीत भास्करराव वाचनालय आहे व जुन्या राजवाड्याच्या समोर करवीर नगर वाचन मंदिर आहे.

तेथे मी मासिके व वर्तमानपत्रे वाचायला जात असे. दिवाळी अंक व रविवारी वर्तमानपत्रात येणारा बाल विभाग मला आवडायचा.

आपलाही लेख वा गोष्ट छापून यावी. आपण काढलेलं व्यंगचित्र लोकांनी पहाव असं मला वाटे. त्याकाळी मा.बाळ ठाकरे यांचं मार्मिक जोरात चालायचे ते व्यंगचित्रांच्या जोरावर. व्यंगचित्र कसं काढायचं, कसं रंगवायचं व कसं पाठवायचं हे मला माहीत नव्हतं. तरी पण धाडस करून एक व्यंगचित्र मी काढलं. काळ्या शाईनं गिरवलं व पोस्टाने किर्लोस्कर मासिकाला पाठवले. आणि आश्चर्य म्हणजे ते लगेच छापूनही आले. माझा उत्साह वाढला व आणखी काही चित्रं काढली ती मनोहर मासिकात प्रसिद्ध झाली. हे काम सोपे नाही असं माझ्या लक्षात आलं. विषय सुचणे, त्यातलं व्यंग हेरणे व चित्रात उतरवणे कठीण असते. एक चित्र मी मार्मिकसाठी काढले. बाळ ठाकरे सारख्या संपादकांच्या पसंतीस उतरेल की नाही याची खात्री नव्हती. पण तेही छापून आले. दहावी, अकरावीचे वर्ष असल्याने तिथेच या कलेला मी पूर्णविराम दिला.

यापूर्वी मी बेळगावला असताना शालूताईच्या लग्नाचे काव्यमय वर्णन केले होते. काही मंगलाष्टके लिहिली होती. पण त्या वेळी वृत्ताचा अभ्यास केला नव्हता. आता मराठी विषयात वृत्ते असल्याने ती शिकायला मिळाली. लघु-गुरू शब्द व त्यांच्या प्रकाराची नावे व संगीताप्रमाणे त्यांची लिपी कळाली.

मी त्याप्रमाणे काही कविता लिहिल्या. एक-दोन आकाशवाणीवर पाठवल्या पण... एकदा मी अशोकला (मोठ्या भावाला) कवितेत पत्र लिहून पाठवले होते.

आता ही काही ओळी स्मरणात आहेत.

उदाहरणार्थ..

वृत्त -शार्दुल विक्रीडित -

नोटेशन-म स ज स त त ग

''आजी सव्वीस जून आणि इसवी चौसष्ठ हा सन रे.
आले नाही कसे तुझे अलीकडे इन्ल्यांड ते लेटर
कुंदा गेली रहावयास नलिनी अभ्यंकरांच्या कडे
आई ही पण जाऊनी परतली राहून त्यांच्या कडे
(नलूताई नोकरी करत असल्याने व मुलं लहान असल्यामुळे अधूनमधून कुंदा, आई व गंगू रहायला जात असत)
'ताज्या' या कलमात मी लिहितसे पाऊस-पाणी कथा
(त्या वेळी पावसाने ओढ धरली होती)
आणि धो धो पाऊस जाहला सुरू पहा आनंदलो मी आता.

कधी कधी वर्तमानपत्राच्या स्वरूपांत पत्र लिहिले आहे. आम्ही शुक्रवार पेठेत रहात असल्याने पत्राचं नाव ठेवलं होतं, 'शुक्र संदेश'.

एक शीर्षक मला आठवते. 'संपली, संपली काकांनी कोरेगावास्न आणलेली काकवी संपली.'

पूर्वी एक लहान मुलांसाठी मासिक निघायचे त्यात लिहायचा प्रयत्न केला होता. खरं यश मिळाले ते केसरीतून छापून आलेल्या गोष्टीपासून. इथंही पहिला प्रयत्न फसला होता. लोकसत्ता मध्ये बरंच लिखाण प्रसिद्ध झाले. कोडी आली. पत्रे आली.

आकाशवाणीवर पूर्वी एक कार्यक्रम प्रसारित होई. 'आपलं पत्र पोचलं.' ते आवर्जून दखल घेत व वाचून दाखवत.

मिरजेला दादा वाटवे तो कार्यक्रम ऐकत व मला कळवत. कधी नाव नाही ऐकायला मिळाले तर मला विचारत असत.

असे वेगवेगळे प्रयोग करून पाहिले. यामागे प्रेरणा होती ती माझ्या वडिलांची.

==========

EXIT
आजचीच गोष्ट

काही सुचत नव्हते. काय करावे ? कसे करावे ? काही कळत नव्हते. मन नैराश्याने भरून गेले होते. मन हतबल झाले होते. Be positive, Think positive म्हणत होते. सांगायला सोपे पण मन स्थिर नसेल तर आचरणात कसं आणणार?

जड पावलांनी फूटपाथवरून सावली शोधत चाललो होतो. मधे मधे फूटपाथ शोधावा लागत होता. कुठेतरी ठेच लागत होती, तर कुठे तरी आधार घ्यावा लागत होता. एखाद्या मोठ्या दुकानाच्या दारातून कुणी बाहेर पडलं की क्षणभर गार हवेचा झोत बाहेर यायचा. किती हायसं वाटायचं.

इतक्यात एक हाक कानावर आली. 'सर !' मी मागे वळून पाहिले, माझा विद्यार्थी होता तो. मी म्हणालो, 'हाय !' 'सर, मी Whast's app वरील status आवर्जून पाहतो. कधी उशीर झाला की बेचैन होतो.' तो म्हणाला. 'आणि सर, आज एकदम Exit ?' 'हो' मी म्हणालो. 'तू बरोबर ओळखलंस. काही सुचायला लिहायला मन शांत लागते. आपले काय चुकले हेच कळत नाही.'

मोठ्या मोठ्या लोकांनी, संतांनी परोपरीने प्रयत्न केले; पण त्यांना नैराश्याने घेरलेच, शिवाय वयपरत्वे थांबावे लागले.

रामदास स्वामी खरे 'समर्थ' तरी त्यांनीही आपली व्यथा श्रीरामापुढे मांडली व रामालाच साकडं घातलं 'हे रामा, माझी तळमळ होत असून लोक चुकतच आहेत. काय करावे ते कळत नाही. तूच त्यांना आता सावर. तू त्यांचे कल्याण कर.' 'तुला कधी तरी मी समजावून व अनुभवातून स्पष्ट करेन. तुझ्याशी बोलून जरा बरं वाटलं.'

तो विद्यार्थी विचारमग्न झाला. असं वाटलं, 'तू म्हणतो आहेस तर नक्की प्रयत्न करेन'. मी म्हणालो, 'मला भा. रा. तांबेंची एक कविता आठवली व संपादक मित्राची मागणी कविता करूनच पूर्ण केली होती.'

मधू मागशी माझ्या सख्या परी
मधुघटची रिकामे पडती घरी.

आजवरी कमळांच्या द्रोणी
मधू पाजिला तुला भरोनी
सेवा ही पूर्वीची स्मरोनी
करी रोष न सखया दया करी

नैवेद्याची एकच वाटी
आता दुधाची
माझ्या गाठी
देवपुजेस्तव ही
कोरांटी बाळगी अंगणी कशी तरी

ढळला रे ढळला
दिन सखया
संध्या छाया भिवविती हृदया
आता मधूचे नाव कासया
लागले नेत्र रे पैलतिरी.....

जड पावलांनी परतताना गेटवर पुन्हा कानावर हाक आली, 'आजोबा !' दोन चिमुकल्या हातांनी माझे हात पकडले. किती निरागस असते ना हे वय ? माझ्या नैराश्याला कुणीतरी हलके केले.

==========

भेटवस्तू

आपण कुणा मित्राकडे, नातेवाइकांकडे किंवा कुणाच्या निमंत्रणावरून जेव्हा जातो तेव्हा काही भेट वा खाऊ घेऊन जातो.

काही काही वेळा काही सुचत नाही तेव्हा जी वस्तू वा खाऊ ती अडगळ

ठरते वा कुणाला ती आवडत नाही. सुदामा जेव्हा कृष्णाला भेटण्यासाठी द्वारकेला निघाला तेव्हा त्याला हाच प्रश्न पडला होता. पण त्याने आणलेल्या मूठभर पोह्याचे स्वागतच झाले. कदाचित कृष्णाच्या बायकांनी नाके मुरडली असतील पण मित्र प्रेम वरचढ ठरले व बदल्यात सोन्याची सुदाम नगरी मिळाली. आपल्याला असं शक्य आहे का ? हल्ली तर पुष्पगुच्छ व शालीचे एव्हढे फ्याड निघाले आहे की त्यांचं पुढं काय करायचं हा गहन प्रश्न आहे.

देवाला अर्पण केलेली खणा-नारळाची ओटी परत दुकानात जशी जाते(?) असे तर नाही ना ?

माझ्या मित्राने त्याला मिळालेली पदकं, पेले, चषक, ढाली भंगारवाल्याला द्यायच ठरवलंय. मलाही दरवर्षी दसऱ्याला चांदीचे रुपये मिळत. शेवटी ते विकून मी निरांजन व कुंकवाची कोयरी विकत घेतली. पुस्तके भेट दिली जातात पण शेवटी ती अडगळीत जातात. कारण घरं इतकी लहान की कपाटं ठेवणार कुठे ? शाळेच्या पुस्तकांनाही जागा नाही. जुनी पुस्तके विकून जागा करावी लागते. वाचनालयवाले पण नाखूष असतात.

केक, गोळ्या, चॉकलेट व इतर खाऊ व खेळणी यामुळे मिळणारा आनंद अल्पजीवी असतो. किंमती पाहिल्या की डोळे पांढरे होतात. कापड द्यावे तर शिंप्याच्या मोजपट्टीत जास्त तरी होते किंवा कमी तरी भरते. रेडीमेड कपड्यांचा तोच प्रॉब्लेम. शिलाईपेक्षा फिटिंगचा दर जास्त. भांडीकुंडी देणं इतिहासजमा झालंय. आता उरला एकच पर्याय व तो म्हणजे रोख रकमेचा. पाकिटात कितीही नोटा कोंबल्या तरी इज्जतीचा प्रश्न, देणाऱ्या व घेणाऱ्याचा. म्हणूनच लग्नाच्या निमंत्रण पत्रिकेत 'आहेर क्षमस्व' असे लिहिण्याची पद्धत निघाली असावी. त्यामुळे दोन्ही बाजूंची मंडळी सेफ !

हे सर्व सुचवायचे कारण असे की, माझा मित्र सांगत होता... 'अरे काल मला एक गाववाले भेटायला आले होते. त्यांनी खाऊ काय आणला तर भाजाणीच्या पिठाच्या चकल्या. दगड सुध्दा मऊ असेल. या वयात चालतील का आम्हाला ? असलेले दोन दात ही पडतील.' खरंच विचार करण्याची आता गरज आहे.

==========

वडीलधाऱ्यांचा आदर

वडीलधाऱ्या व्यक्तींना वाकून नमस्कार करावा अशी भारतीय संस्कृती आहे. पण आजकालची तरुण पिढी का लाजते समजत नाही. किंवा 'एवढं काय त्यात ? नाही केला नमस्कार तर काय आभाळ कोसळणार आहे?' अशी विचारसरणी रुजत चालली आहे. पुढील blogमध्ये मी शास्त्रीय माहिती देत आहे, पाहूया काही प्रकाश पडतो का ?

आपली संस्कृती आपणच जपणं गरजेचं आहे.

नमस्कार का करावा -

नमस्कार .....

वृद्ध व्यक्तीचा प्रवास हा हळूहळू दक्षिण दिशेला, म्हणजे यमलोकाकडे (मृत्यूकडे) होत असल्याने तिच्या शरीरातून रज व तम लहरींचे प्रक्षेपण मोठ्या प्रमाणावर होऊ लागते. अशी वृद्ध व्यक्ती समोर आल्यावर तरुण व्यक्तीच्या शरीरावर त्या लहरींचा परिणाम होतो व त्या दोघांमध्ये सूक्ष्म-चुंबकीय क्षेत्र तयार होते. त्यामुळे तरुण व्यक्तीचे पंचप्राण वर उचलले जातात. अशा प्रकारे अचानक पंचप्राणांना मिळालेल्या गतीमुळे व्यक्तीला त्रास होण्याची शक्यता असते. जेव्हा तरुण व्यक्ती वृद्ध व्यक्तीला नमस्कार करते, तेव्हा तरुण व्यक्तीतील सुषुम्नानाडी काही प्रमाणात जागृत होते व तरुण व्यक्तीतील सत्त्वगुण वाढू लागतो. त्यामुळे तिच्यातील रज व तम गुणांवर सत्त्वगुणाचा प्रभाव होऊ लागतो व तिचे प्राण पूर्वस्थितीत येतात. यासाठी वृद्ध व्यक्तीचे आगमन होताच तिला लहानांनी नमस्कार करण्याची पद्धत आहे.

वयाने, मानाने थोर असणाऱ्या व्यक्तींचे पाया पडण्याची रीत फार पूर्वीपासून आहे. सनातन धर्मांप्रमाणे मोठ्यांप्रती आदर दर्शविण्यासाठी चरणस्पर्श करणे उत्तम मानले जाते. चरणस्पर्शाचे मानसशास्त्रीय तसेच वैज्ञानिक कारणंही आहेत.

१. वाकून पाया पडण्याने विनम्रता येते आणि मनाला शांती देखील मिळते.

२. पाया पडल्यावर मोठे व्यक्ती आशीर्वाद देण्यासाठी त्यांचा हात आमच्या डोक्यावर स्पर्श करतात. या प्रकारे त्या पूजनीय व्यक्तींची सकारात्मक ऊर्जा आशीर्वादाच्या रूपात आमच्या शरीरात प्रवेश करते आणि आमचा आध्यात्मिक व

मानसिक विकास होतो.

३. शास्त्राप्रमाणे दररोज थोरामोठ्यांच्या पाया पडण्याने दीर्घ आयुष्य व उच्च शिक्षण प्राप्त होतं आणि प्रसिद्धीत वाढ होते.

४. शरीरात उत्तर ध्रुव म्हणजे डोक्यातून सकारात्मक ऊर्जा प्रवेश करून दक्षिण ध्रुव म्हणजे पायाकडे प्रवाहित होते. आणि पायात ही ऊर्जा अमर्यादित प्रमाणात स्थिर होऊन जाते. म्हणूनच पायाला हात लावून नमस्कार केल्याने ही ऊर्जा आपल्या शरीरात प्रवेश करते.

५. असा विश्वास आहे की, पायाच्या अंगठ्याहून सुद्धा शक्तीचा संचार होतो.

६. असे म्हणतात की, थोरामोठ्यांच्या नियमित पाया पडल्याने प्रतिकूल ग्रहदेखील अनुकूल होऊन जातात.

७. वाकून पाया पडणे हा एकप्रकारे शारीरिक व्यायामदेखील आहे. वाकून नमस्कार करणे, गुडघ्यावर बसून नमस्कार करणे किंवा साष्टांग दंडवत घातल्याने शरीर लवचीक होतं.

८. नमस्कार करताना पुढे वाकल्याने डोक्यात रक्तप्रवाह वाढतो जे आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

९. वाकून नमस्कार करण्याने आमच्यातला अहंकारदेखील कमी होतो.

१०. काही लक्ष्य ठेवून मोठ्यांच्या पाया पडल्याने लक्ष्य प्राप्तीसाठी बळ मिळतं.

यामुळेच लहान मुलांना मोठ्यांच्या पाया पडण्याचे नियम आणि संस्कार दिले जातात. अत्यंत सूक्ष्म शास्त्रीय विचारांमुळे हिंदू धर्म जगात महान समजला जातो.

==========

कुतूहल

कोल्हापूरला गंगावेस स्टँडजवळ पापाची तिकटी आहे. नाव जरा ऐकायला विचित्र वाटते. तिकटी म्हणजे जेथे तीन रस्ते एकत्र येतात त्याला तिकटी म्हणतात. त्या तिकटीच्या कोपऱ्यावर श्री. काका गद्रे यांचा फोटो स्टुडिओ होता. तो त्यांनी बंद केला व काही सामान घरी आणले होते. सुंदर नक्षीदार दिवे, फ्लॉवर पॉट, फुलांचे गुच्छ, वेगवेगळी चित्रे काढलेले पडदे, कलाकुसरीचे फर्निचर इ. अशा विविध वस्तू त्यात होत्या.

जवळच काकांच्या चुलत्यांचे फोटोग्राफीला लागणाऱ्या सामानाचे दुकान गद्रे फोटोग्राफर्स या नावाने होते. त्या वेळी Alfa व Kodak कंपन्या प्रसिद्ध होत्या. फोटो फिल्म डेव्हलपिंगसाठी व प्रिंटिंगसाठी तेथे येत. डेव्हलपिंग व प्रिंटिंग कसे करतात याचे आम्हाला कुतूहल असायचे. हे काम शुक्रवार पेठेतील त्यांच्या घरी करत. ते काम सुशिला अक्का करे. कधी कधी ते काम बघायला आम्ही जात असू. त्यांच्या घरात एक खोली होती तिथं काळोखात हे काम करावे लागे. काळोखात पण किंचित लालसर प्रकाशात डेव्हलपिंगला आलेलं रीळ उघडून ते एका विशिष्ट रसायनात (हायपो) बुडवून ठेवावे लागे. थोड्या वेळाने ते काढून स्वच्छ पाण्याने धुऊन ती फिल्म वाळत ठेवतात. त्याला negative म्हणतात.

एक छोटा projector असतो त्यात चांगल्या negatives घालून photo graphic paper वर प्रतिमा पाडतात. हे काम कौशल्याचे असते. कारण कागदावर काही दिसत नाही. फोकसिंग अचूक करावे लागते. नंतर तो कागद दुसऱ्या रसायनात टाकल्यावर रासायनिक क्रिया होऊन चित्र उमटते. त्याला fixing म्हणतात. तो फोटो स्वच्छ पाण्याने धुऊन सुकवतात व चारी बाजूने कापतात. असा फोटो तयार होतो.

==========

टेलिफोनचा उगम

मेरे पिया गये रंगून
वहाँसे आया टेलिफोन..
पिया की याद सताती है ।

हे गाणं रेडिओ सिलोनवर नेहमी लागायचं. त्या वेळी म्हणजे ब्रह्मदेश स्वतंत्र झाला नसावा व ब्रिटिश साम्राज्याचा भाग असावा. कॉडलेस फोनचा शोध लागलेला नव्हता. टेलिफोन एक्सचेंज ते घर, तारांची जोडणी असल्याशिवाय हे शक्य नाही. टेलिफोन घरी असणं हे status symbol होते. पोस्ट खाते, सरकारी कार्यालये, मंत्री, अधिकारी यांच्याकडे टेलिफोन असायचे. Call करायचा म्हणजे एक्सचेंजला सांगितले की operator जोडून द्यायचा. परगावी फोन करायचा म्हणजे ट्रंक बुकिंग करावे लागे व वाट पहात बसावे लागे. याला ट्रंक का म्हणत हे मला कळलं नाही.

वेगवेगळ्या रंगाचे व आकाराचे फोन असत. फोनची रिंग ही ट्रिंग ट्रिंग अशी common होती. टेलिफोन नंबरचे पुस्तक जाडजुड व इतक्या लहान अक्षरात छापलेले असायचे की चष्मेवाल्यांचा धंदा जोरात चालावा. Alphabetically नंबर असल्याने तीन-चार जाडजूड पुस्तके सांभाळावी लागत. दरवर्षी supplements पण निघत. आम्ही जेव्हा वर्ध्याच्या गांधी आश्रमात गेलो होतो तिथं आजही जुना फोन जतन केलेला पाहता आला. व्हॉईसरॉय दिल्लीहून म. गांधींशी थेट या फोनवर बोलत.

एखादे मांजराचे पिल्लू जसं नव्या वस्तूला हात (पाय) लावते तसा आम्ही फोन हाताळत असू. कोणता भाग कानाला लावायचा, फोन कसा धरायचा, कसा ठेवायचा, वगैरे शिक्षण घ्यावे लागले. मिनिटा मिनिटांला पैसे मोजावे लागत असल्याने दडपण येई व महत्त्वाचे बोलायचे राहून जाई. आमच्या नात्यात प्रथम मावशीकडे फोन आला. त्यामुळे आसपासच्या लोकांचेच फोन यायला लागले.

'जरा त्यांना बोलावून घेता का?', 'जरा निरोप देता का' हे नित्याचेच झाले होते. सांगावं तरी पंचाईत न सांगावं तरी पंचाईत.

टेलिफोनचा जसा प्रसार झाला तशा टेलिफोन ऑपरेटरच्या नोकऱ्या निर्माण झाल्या. टायपिस्ट वा स्टेनोटायपिस्ट जसे रुबाब दाखवत तसे टेलिफोन ऑपरेटर

दाखवत. कंपन्यांमध्ये रिसेप्शनिस्टच्या गळ्यात हे काम मारले व intercom चे पर्व सुरू झाले.

आमच्याकडे कुठे फोन होता? आकर्षण मात्र होते. काडेपेट्याना दोरा लावून आमचं communication चाले. ओढा- ओढीत दोरा तुटायचा व परत एकजण मेकॅनिक बनून दुरुस्ती करायचा. असा हा मूळ टेलिफोन नंतर landline नावाने नावारूपाला आला.

==========

टेलिफोनचा विस्तार

हळूहळू जेव्हा टेलिफोनचे जाळे पसरू लागले तसतशी त्याची लोकप्रियता वाढत गेली. इकडे इलेक्ट्रॉनिक्सची घोडदौड सुरू झाली. डायल करता येणारे फोन मार्केटमध्ये आले. सार्वजनिक ठिकाणी टेलिफोन बूथ उपलब्ध करून देण्यात आले.

तसे दहा पैशाचे नाणे टाकून फोन करता येऊ लागले. त्यामुळे अनेकांची सोय झाली. एक रुपयात भारतात कुठेही तीनं मिनिटे बोलता येऊ लागले. अधिक वेळ बोलायचं असेल तर खाजगी communication सेंटरवर जाऊन फोन करावा लागे. हे सर्व शक्य झाले ते दळणवळणाचे उपग्रह यामुळे.

इतके असूनही टेलिफोन बुक केल्यावर सात वर्षांपर्यंत थांबावे लागे. अनेक ठिकाणी एक्सचेंजीस उघडल्यावर, अंडरग्राऊंड केबल टाकल्यावर फोन मिळायला लागले. लोकल, देशात व परदेशात फोन करता येऊ लागले व जग जवळ यायला लागले. फोनवर फार वेळ बोलू नका, इतरांचा खोळंबा करू नका असे संदेश प्रसारित व्हायला लागले. सिनेमात गाण्यासाठी, बातचीत करत गोष्ट पुढे ढकलण्यासाठी फोनचा उपयोग केला गेला. निनावी फोन करून धमक्या दिल्या गेल्या. खंडणी वसुली केल्या गेल्या.

इलेक्ट्रॉनिकमध्ये प्रगती, उपग्रहाद्वारे दळणवळण यामुळे लिखित स्वरूपात संदेश पाठवता येऊ लागल्यानं लोकांनी 'पेजर' विकत घेतले. येथूनच मोबाईल फोनची बीजे रूजवली गेली व अनेक कंपन्या मोबाईल घेऊन मार्केटमध्ये उतरल्या.

==========

इतर संपर्क माध्यमे : Walky-Talky to Mobile Phones

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात संदेश प्रसारित करण्यासाठी Walky-Talky चा उपयोग केला गेला. त्याची रेंज व क्षमता तशी कमी होती पण दुर्गम भागात त्याचा चांगला उपयोग होत असे. Cordless व battery यांचा उपयोग व ठरावीक frequency च्या विद्युत चुंबकीय लहरींचा वापर करून संदेश दळणवळण करता येऊ लागले.

त्याच पध्दतीने घरोघरी cordless फोन वापरता येतील असे फोन बनवणाऱ्या कंपन्या उदयास आल्या. डायलिंग करण्यासाठी बटणं असणारे आकर्षक फोन बाजारात आले. Cordless phone असणं प्रतिष्ठितपणाचं लक्षण मानण्यात येऊ लागलं. फोनची रिंग वाजली की फोन उचलून देणं हे मुलांचं व घरी कामाला असणाऱ्या बायकांचं काम झालं. याही फोनची रेंज कमी होती. उपग्रहाद्वारे जेव्हा दळणवळण सुरू झाले व तेव्हा मॉडर्न cordless phone खरोखर mobile झाले व रेंज खूप वाढली. देशात व परदेशात फोन करता येऊ लागले. पेजर इतिहासजमा झाले व mobile वर sms पाठवता व स्वीकारता येऊ लागले. रेडिओवरची गाणी व क्रिकेट ची commentary फिरत फिरत ऐकता येऊ लागली. वेगवेगळ्या कंपन्या उदयास आल्या व स्पर्धा सुरू झाल्याने आकार, वजन व किंमत आवाक्यात आल्याने ते फोन सर्वत्र लोकप्रिय झाले.त्यामुळे खरे टेलिफोन Land झाले व Landline नावाने नावारूपाला आले.

अर्थात नवी मालिका उदयास येऊ पहात होती व टेलिफोन क्षेत्रात क्रांती होणार होती. त्यांचा smartness वाढणार होता.

==========

तो पहात आहे.. !

जसा सीसीटीव्ही कॅमेरा सतत २४ X ७ लक्ष ठेऊन असतो. तसं अजून कुणीतरी आपल्यावर लक्ष ठेऊन असतं. ती व्यक्ती आपल्याला दिसत नाही पण ती असते. हवा दिसते का ? पण ती असते ना ? तसंच ती व्यक्ती अदृश्य स्वरूपात आपल्या सोबत असते. अगदी सावलीसारखी. सावली दिसू शकते पण ती व्यक्ती नाही. तिला परमेश्वर म्हणतात. आपल्या प्रत्येक कृतीवर तिचं लक्ष असते. ती आपल्याला पहात आहे, लक्ष ठेऊन आहे हे जेव्हा आपल्या लक्षात येईल व विश्वास बसेल तेव्हा आपल्या हातून बेकायदेशीर गोष्टी होणार नाहीत. आपल्या कर्माची फळं आपल्यालाच भोगायची आहेत.

बाणांच्या शय्येवर पडलेल्या भीष्मानी भगवान श्रीकृष्णाना विचारलं की, 'असं माझ्या हातून काय घडलं की मला या मरणयातना सोसाव्या लागत आहेत.' श्रीकृष्णाने स्मितहास्य केले व भीष्माचार्यांना त्यांच्या मागील जन्माची आठवण करून दिली. त्यांनी त्या जन्मी, निवांतपणे एका फुलांवर बसून मकरंद सेवनात गुंग असलेल्या भृंगाला काट्याने टोचून दुखावलं होतं.

आपल्याही दैनंदिन जीवनात अशा अनेक गोष्टींमुळे चिडचिड होते, राग येतो व रागाच्या भरात भलतेच काही करून बसतो. निसर्गाचा नियमच असा आहे की, प्रत्येक क्रियेला प्रतिक्रिया आहेच आहे; फक्त योग्य वेळ यावी लागते. जसं घडलं तसं स्वीकारणं आपल्या हातात आहे. ते तसं होणार आहे हे गृहीतच धरले पाहिजे.

माझे वरिष्ठ अधिकारी कांजूरमार्ग व नंतर भांडूपला (नावच सांगायचं तर R. R. Deshpande) असं म्हणायचे की, आपल्याला एखाद्याचे भले करता आलं नाही तरी त्याचं वाईट चिंतू नये. आणि हे खरंच आहे. जो तो आपल्या कर्माची फळे भोगत असतो.

पूर्व कर्मानुसार तशी बुद्धी होत असते. पण यात गंमत अशी आहे की हे आपल्याला एकदा कळलं की, निदान या जन्मी तरी सावधानता बाळगता येते व कळत नकळत चांगल्या गोष्टी आपल्या हातून होत जातात. आपली दिनचर्याच

बदलत जाते. अशा रितीने कुटुंबातील, समाजातील, कार्यालयातील सर्व सदस्यांनी वागायचं ठरवलं तर काय बहार होईल. वातावरण प्रसन्न राहील. मत्सर, असूया राहणार नाहीत. चिडचिड होणार नाही. घडून गेलेल्या गोष्टींचं वैषम्य वाटणार नाही. पहा पटते का ?

==========

बलुतेदार

वेगवेगळे पारंपरिक व्यवसाय करणारे,त्यात निष्णात असणारे व त्या नावाने उपजीविका करण्यासाठी काम करणारे म्हणजे बलुतेदार. अशा बारा बलुतेदारांची नोंद आहे. याव्यतिरिक्त इतर व्यावसायिक ठरावीक वेळी घरोघरी येत, काम करीत व पोट भरत.

पिंजारी (गादीवाला)

काळ आधीचाच, म्हणजे १९५३ ते १९६१चा..

शनिवार-रविवारच्या सकाळी, एक भलेमोठे लाकडी धनुष्य घेऊन, फडर फट, फडर फट असा धनुष्याच्या दोरीवर लाकडी डंबेल बडवून आवाज करत एक माणूस जायचा. तो आवाज आला की ओळखायचं, की गादीवाला आला.

पावसाळ्यापूर्वी गाद्या करून घ्यायच्या ठरल्यावर, तो माणूस, छपराला आडवे धनुष्य अडकवून गाद्या फाडायला घेई व कापसाचे गोळेच्या गोळे बाहेर काढी. जेवायच्या वेळेपर्यंत कापूस पिंजायचे काम चाले. घरभर कापसाच्या म्हाताऱ्या उडत रहायच्या.

दुपारनंतर कापडाच्या घोळात, कापूस भरणं चालू व्हायचं. मग तोंड शिवणे,टाके मारणे व काठीने झोडपणे होई. ढब्बू, लडदू गाद्यावर उड्या मारायला व लोळायला मजा वाटायची. दर तीन-चार वर्षांनी, गाद्या नव्या करण्याचा कार्यक्रम असायचा.

घरात ढेकूण खूप असायचे व ते सांद्री कोपऱ्यात लपलेले असायचे. त्यामुळे ढेकूण मारून रॉकेलमध्ये टाकायचे किंवा मैनेच्या पोटात आहूती द्यायची हा दिनक्रम असायचाच. गाद्या उन्हात टाकणे व पुन्हा घरात आणणे जिवावर यायचे. नवीन केलेल्या गाद्या गुंडाळणे तर महाकठीण. चोराच्या मुसक्या जशा आवळाव्या तशा गाद्या सतरंजीत गुंडाळाव्या लागत.

माझे आजोबा 'सतरंजी' हा शब्द 'सप्तरंगी'चा अपभ्रंश कसा आहे, ते

रंगवून सांगताना गादीला 'वळकटी' हेही नावं आहे हे आवर्जून सांगत. अशी ही बेळगावची गादी व गादीवाला, ही साठा उत्तराची कहाणी पाचाउत्तरी सुफळ संपूर्ण.

==========

लाकूडफोड्या

आपण लाकूडतोड्याची गोष्ट ऐकली असेल, आज मी लाकूडफोड्याविषयी थोडं सांगणार आहे.

आम्ही बेळगावला असताना पावसाळ्यापूर्वी सरपणाची सोय करावी लागे. त्यामुळे लाकूडफाटा जमा करावा लागे. एकदा होळीचा सण होऊन गेला की, लाकडाच्या गाड्या यायला लागत. आपल्या आवाक्यातील किंमत आली की आम्ही गाडीभर लाकडे विकत घेत असू. ती अंगणात उतरवून घेतली जात. ती लवकरात लवकर फोडून घेऊन जाग्यावर रचून ठेवण्याचे एक मोठे काम असे. घराबाहेर ठेवलेले लाकडांचे ओंडके पाहून लाकूडफोडे विचारायला येत.

एक-दोन दिवस घासाघीस करून आमची आई लाकडे तोडायला सांगे. लांबी-रुंदी व जाडी किती पाहिजे यावर भाव ठरे, नाहीतर चुलीत वा बंबात ती गेली नाहीत तर मेहनत व पैसे पाण्यात जायचे.

आडवे-उभे ओंडके ठेऊन लाकूडफोड्या सकाळी कामाला सुरुवात करायचा व संध्याकाळपर्यंत गाडीभर लाकडे फोडायचा.लाकडे फोडताना तो एक विशिष्ट आवाज करायचा. त्याला आपण घुमणे म्हणूया. ती फोडलेली लाकडे माळ्यावर रचून ठेवायचे काम आम्हा मुलांचे असायचे. आमच्या घराला तीन माळे होते. एक स्वयंपाकघरात, दुसरे कोठीच्या खोलीत व तिसरे माजघरात.

मी स्वयंपाकघरातील माळ्यावर चढत असे. शिडी नव्हती. मी दारावरून चढत असे. कुंदा व सुधा, आळीपाळीने लाकडे आत आणत व मी ती रचत असे. लहान लहान तुकडे 'बंबफोड' या नावाने न्हाणीघराजवळ, कोळशाच्या पोत्याच्या संगतीने, आई ठेवायची. लागतील तशी लाकडे काढून देणे हे माझे काम असे.

लाकूडफोडे वखारीत काम करत व सुट्टी दिवशी खाजगीरित्या काम करीत. ही कामं होळी नंतर करावी लागत, कारण होळीला हमखास चोरी झालीच समजा. तो संपूर्ण दिवस आम्ही busy असायचो व केलेल्या कामाची पावती संध्याकाळी मिळायची. अजूनही ते दिवस आठवतात.

==========

परीट

आमच्या घरी दर शनिवारी वा रविवारी एक व्यक्ती कापडाचे गाठोडे घेऊन यायची. हुश्श करून बसायची. तांब्याभर पाणी घटा घटा पिऊन गाठोड्याची गाठ सोडायची. गाठ सोडताच एकदम वॉशिंग सोड्याचा वास यायचा.

हो. बरोबर ! ती व्यक्ती म्हणजे आमचा परीट.

कपडे धुण्यासाठी व इस्त्री करण्यासाठी फक्त वडिलांचे कपडे असत.ते फक्त पांढरे व लांब हाताचे शर्ट घालत. शर्टाला चांदीची बटणे व हाताला चांदीची कफलिंक असत. एकदा हाताची कफलिंक काढायची राहून गेली; पण परीटाने प्रामाणिकपणे परत केली होती.

कधी कधी कोटही देत असू, तेव्हा सगळे खिसे तपासावे लागत. आमच्या कपड्यांची वा आईच्या पातळांची कधी भट्टी झाली नाही. चादरी वा पलंगपोस मात्र परीटाला धुण्यासाठी देत असू. या कपड्यांची एक नोंदवही होती. कपडे किती दिले व धुवून आले याची नोंद मोठे बंधू ठेवत.

आम्ही एक शक्कल लढवली होती.सपाट बुडाचा तांब्या घेऊन त्यात कडकडीत गरम पाणी भरून तो इस्त्री म्हणून वापरायचो. कधी तांब्या कलंडून कपड्यावर व आमच्या शक्कलीवर पाणी पडायचे.शर्टाच्या कॉलरवर बिब्ब्याच्या काळ्या शाईने नाव लिहिलेले असायचे. (परीटाची ही पद्धत गुन्हेगार पकडण्यासाठी उपयोगी पडायची असे म्हणतात.)

दुकानात इस्त्री करायला कपडे दिले तर दहा कपड्यांना १/- रु.लागे. कपडे

dry cleaning करणे आमच्या आवाक्याबाहेरचे होते. असा हा परीट पावसाळ्यात वाट पहायला लावायचा.

'परिटा येशील कधी परतून..' असे शब्द ओठांवर येत.

==========

तांब्या बिदगी बावडै

हा व्यावसायिक फारसा तसा कुणाला माहीत नाही; पण आमच्या लहानपणी तो असे. त्याला इतकं महत्त्व असे की त्याची वाट पहावी लागे. थोडा जिवाशी खेळ असायचा. पण पोटासाठी त्याला तो करावा लागे. थोडा श्वास कोंडून उघड्या अंगाने बर्फासारख्या थंड पाण्यात खोल उतरायचे व अंधारात चाचपडत असल्याप्रमाणे काम करणे सोपे नसते.

पावसाळा असेल तर विहिरीत जास्त पाणी असायचे व काम अधिक अवघड व्हायचे. आता हे केलेले वर्णन व लेखाचे शीर्षक याचा काय संबंध असे वाटेल, पण तसे नाही.

पूर्वी घरोघरी विहिरी असत. नळाने पाणीपुरवठा नव्हता. रोज पाणी शेंदून भरून ठेवावे लागायचे. त्यासाठी घागरी असत. लहान घागरींना 'बिंदगी' म्हणतात. घागरी ओढायला काथ्याचा दोरखंड असे. त्याचा सूरगाठ केलेला फासा घागरीच्या तोंडाला आवळून ती घागर पाण्यात सोडायची व भरल्यानंतर वर कप्पीवरून ओढून घ्यायची. बेळगावला कप्पीला 'गडगडा' म्हणतात.

दोर जुना असेल तर हमखास तुटायचा व घागर पाण्यात खोल बुडायची व पंचाईत व्हायची. कधी कधी फासा सैल व्हायचा व घागर निसटून पाण्यात पडून बुडायची. तेव्हा ती काढण्यासाठी वर उल्लेख केलेले पाणबुडे लागत.

अधूनमधून ते 'तांब्या बिंदगी बावडै' असे फिरत व त्यांच्याशी हुज्जत घालत काम करून घेतले जाई.

तांब्या वगैरे पडल्यावर हे काम घरच्या घरी करता येत असे. त्याकरिता

ज्यांच्याकडे 'पाताळगड' आहे त्यांच्याकडून तो आणावा लागे.

आता पाताळगड म्हणजे काय ते सांगतो.

एक-दीड फूट लांबीच्या दोन लोखंडी पट्ट्या असतात. त्याला वरती दोर बांधायला एक कडे असते.पट्ट्यावर छोट्या छोट्या नांगराच्या आकाराच्या कड्या अडकवलेल्या असतात. तो पाताळगड दोर लावून पाण्यात सोडून हलवायचा की झालं. त्या कड्याना लहान तांबे अडकले की दोर खेचून वर काढायचा. दोर तुटून पडला असेल तर काम अधिक सोप्पं.

आता हे सारं आठवलं की वाटतं, अहा ते सुंदर दिन हरपले.

==========

कल्हईवाले

घरोघरी येऊन काम करणारे आणखी काही व्यावसायिक म्हणजे कल्हईवाले, डब्बे व छत्र्या द्रोस्तवाले व केस कापणारे नाभिक..

पूर्वी घरोघरी पितळेची भांडी मोठ्या प्रमाणात वापरात होती. त्या भांड्यांना आतून कल्हई लावावी लागे, त्यामुळे पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यानंतर हमखास येत. कोणती व किती भांडी यांचा सौदा झाला की महाराज अंगणात योग्य जागी खड्डा करत व तिथं आपला भाता बसवत. त्याला बादली भरून पाणी व जुनी फडकी द्यावी लागत. खड्डा थोडा वाळला की तो त्यावर कोळसे टाकून ते पेटवायचा, ते फुलवायला भात्याचा उपयोग करायचा. भांडे त्यावर गरम करून त्यात नवसागर टाकायचा.खूप धूर बाहेर पडायचा.नवसागराने भांडे स्वच्छ व्हायचे. मग सांडशीने ते भांडे निखाऱ्यावर फिरवायचे व ते करताना आत कथिलाच्या धातूची कांडी फिरवायची व वितळलेला धातू, फडक्याने भांड्यावर पसरवला की भांडे चांदीवाणे चमकले की फुस्सकरून ते गरम भांडे पाण्यात बुडवले की झाली कल्हई. कल्हईचा वास आसमंतात दरवळला की आसपासचे लोक भांडी आणून देत व कल्हईवाल्याचा धंदा होई.

आमची भांडी कल्हई करून झाली की आमचे काम सुरू. कुंदा चिंच लावून राखेने घासून द्यायची, मी व सुधा ती धुवून वाळत घालण्याच्या काठीवर उलटी करून वाळायला ठेवत असू. एकेक वर्षाआड हा कार्यक्रम असायचाच. आता बऱ्याच लोकांना कल्हई माहीत नाही.

कल्हई केलेल्या भांड्यात स्वयंपाक करायला व ताट-वाटी घेऊन जेवायला मिळताना जो आनंद मिळतो तो चांदीच्या ताट-वाटीत नाही.

==========

छत्री द्रोस्तवाला

घरोघरी येऊन काम करणारी दुसरी व्यक्ती म्हणजे 'छत्री द्रोस्तवाला'. पूर्वी लाकडी दांड्याच्या छत्र्या होत्या. रंगीबेरंगी दांडा असणारी छत्री म्हणजे श्रीमंतीचं लक्षण. लाकडी दांडा असलेल्या छत्रीचा दरवर्षी काही ना काही प्रॉब्लेम असायचाच. घोडा मोडला आहे, दांडा फुगला आहे, कापड शिवायला हवं आहे, किंवा काडी बदलायला हवी आहे .. अशी एक ना अनेक कारणे.

आमचे वडील वर्क फ्रॉम होम करताना पोस्टमन लोकांचं येणं-जाणं असे. त्यांची सरकारी धष्टपुष्ट छत्री व आत कमळाचा आकार असणारी छत्री मला फार आवडायची. त्या काळी हरणछाप छत्र्या फेमस होत्या.

छत्र्या दुरुस्तीचं काम नसलं की पत्र्याच्या डब्याची झाकणं करणं, पत्र्याच्या बारड्यांची गळती बंद करणं, कड्या बसवणं ही कामं असायची. तेव्हा प्लास्टिकच्या बादल्या नव्हत्या, असल्याच तर तांब्या-पितळेच्या असायच्या. असो.

==========

नाभिक

नंतरचा बलुतेदार आमच्याकडे येणारा म्हणजे नाभिक. आठवड्यातून एकदा तरी यायचाच. कारण आमचे वडील घरी दाढी करत नसत. आजोबांचेही केशकर्तन व नखकर्तन असायचे. एकदा केस कापून घेतले की दोन दिवस मानेची आग व्हायची. आता केस कुटु कुटू करणारे मशिन इतिहासजमा झाले आहे. जावळ वगैरे असले वा मुंज असली की हे लोक खुष. कमाई बरोबर शर्टाचे व प्यांटीचे कापड हक्काने मिळायचे.

==========

चिंतनमाला

चिंतन ...१ - विचार बदला... नशीब बदलेल !

कै. वामनराव पै यांनी म्हटल्याप्रमाणे : 'विचार बदला, नशीब बदलेल.' नेहमी दुसऱ्याने बदल करावा, ही अपेक्षा न ठेवता स्वतः बदलायचे ठरवा. जीवन सुखी होईल. कधी कधी, आपल्याच बाबतीत असे का होते याचा विचार येतो व तुमचं मन विषण्ण होतं. याचं कारण तुम्ही स्वतःच आहात, किंवा तुमची पूर्वजन्मीची कर्मे आहेत. कळत-नकळत कधी कुणाला तुम्ही दुखावले असेल व तुम्हाला पश्चात्ताप झाला नसेल, तर तुमच्याही कधी ना कधी वाट्याला येईल.

==========

चिंतन...२ - कृतीशील बना !

Do you know what is 'blog' .. ?

It started in 1994 to express your views or to communicate something, so many people can know it about daily life and share.

"Blog" is a shortening of "Weblog".

काल लिहिलेला blog, मला ११वी ला J. Krishnamurti वरील एक धडा शिकविताना सुचला.

दुसऱ्यामध्ये बदल करण्यात शक्ती व वेळ वाया घालवण्यापेक्षा स्वतःत अनुकूल बदल करणं शक्य असतं किंवा तसा प्रयत्न जरूर करता येतो. त्यात यश मिळेलच असं नाही पण प्रयत्न केल्याचं समाधान नक्कीच मिळतं. आता कुणी म्हणेल, 'कसं ?' जगातील सर्वजण असंच म्हणतात, 'कसं?' कृष्णमूर्तींनी सुंदर उदाहरण दिलं आहे.

समजा, तुम्हाला एक साप दिसला व तो एक अत्यंत विषारी आहे तेव्हा

तुम्ही असं विचारता का, 'की कृपया मला सांगा, मी कसा पळून जाऊ ?' तुम्ही आपोआप क्षणाचा विलंब न लावता पळून जाता ना ? तेव्हा साप निघून जाईल याची वाट न पाहता तुम्हालाच कृती करायची आहे. नाही तर काय परिणाम होईल ते सांगता येणार नाही.

==========

चिंतन...३ - देव आहे का ?

आपल्यासारख्या सामान्यजनांना नेहमी भेडसावणारा व कोड्यात टाकणारा प्रश्न म्हणजे ,'देव आहे का?' या विश्वाचा अथवा जगाचा नित्याचा कारभार कसा चालतो ? 'भ्रामयन सर्व भूतांनी यंत्रारूढानी मायया' असं भगवान श्रीकृष्णाने गीतेत जरी सांगितले असले तरी प्रत्यक्ष प्रमाणाशिवाय कसं पटणार ?

ती कोणती तरी अद्‌भुत शक्ती आहे हे गृहीत धरावे लागते. या शक्तीला निर्गुण-निराकार अशा परब्रह्माची संकल्पना पुढे येते. तिला साकार करून त्याचं रूपांतरण मूर्तीत केलं असेल काय ? ती अदृश्य शक्ती आपल्या चर्मचक्षूना गोचर होत नसली तरी तिची जाणीव या ज्ञानेंद्रियांना होत असते. उदाहरण द्यायचे झाले तर हवेचं अस्तित्व नाकारतो का ? ती दिसत तर नाही. प्रचंड ऊर्जेचा स्रोत असणाऱ्या विद्युतशक्तीचं अस्तित्व नाकारता येईल का ? ती सुध्दा दिसत नाही. तसेच उष्णतेचं आहे. ती आपण नाकारू शकत नाही. ती शक्तीस्वरूप आहे.

==========

चिंतन...४ - तुझे आहे तुजपाशी..!

देवाच्या अस्तित्वाविषयी चर्चा सुरू असताना माझ्या मित्राचं समाधान झालेलं मला दिसत होतं. त्याची चुळबुळ चालू होती, त्याला काही तरी विचारायचं होतं.

मी काही बोलणार इतक्यात तोच मला म्हणाला,' तू देव पाहिला आहेस का? अथवा तुला अनुभव आला आहे का ?' माझ्या मनात हेच होते की, त्यानं आपणहून विचारावं. मी म्हणालो,' मी देव पाहिला आहे.' तो एकदम आश्चर्यचकित झाला. मी म्हणालो,' मी तुला तो दाखवतो. तू याची देही याची डोळा पहा.' आता माझी भूमिका भगवान गोपाळकृष्णाची व त्याची अर्जुनाची होती.

मी त्याला म्हटलं, 'मित्रा, उद्या सकाळी आपण प्रभातफेरी मारायला जरा शहरापासून दूर थोड्या उंच ठिकाणी जाऊया. तू माझ्या बरोबर ये.' तो तयार झाला.एखादी गोष्ट जाणून घ्यायची इच्छा त्याच्या डोळ्यांत स्पष्ट दिसत होती.

==========

चिंतन... ५ - सूर्यदेवाचे दर्शन

दुसरे दिवशी ठरल्याप्रमाणे पहाटे पहाटे माझा मित्र माझ्या घरी आला. मीही तयार होतोच. आम्ही दोघेही मग बाहेर पडलो. थोड्याच वेळात MSEB ने कृपा केली. वीज गायब झाली. सर्वत्र अंधार. आम्ही पुढे जायचं ठरवलं. खाचखळग्यातून वाट काढत जात असताना माझा मित्र मोबाईल काढताना दिसला. त्याला battery on करायची होती. पण मी त्याला रोखले. हळूहळू, मला हव्या त्या ठिकाणी आम्ही पोहोचलो व एका कातळावर बसलो. 'मला तू या अंधारात कुठे आणलं आहेस ?' मित्र म्हणाला. मी म्हणालो, 'अरे, प्रत्यक्ष देव दर्शनाला !' काही वेळाने उगवती तांबूस व्हायला लागली. काही वेळाने ती लालबुंद झाली. मी तिकडं बोट करून म्हणालो, 'ते बघ ! देवाचा दूत वर्दी द्यायला आला आहे.' थोड्याच वेळात सूर्यदेव प्रकटले. मी हात जोडले. मित्रानेही नमस्कार केला.

मी म्हणालो, 'हा सूर्यदेव, जगाचा निर्माता, थोड्या वेळापूर्वी तुला डोळे असूनही दिसत नव्हतं. तुला या देवानं प्रकाश दिला. साऱ्या जगाला ऊर्जा दिली. वनस्पती ती ऊर्जा घेऊन स्वतः साठी व सर्व प्राणीमात्रासाठी अन्न तयार करतील. ते त्यांनी केलंच नाही तर तू माझ्या शेजारीच नव्हे तर या जगात येऊ शकला नसतास.

तो नियमित येतो. तुम्हा सर्वांना दर्शन देतो. हा देवच आहे ना?' माझा मित्र स्तब्ध होता. त्याचे विचार बदलायला लागले होते.

हळूहळू सारी सृष्टी जागी झाली. 'विश्वामित्र ऋषीनी जो गायत्री मंत्र लिहिला तो या गायत्री देवतेला वंदन करून अर्घ्य देण्यासाठी. किती शक्तीशालीन मंत्र आहे हा. दहा वेळा जरी तो श्रध्दापूर्वक म्हणशील तर तुझ्या शरीरात ऊर्जेचा संचार होईल. 'करोना' साथीनं जेव्हा जगाला वेढले तेव्हापासून मी योगासने झाल्यावर सूर्याला आवाहन करतो व म्हणतो, 'हे सूर्य नारायणा ! तू माझ्या शरीरात अंशरूपाने नांदतो आहेस. तुझे तेज मी धारण केलं आहे ते माझ्या शरीरातून प्रकट होत आहे. त्यामुळे बाहेरून येणाऱ्या जिवाणू, विषाणू वा वाईट विचारांना शरीरात प्रवेश नाही, थारा तर नाहीच नाही.'

सूर्यदेवाला वंदन करून आम्ही परतलो. वाटेत तो मित्र अबोल झाला होता. मनात म्हणत असेल, देव तर माझ्या जवळच होता. मी उगाच भटकत होतो. सकाळची वेळ असल्याने कुठूनतरी रेडिओवर लागलेले गाणे कानावर पडले. 'कुठे शोधिशी रामेश्वर अन् कुठे शोधिशी काशी, हृदयातील भगवंत राहिला...!'

मित्राच्या खांद्यावर हात टाकताच तो भानावर आला. 'चल, काही दिवसांनी तुला दुसऱ्या देवाचे दर्शन घडवतो. अगदी विनासायास..' मी म्हणालो.

==========

चिंतन...६ - चंद्रदेवाचे दर्शन

काही दिवस असेच निघून गेले. नव्हे ते मी घालवले, कारण माझ्या मित्राने विचारणा करावी ही इच्छा व ठरावीक दिवस येण्याची मी पहात असलेली वाट.

अखेर तो दिवस आला व मित्राला या वेळी संध्याकाळी येण्यास सांगितले. त्यालाही थोडंसं आश्चर्य वाटलं. आधीच्याच ठिकाणी जाण्यासाठी आम्ही निघालो. शरद पौर्णिमा होती. पूर्व दिशेला 'चंद्रदेवा'चे आगमन झाले. मी मित्राला म्हणालो, 'हा तो दुसरा देव. दर्शन घे.'

माझा मित्र थोडा बुचकळ्यात पडलेला पाहून मी समजावणीच्या स्वरूपात त्याला म्हणालो, ''कल्पना कर चंद्र नसताच तर, पृथ्वीवर शीतलता आलीच नसती. अंधाऱ्या रात्रीची शीतलता व पौर्णिमेची शीतलता यात जमीन-अस्मानाचे अंतर आहे. हा चंद्रदेव काय करतो ते गोपालकृष्णानी भगवत् गीतेत सांगितले आहे. तो वनस्पतींचे पोषण करतो. फळात माधुर्य भरतो. औषधी वनस्पतीत त्यांचे विविध गुणधर्म भरतो जे आपल्याला औषधरूपी मिळतात. 'पूष्णामि चौषधी:सर्वा:.....' चंद्रकिरणांची शीतलता अतुलनीय आहे. म्हणून चंद्राला शंकरांनी शिरोधार्य केलं आहे. बीजधारणा होण्यासाठी पोषक वातावरण करणारा, आनंद देणारा हा चंद्रदेव तू प्रत्यक्ष पहा..'' माझा मित्र पहात होता व आपसूकच त्याचे हात जोडले गेले. देव दिसत नाही असं म्हणणारा माझा मित्र 'तू म्हणतोस त्यात तथ्य आहे'. इथपर्यंत आला.

आम्ही चंद्रदर्शन घेतले व परतलो. वाटेत मी मित्राला म्हणालो,' मी तुला आता आणखी दोन देवांचे प्रत्यक्ष दर्शन घडवतो व तेही लवकरच...'

==========

चिंतन ... ७ - आई-वडील हेच खरे दैवत !

नेहमीप्रमाणे सकाळच्या वेळी प्रभातफेरी मारताना माझ्या मित्राची गाठ पडली. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या.

'आई-वडील कसे आहेत?' मी त्याला विचारले.

'अरे ते तुझी सारखी आठवण करतात.' ते मला म्हणतात, 'तुझ्या मित्राने काय जादू केली अन् तू बदलून गेलास !'

'असं ?'

'अरे तू माझे डोळे उघडलेस. तुझे उपकार आहेत माझ्यावर. नास्तिकाकडे मी वळत होतो. मलाच देव का भेटत नाही असं म्हणत होतो, तो देव मी आता माझ्या आई-वडिलांत पाहतो. केवढा मोठा आधार आहे मला. माझ्या पत्नीला मी

अन्नपूर्णा म्हणून पाहतो. मुलात व भावंडात गोकुळ पाहतो. माझं घर आता वृंदावन झालं आहे. घरानं मरगळ टाकली आहे .घरात उत्सवाचं वातावरण आहे.

मी माझ्या बहिणीला सांगितले आहे, सुदैवाने तुला सासू-सासरे आहेत. तू त्यांच्यावर बिनधास्त घर टाकून जातेस. तुझ्या मुलांना ते सांभाळतात. त्यांना तू आई-वडिलांसारखे सांभाळ. त्यांच्यासारखं दुसरं दैवत नाही. माझा विश्वास आहे. तू सासूरवाशीण आहेस. त्यांना तू मुलगी वाटली पाहिजेस असं वाग. त्यांना तू अंतर देऊ नकोस. मी मध्यंतरी बहिणीकडे गेलो होतो. तिलाही पटलेले दिसले. माझा मित्र मनापासून बोलत होता. असं मी काय केलं ,,,? मला कळेना. पण मला एक समाधान प्राप्त झाले होते, 'देव कशात आहे' हे सांगण्याचे मला भाग्य लाभले होते.

हा प्रयोग मी मित्रावर करू शकलो. पण 'माझ्याच घरात मी यशस्वी होईन का ? याचं उत्तर मला देव देईल का ? का सृष्टीच्या नियमानुसार मलाच बदलावे लागेल ?'

संत तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे, 'बुडताती जन पाहवेना डोळा, म्हणून कळवळा करुणेचा..' हा विचार डोक्यात घोळवत मी घराकडे वळलो.

==========

चिंतन ...८ - देवाचा महिमा !

पहाटेची वेळ, नेहमीप्रमाणे मी व माझा मित्र, morning walkला निघालो. बराच वेळ शांततेत गेला. हळूहळू उजाडायला लागलं. दूरवर कुठेतरी प्रभात गाणी लागली होती, ती कानांवर पडत होती. नेहमीचीच गाणी आज वेगळंच सांगून जात होती.

'देव देव्हाऱ्यात नाही, देव नाही देवालयी.'

'देव चोरून नेईल, अशी कोणाची पुण्याई?'

'किती अर्थपूर्ण गाणं आहे हे !' माझ्या मित्राला कंठ फुटला.

मी म्हणालो, 'मी उगाच नाही तुला देवदर्शन करत आहे, तूच सांग देव कुठे

नाही? देव तुझ्या जवळच आहे, तू इकडं तिकडं पहात होतास. आता जे भक्तीगीत ऐकलंस त्याची पुढची ओळ आठव.'

'तुझ्या माझ्या जड देही, देव भरूनीया राही.'

'दुधातले नवनीत सहज दिसतं का? पण नाही असं तू म्हणू नकोस? शोध म्हणजे सापडेल.'

'तुझ्या आजूबाजूला जे जडजीव पाहतो आहेस त्या प्रत्येकात भगवंत आहे.'

' जे जे भेटते भूत, ते ते मानीजे भगवंत.' अल्पसा विश्वास हवा.

सूर्य उगवला होता. परतायला हवं असं म्हणत आम्ही परत फिरलो.

==========

चिंतन ....९ - श्रद्धेची प्रचिती !

''भिऊ नकोस , मी तुझ्या पाठीशी आहे.'' हा स्वामी समर्थांचा आशीर्वाद समस्त भक्तगणांकरिता आहे. खरंच हा आशीर्वाद सर्वांना फलद्रूप होतो का? पेचीला सवाल आहे.

काही उदाहरण देता येईल का ? एखादी गोष्ट मनासारखी घडली तर कृपा झाली असं समजायचं का? श्रध्दा ठेवायची,पण ती कशी व किती याचं काही प्रमाण आहे का ? का फलाची अपेक्षा न ठेवता विहित कर्म करत रहायचे ? याचं उत्तर मी शोधत होतो. कधी कधी उत्तर शोधता शोधता मन सुन्न होतं. तरी पण त्या अज्ञात शक्तीवर विश्वास ठेवणे कधीही चांगलेच.

आम्ही बेळगावला असताना, मी एकदा वडगावला शेणवी नावाच्या एका गृहस्थाकडे माझ्या वडिलांबरोबर गेलो होतो. माझे वडील अधूनमधून त्यांच्याकडे जात असत. शेणवी कृष्णभक्त होते. त्यांना कृष्णाचा साक्षात्कार झाला होता. ते कृष्णाशी संवाद साधत असत. त्यांची मुलगी नलूताईची मैत्रीण होती. त्या दोघी एकाच ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिकत होत्या. एकदा कॉलेजची फी त्वरित भरायची होती. घरात तेवढे पैसे नव्हते. वेळ कमी होता. आता काय करायचे ? तिनं ही गोष्ट

वडिलांच्या कानावर घातली. त्यांनी मग कृष्णाची करुणा भाकली. द्रौपदीची जशी लाज राखलीस तशी माझी लाज राख अशी करुणा भाकली. त्यांनी गीतेच्या पुस्तकावर हात ठेवून कौल मागितला. कौल मिळाला.

त्यांच्या घरात एका भिंतीवर कृष्णाचे चित्र टांगले होते. त्या चित्रामागे जेव्हढे पैसे हवे होते तेवढे होते. याला काय म्हणायचे ? श्रध्दा की अंधश्रद्धा? देव आहे . मनापासून हाक मारल्यास तो धाऊन येतो हे नक्की.

==========

चिंतन....१० - विठूरायाचे स्वगत !

पहाटेचे पाच वाजले तरी विठूराया अंथरुणात लोळत पडलेले पाहून रखमेला आश्चर्य वाटले. राई पदर खोचून काम करत होती. तिच्याकडे कटाक्ष टाकून रखमा विठूरायाच्या दालनात आली, म्हणाली ' हे काय ?आज काकड आरतीला दांडी वाटतं ?'

विठूरायांनी डोक्यावरून अजून पांघरूण ओढून घेतलं. 'भक्त तिथं मंदिरात टाहो फोडत आहेत, स्वारीला काही त्यांचं आहे का?' इति रखमा..

टाळ-मृदुंगाचा आवाज वाढत होता.

ऊठ पंढरीच्या राया...

उठा उठा सकळीक..

उठी उठी गोपाला..

सगळे गजर झाले पण विठूराया इकडे ढिम्मच !!

शेवटी रखमाबाईंनी विचारलंच..'आज स्वारीला झालंय काय?' 'या भक्तांच्या मागं लागून मला जाम कंटाळा आलाय.' विठूरायानी कारण सांगितले. 'आता हेच बघ ना, त्या पुंडलिकाकडे मी गेलो तर त्यानं माझ्याकडे ढुंकूनही पाहिले नाही. ही वीट टाकून म्हणाला, 'जरा विटेवर उभा रहा आलोच.' अजून येतोय. कमरेवर हात ठेवून मी उभा आहे. पाय पण दुखायला लागले आहेत.'

रखमेला काळजी वाटली. 'काय बाई भक्त हे ?'

विठूराया उठून बसले, म्हणाले 'आता हेच पहा ना, तो ज्ञाना त्या चांगदेवाला रिसिव्ह करायला गेला. जायचं तर सरळ जायचं की नाही, भिंत चालवत गेला. ढकलून ढकलून माझी कंबर गेली. ते राहू दे. रेडा मंत्र म्हणेल का ? मी रामदासाच्या बोलक्या बाहुल्या पाहिल्या होत्या म्हणून बरं, वेळ निभावून नेली. मुक्तेला तरी मांडे करायचं काय नडलं होतं ? माझी पाठ भाजून निघाली.'

रखमाला हसू आवरेना. तिनं तोंडावर पदर धरला अन् म्हणाली, 'भक्तांना डोक्यावर घेता ना मग भोगा आता.' 'त्या जनाबाईनं तर कहर केला. चंद्रभागेच्या तीरी मी चक्क लुगडी धुतली व दळण दळून हात भरून आलेत.' विठूरायानी राग व्यक्त केला.

'आज संडे आहे त्यामुळे मला जरा आराम करायचा आहे. नाही तर ते सावता माळी येतील मला मळ्यावर न्यायला किंवा तुका तर येईलच शेत राखायला बोलवायला. त्याचं काय जातंय विठ्ठल विठ्ठल करायला, मला फटके बसतात मंबाजीचे. आता तू सांग बरं, नरहरीचा सोन्याचा हार कुणी चोरला ? मला भरपाई करावी लागली. सोनं किती महाग आहे पाहिलंस ना? या मीराबाईचं नाव घेऊ नको, मला वीष प्यावं लागलं.कशाला हट्ट करायचा त्या गिरिधर गोपाळाचा?'

'आता पुरे ! नाही ना उठायचं, पडा तर मग, मला हे नवीन नाही.' असं म्हणत रखमाबाईनी पूर्णविराम दिला व कामाला लागल्या.

==========

समारोप

बघता बघता समारोपाच्या लेखापर्यंत कधी पोचलो ते कळलेच नाही. जसे विषय सुचत गेले तसे लिहित गेलो. काही लेख परत लिहिले. काहीत सुधारणा केल्या. खरं पाहिलं तर या आठवणी मी लिहित होतो ते आमच्या घरगुती ग्रुपसाठी. परंतु शिरिषने त्या आठवणी संकलित करून, मुद्रित करण्याची संकल्पना मांडली. खरंतर या आठवणी संकलित करून मुद्रण व व्याकरण दोष काढून छापण्याची मोठी जबाबदारी तो उचलणार होता. मोठे खर्चाचे व जिकिरीचे काम होते. माझ्या दुसऱ्या एका मित्राने ई-साहित्य विनामूल्य प्रसिद्ध करण्याचा व वाचकांना सहज उपलब्ध करून देण्याचा मार्ग सांगितला व तो आम्हाला पसंत पडला.

आमचा अल्पसा प्रयत्न व धाडस वाचकांच्या पसंतीस उतरेल ही आशा. आपल्या प्रतिक्रिया अवश्य नोंदवा.

धन्यवाद !

उदय द. फाटक, ठाणे
मो. ९८१९८७९९४२

==========

लेखक परिचय

उदय दत्तात्रय फाटक

(B. E. Elect.)

क्रॉम्प्टन ग्रीव्हज् कंपनी लि. मधून स्वेच्छा निवृत्ती.

विद्यार्थीदशेपासून छोटे लेख लिहिण्याची आवड.

कथांना वृत्तपत्रात व धार्मिक पुस्तकात प्रसिद्धी.

हस्तलिखित मासिके लिहिली, त्याला वृत्तपत्रातून दाद.

स्मार्टफोन आल्यावरती ग्रुपवर सर्व आठवणी लिहिल्या.